दिवाळी २०२०

# स्पंदन



शब्दांश प्रकाशन

# प्रस्तावना

स्पंदन दिवाळी अंकातर्फे तुम्हा सर्वांचे पर्व दोन मध्ये खुप खुप स्वागत. आजकाल शिक्षण ,खरेदी सगळंच online झालं आहे. मग आपला दिवाळी अंक का म्हणून मागे राहील? तो ही आलाच आपल्या हाताच्या बोटांवर, म्हणजे लॅपटॉप, कॉम्पुटर आणि आपल्या मोबाईल मध्ये. मागच्यावर्षी कविता ,कथा, ललित, लेख ह्या साहित्य प्रकाराची मेजवानी तुमच्यापर्यंत पोहचवली होती. ह्यांवर्षी तर दृश्यश्राव्य बनवण्याचा प्रयत्न केला आहे.अभिवाचन, नृत्य, रांगोळी, minitute art, चित्रकला आणि अजुन बरेच काही या अंकामध्ये समाविष्ट करून वाचकांना दिवाळीची खास मेजवानी मिळणार आहे.

ह्यावेळच्या आपल्या अंकामध्ये 'सुहृदय' म्हणून एका चांगल्या माणसाची छान कथा तुम्हाला वाचायला मिळेल. तर ह्या कोरोनाच्या साथी मुळे साथीदार गमावल्याचं दुःख काय असू शकत हेही एका कवितांतून कळेल. कुठे नदीची कैफियत आहे तर कुठे सखीच्या प्रेमाची कथा आहे. देवाला आवडेल असा अभंग आहे, तर कुठे त्याला आवडतील अशी फुलं आहेत. आंबा मोदक, पिस्ता नारळ बर्फी कशी बनवायची, हे देखील तुमच्यासाठी दिलं आहे. कोरोनाच्या भीतीच्या सावटाखाली काय काय होऊ शकत ह्याची हकीकत आहे...त्याचबरोबर पावसाची वारी देखील आहे..किती बदलेले वेष तरीही आपण तेच आहोंत, हे एका सुंदर कवितेतून तुमच्यापर्यंत पोहोचवले आहे. कुठे आठवणीतला पाऊस आहे, तर कुठे अनुबंध. काही लेखांतून लघु उद्योगमधल्या संधी आणि आव्हानांची माहिती देखील देण्याचा प्रयत्न केला आहे.

एकंदरीत काय लेख, ललित, कथा , कविता आणि कला कौशल्य याने भरगच्च असा हा अंक आहे. वाचुन आपल्या प्रतिक्रिया अवश्य कळवा.

sevasahitya@gmail.com
शब्दांश प्रकाशन, संपादक मंडळ.

# मागील अंकाविषयी

*मजरुह सुल्तानपुरी म्हणतात तसं,*

***मैं एकेलाही चलता रहा था मंजिल की तरफ!***

***लोग जुडते गये कारवा बनता गया!!***

*खरंच या शेर सारखच आमच्या चौघींच्या मनात काहीतरी करावं ही इच्छा होती. देवाच्या कृपेने एकत्र आलो सहज असा विषय निघाला आणि दिवाळी अंक स्पंदन २०१९ जन्माला आला. एकदम वेळेवर ठरवल्यामुळे आपल्याला कोणी प्रतिसाद देईल का? अंक काढणं आपल्याला जमेल का? लोक वाचतील का? ह्या निश्चित आणि अनिश्चित शंकावर मात केली कारण खुप चांगले लोक बरोबर आले ...कोणाकडून हक्काने कथा लिहाच हा हट्ट केला तर कोणाला अग तुझी इच्छा आहे, लिहायचा प्रयत्न तरी कर ही संधी सोडू नको ,म्हणून त्यांचा उत्साह वाढवला. उत्तम दर्जाचे लेख, कविता, कथा, अलक लोकांसमोर आणायचा एक छोटासा प्रयत्न केला. जसा कवी आणि लेखकांनी प्रतिसाद दिला तसच वाचणाऱ्यांनी देखील प्रेम केलं. मागच्या वेळी कमी लोकांपर्यंत पोहचलो आम्ही. पण ह्यांवर्षी मात्र जरा जास्त लोकांपर्यंत पोहचण्याची इच्छा आहे...*

*बरेच लोक म्हणत असतात, आता काही कोणी चांगलं लिहितच नाही, पण खरंच असं नाही. अनेक लोक अतिशय उत्तम लेखन करतात, कविता-गजल लिहितात..तेच आम्ही तुमच्यापर्यंत डिजिटल माध्यमातून पोहचवत आहोत. Digital अभिवाचन ह्या माध्यमातून आम्ही सगळे तुमच्या पर्यंत पोहचण्याचा प्रयत्न करतो आहोत, आमचं ध्येय आहे की उत्तमोत्तम साहित्य वाचकांपर्यंत पोहचावे..आतापर्यंत सहकार्य केले, असाच पाठिंबा असू द्या.*

{स्पंदन २०१९ - https://drive.google.com/file/d/1CtQYOAE8SFtDX-NuNpT1bqCGJ49yc_qF/view?usp=sharing}

# अनुक्रमणिका


| साहित्य | लेखक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| **लेख** | | |
| कृष्ण | स्वागता पांडव | 1 |
| नदीमय झाले मन | प्रमोद देशपांडे | 3 |
| नव्या पिढीच्या | आदिती पाटील | 5 |
| मृत्यूकडून जीवनाकडे... | विश्वास देशपांडे | 7 |
| संगीत हृदयाला भिडणारं ! | मृणालिनी | 11 |
| बाबासाहेब शेतकरी आणि कामगार | वैभव अनिल अलई | 13 |
| लघु उद्योगासमोरील संधी आणि आव्हाने | कोमल शिवाजी मुळे | 20 |
| शोध सुखाचा | संजय चेपे | 23 |
| **पद्य विभाग** | | |
| आनंदाची झालर | अरुणा धनंजय विचारे | 27 |
| फुलवा | सुवर्णा बाबुराव कळसे | 28 |
| माती | मंजुषा कुलकर्णी | 29 |
| मुठेची कैफियत | अजय चव्हाण | 30 |
| सगळे तुझ्यावर हसतात म्हणून | ओंकार संतोष सुमारे | 31 |
| प्राजक्त एवढासा दारासमोर फुलतो | विजयकुमार देशपांडे | 32 |
| आठवणीतला पाऊस | दत्ता वालेकर | 33 |
| अनुबंध | कविता नवरे | 33 |
| सखे तुझ्याच साठी | लता अनिल बहाकर | 34 |
| तिला कविता आवडत नाही | आशुतोष महागांवकर | 35 |
| श्रीकृष्णस्वरूप राधा - राधा स्केच अयुष्का जोशी | डॉ कल्पना देशमुख | 36 |
| किती बदलले वेश | वैशाली मोहिते | 37 |
| पावसाची वारी | संदिप अवचट | 37 |

## गद्य विभाग


| | | |
|---|---|---|
| लॉक डाऊन | जयश्री देशकुलकर्णी | 38 |
| देवाची फुलं | संपदा | 45 |
| पॉझिटिव्ह (?) | नागेश सू. शेवाळकर | 48 |
| सेलिब्रेशन | कविता नवरे | 54 |
| परिवर्तन | माधवी खडक्कार | 57 |
| स्मार्ट मैत्री | जयश्री जयंत श्रीखंडे | 66 |
| सुहृद | अपर्णा देशपांडे | 69 |
| उत्तररंग | माधवी देवळाणकर | 72 |
| आजी आपण दिवाळी का साजरी करतो गं | रेशमा अनकोलकर | 86 |
| वाटेकरी | बिपीन सान्गळे | 89 |
| सखी मंद झाल्या तारका | अजय चव्हाण | 100 |
| फुंकर | डॉ. स्वागता पांडव | 105 |
| आईचा चोरकप्पा | रेशमा अंकोलीकर | 107 |
| कन्यादान | विनीता माने | 110 |
| दिल दोस्ती दुनियादारी | अक्षय दुधाळ | 114 |


## अभंगवाणी


| | | |
|---|---|---|
| अभंग वाणी-निरवयव ब्रह्मी रुप | शशांक पुरंदरे | 123 |


## पुस्तक परिचय


| | | |
|---|---|---|
| Book Review Wonder by R J Palacio | दिप्ती भगत | 124 |


## पाककला


| | | |
|---|---|---|
| पिस्ता नारळ बर्फी | श्वेता चिन्नापुरकर | 126 |
| उकडीचे आंबा मोदक | रश्मि देशपान्डे | 128 |
| उपवासाची आंबोळी | sanskarifood Sarika santosh lahane | 131 |



## कला दालन 132

## व्हिडीओज 141

# कृष्ण

लहानपणापासून हे नाव इतक्यांदा ऐकलंय की वयाच्या सहाव्या वर्षीच त्याच्या प्रेमात पडले.. कारण आमचे आजोबा भागवताचार्य होते.. अगदी आईच्या पोटात असल्यापासूनच ऐकलंय म्हंटलं तरी चालेल - त्याचं नाव, त्याचे पराक्रम, त्याची गाथा आणि त्याची विरक्ती सुद्धा..

माझे आजोबा सांगत, आणि आम्ही अगदी गोकुळात जाऊन पोहोचत.. लहानपणी वडील विचारायचे, " कसा नवरा हवा गं तुला? " आणि मीही बिनधास्त म्हणायचे "कृष्णासारखा".. बस्स.. दुसरा कोणी व्यक्ती कसा असेल याचा विचारही शिवला नाही कधी.. असो, तर अश्या कृष्णाच्या मीच काय संपूर्ण मानवजात प्रेमात पडली तरी कमीच आहे..

हे डोळे झाकून, काहीसं अल्लडपणे प्रेमात पडणं खूप वेगळं.. पण जसजशी मोठी होत गेले तसं तसं, 'तो' समजू लागला, उमजू लागला, बोलू लागला.. आणि मग मी खऱ्या अर्थाने त्याच्या प्रेमात पडू लागले.. नव्हे, खरं प्रेम काय ते समजू लागले..

कोण होता कृष्ण?.. देव? माणूस? की देवमाणूस?

खरं तर मला वाटतं त्याच्यावर कोणताही विकल्प लावण्यापेक्षा तो होता, आहे आणि राहणारे.. हे समजण्यात जो आनंद आहे तो दुसऱ्या कश्यातही नाही.. त्याच्यावर प्रेम करण्यात जे सुख आहे ते कशातच नाही.. कशाला करायची नसती उठाठेव त्याच्यावर विकल्प करायची.. 'त्याला समजून घेताना जे स्वतःला विसरणं आहे तेच खरं प्रेम..' तोच खरा आनंद.. ते खरं सुख.. आणि हे सगळं सोडून आपण "तहानलेले" असताना पाणी नळाचं आहे की फिल्टरचं याची फेरतपासणी कशाला.. का आपण इतके व्यस्त झालोयं की आपण तहानलेलो आहोत हेच आपण विसरून गेलोय..!!

कृष्णाने कधीच चांगलं किंवा वाईट सांगितलं नाही.. त्याने धर्म सांगितला.. 'धर्म म्हणजे योग्य मार्ग..' ना चांगला, ना वाईट.. फक्त योग्य.. म्हणून कर्णाला मारणं अधर्म नव्हे..

योग्य मार्ग कोण ठरवतं, तर आपली विवेकबुद्धी.. नुसती बुद्धी नाही तर विवेकबुद्धी.. विवेकबुद्धी कार्य कशी करते, तर आपल्या सजगतेमुळे म्हणजे जागृती मध्ये (alertness).. सजगता निर्माण होते - जाणीवेमुळे.. आणि जाणीव निर्माण होते - चेतनेमुळे आणि ती चेतना म्हणजेच कृष्ण.. जो सदा आपल्या चेतनेचा म्हणजे स्वतःच्या अस्तित्वाच्या, परमेश्वराच्या अस्तिवाच्या कायम आनंद घेत असतो.. तोच चैतन्यानंद.. ब्रह्मानंद.. त्याचे प्रेम कधीही न आटणारे.. चिरकाल टिकणारे.. कोणी घेऊ न शकणारे पण आपण प्रत्येकाला लुटू शकणारे.. अमर्याद अमर प्रेम..

**आणि अश्या चिरंतन प्रेमात डुंबायला कोणाला बरे आवडणार नाही.. या अखंड प्रेमाच्या सागरात डुंबायला  फक्त एका गोष्टीची गरज आहे.. ती म्हणजे निस्सीम श्रद्धा.. 'श्रद्धा ठेवणं म्हणजे बुद्धी न वापरणं नव्हे' तर आपल्या बुद्धीचा पूर्ण वापर करूनही जेव्हा काही समजायचं उरतंच, तेव्हा श्रद्धा उत्पन्न होते.. आणि ती तात्पुरती न राहता कायमची दृढता निर्माण करते.. याच एका श्रद्धारूपी नौके द्वारे भवसागर पार करून आपण चिदानंद अनुभवू शकतो.. संपूर्ण प्रेम मिळवू शकतो..**
**कार्य पूर्ण करण्याची पहिली पायरी आहे सुरुवात.. तर चला,  आपण आपल्या कर्तव्याची सुरवात श्रद्धेने करू आणि म्हणून त्याचा शेवट नक्कीच कृष्णमय बनवू..**

**{डॉ. स्वागता पांडव}**

# नदीमय झाले मन

**तिकडे गोदावरी वाहू लागली आणि इकडे मन .**

**परभणी जिल्ह्यातील जिंतूर तालुक्यातील पाचलेगाव हे माझे आजोळ गाव . दोन नद्यांच्या  काठावर त्रिगुणात्मक शक्ति पीठ असलेल्या आजोळ गावी व  राष्ट्रसंत संचारेश्वर पाचलेगावकर महाराजांनी स्थापन केलेल्या मुक्तेश्वर मंदिरात माझे अवघे बालपण गेले. अठ्ठावन्न वर्षे झाली आता मला आता पण ते गाव, गावाच्या आठवणी मात्र मनात  समईच्या तेलवाती सारख्या अजूनही  टीमटीमत आहेत .**

**गावाला वळसा घालून जाणारी नदी व गावापुढे एका संगमावर मिळणारी दुसरी छोटी नदी या परिसरात भटकणे  हे माझ्या लहानपणीचे मुख्य आकर्षण असायचे .**

**किती आणि काय काय सांगू मी नदीबद्दल ?**

**कपडे धुणे , पोहणे , शिवनापाणी खेळणे हे सारे वाहत्या पाण्यातले उद्योग .नदीकाठी मुबलक उगवलेला सुगंधी नागरमोथा आणण्यापासून ते नदीपात्रातील शिरगोळ्याचे पांढरेशुभ्र दगड आणून त्याची रांगोळी तयार करायची आणि पोयट्याची चिकणमाती केस धुवायला आणण्यापर्यंत सगळे उद्योग नदीनेच शिकवले .**

**लहानपणी नदीला पावसाळ्यात नेहमी पूर यायचे , नदीचा एक फाटा पडून गावातील मुक्तेश्वर मंदिरा जवळून गेलेला . त्यामुळे मुक्तेश्वर मंदिर नेहमी पुराच्या विळख्यात असायचे. मग एकदा संचारेश्वर महाराजांनी मोठ्या श्रमदान यज्ञाचे आयोजन करून हा नदीचा फाटा बंद केला, मी त्या वेळी 10 - 12 वर्षाचा असेन, माझाही सहभाग त्यात होता . काही वेळेस खूप मोठे पूर आलेले पाहिले आहे . देवकर वाड्यापर्यंत म्हणजे अगदी अर्ध्या गावात पाणी आलेले पाहिले आहे.कमरेला भोपळे बांधून नदीच्या पुरात उड्या मारण्याचे धाडसही मी त्या वेळी केलेले आहे. माझ्या आजोळी मामा, मावश्या सर्व पट्टीचे पोहणारे अगदी नदीच्या पुरातील पाण्यातही , मलाही पोहणे शिकवले त्यांनीच. नदीच्या काठी गावा शेजारीच एक झाडांचे बन होते , तेथे आमचा सूर पारंब्या चा खेळ नेहमीच चाले. नदीच्या वाळूपात्रात आजोळी असलेला घोडा दौडविणे हा माझा आवडता खेळ असे . वाळूपात्रात झरा करून पाणी पिणे नित्याचेच असे .**

**नदीनी जशी गावे आणि शेती समृद्ध केली तशी तिने आमचे बालपण आणि मनेही समृद्ध केली ..आनंदी राहणे आणि काहीही झाले तरी मन वाहते ठेवणे हा या नदीचाच आशीर्वाद !**

**पुढे नदीवर बंधारा बांधल्यापासून ती कधी बारमाही  वाहिली नाही .पूरही बंद झाले, मग...नदी बिचारी मुकीच राहिली .**

**आज ती शेकडो मैल दूर आहे .. आवेगाने तिचे ओंजळभर पाणी घेतायेत नाही ही ठणक लागलीये मनाला .**




**{प्रमोद देशपांडे}**

# नव्या पिढीच्या खोट्या मॉडर्न मुखवट्यामागे लपलेल्या निरागस मुलांना बाहेर काढुया

**खोट्या श्रीमंतीचा, मॉडर्न असल्याचा आव आणण्याच्या नादात आजची पिढी किती निरर्थक/ असभ्य, निर्बोध/ अश्लील, वेडेपणा/मूर्खपणा करत आहे. आणि स्वतःला गमावलं आहे. हा एकप्रकारे माणुसकीचा र्हास आहे. मला अश्या लोकांची खूप कीव येते, की जे स्वतःबद्दल संवेदनशील नाही. जे तो खोटा आव आणण्याच्या खोटं आयुष्य जगण्याच्या नादात स्वतःला किती त्रास करून घेत आहेत. त्यांना नाही माहीत ते काय करत आहेत ? स्वतःसोबत किती निर्दयी होत आहेत !? ते खरच मनापासून आंनदी आहेत का ?? की मित्रांना खुश करण्यासाठी स्वतःची इज्जत, इमेज जपण्यासाठी खटाटोप करत आहेत ?**

**चांगली चांगली मूल मुली कपल्स मित्रांच्या संगतीमुळे पिअर प्रेशर मुळे मल्टिपल अफेर्स एक्स्टरामरायटल अफएर मध्ये गुंतत आहेत. लहान वयात मुलांना वाईट सवयी लागत आहेत.**

**माझा हेतू नकारात्मक वाईबस पसरवण्याचा नव्हता. पण आता वेळ आलीय या पिढीला खडबडून जागं केलं पाहिजे. त्यांना त्यांच्या आयुष्याचं परपज कळालं पाहिजे. हे तरुण युजलेस नाहीये, युजड लेस अस अब्दुल कलाम यांनी म्हटलंय. पण यांना योग्य रस्ता दाखवला पाहिजे. यांच्यातली ऊर्जा, उत्साह योग्य मार्गी लावणे हे आपलंच काम आहे. फक्त पोस्ट वाचून न्युज वाचून गप्प राहण्याचं किंवा गॉसिप करण्याचं काम करून चालणार नाही, ही परिस्थिती बदलायला लागेल.**
**या पिढीला त्यांचे खोटे मुखवटे उतरवून त्यांचे खरे सौंदर्य दाखवण्याची वेळ आलीय. स्वतमधल्या खऱ्या निरागस व्यक्तीवर प्रेम करायला यांना शिकवायला हवे.**

**अनेक डिप्रेसड मुले मुली पश्चाताप करत, रडत, व्यसनात अडकून, गिल्ट मध्ये अडकून जातात. यांना पूर्णपणे बाहेर काढले जाऊ शकते. यांचे आयुष्य पूर्ण ३६०° ने बदलले जाऊ शकते. यात सगळा दोष यांचा नाहीये, कुठंतरी पालकांनी दुर्लक्ष केलय. जर यश मिळाल्यावर आपण क्रेडिट घ्यायला बघतो, मग अपयशाच्या वेळी जबाबदारी का घेत नाही ?**

काय करावे ? कसे करावे ? यातून मार्ग कसा काढावा ? शांतपणे बसून सुसंवाद साधला तरच मार्ग निघणार आहे. त्यामुळे पालकांनी स्वतः मुलाला समजून घेऊन शांतपणे समुपदेशन करावे, किंवा सेल्फ-हेल्प पुस्तके वाचण्यास सांगावी. गरज पडल्यास प्रोफेसशनल कोन्सलर ची मदत घ्यावी. या सगळ्या प्रोसेसमध्ये त्या मुलांना स्वतःचे अंतरंग दिसले पाहिजे.

बी. एफ. स्किनर या जगप्रसिद्ध मनोवैज्ञानिकाने त्याच्या प्रयोगातून हे सिद्ध केले की, प्राण्यांना त्यांच्या चांगल्या वागणुकीबद्दल बक्षीस दिले गेले तर, ते अधिक लवकर व परिणामकारक शिकतात आणि त्यांना जर त्यांच्या दुवर्तनाबद्दल शिक्षा केली गेली, तर ते काहीच शिकत नाहीत. नंतर त्यांनी मानवावरील प्रयोगांनी हेच सिद्ध केले आहे. टीका केल्याने कायमस्वरूपी परिणाम साधत नाहीत, उलट संतापच वाढतो. टीका केल्याने व्यक्तीचे मानिसक

खच्चीकरण होते. टीका ही निरर्थक असते, त्यामुळे माणूस स्वतःचा बचाव करण्याचा आणि मी कसा बरोबर आहे हे सांगण्याचा प्रयत्न करतो. टीकेमुळे माणूस जखमी होतो, त्याच्या स्वाभिमानाला धक्का पोहोचतो. टीका करून तुम्ही स्वतःचे नाते बिघडवता.

टीका न करता मुलांना स्वतःच्या लहानपणी केलेल्या चुकांचे उदाहरण देऊन शिकवावे. जेव्हा तुम्ही तुमच्या आयुष्यातल्या घडलेल्या चूका आणि त्यातून तुम्ही काय शिकला हे मुलाबरोबर शेअर करता, तेव्हा तुमचा मुलांसोबतचा बॉण्ड मजबूत होतो.

{आदिती पाटील, नाशिक}

(adeeti2812@gmail.com)

# मृत्यूकडून जीवनाकडे...

**कधी कधी हे सत्य हे कल्पनेपेक्षा भयानक असते. आपण स्वप्नातही कल्पना करू शकणार नाही अशा गोष्टी प्रत्यक्षात घडतात. अशीच ही एका मुलीची कथा. अक्षरशः मृत्यूच्या दाढेतून वाचलेली. जगण्याची दुर्दम्य इच्छाशक्ती कोणता चमत्कार घडवू शकते, त्याचे प्रत्यंतर देणारी. ही घटना आहे २४ डिसेंबर १९७१ ची.**

**ज्युलियन कोपकी, एक १७ वर्षांची मुलगी. पेरू देशाची राजधानी लिमा येथे शिक्षणासाठी आलेली. नुकतेच हायस्कुलचे शिक्षण पूर्ण झालेले. तिचे आईवडील तेथून जवळच असलेल्या अमेझॉनच्या जंगलात एक प्रयोगशाळा स्थापून प्राणिशास्त्र आणि पक्षीशास्त्रासंदर्भात संशोधन करीत असतात. तिची आई काही कामानिमित्त लिमा येथे आलेली होती. नाताळचा सण फक्त काही दिवसांवर आलेला होता. परीक्षेचा अभ्यास करून कंटाळलेल्या ज्युलिअनच्या डोळ्यात नाताळ साजरा करण्याची स्वप्ने तरळत होती. आपल्या वडिलांना भेटण्यासही ती उत्सुक होती. खरे तर तिच्या आईला आपले काम संपवून १९ किंवा २० डिसेंबरला परत आपल्या प्रयोगशाळेकडे जायचे होते . पण ज्युलिअनच्या शाळेत पदवीदान समारंभ २३ डिसेंबरला असल्याने ती थांबते आणि दोघीही तो कार्यक्रम आटोपल्यावर आपल्या त्या अमेझॉनस्थित असलेल्या घराकडे आणि प्रयोगशाळेकडे जाण्याचे ठरवतात.**

**चोवीस डिसेंबरच्या विमानाचे तिकीट बुक करण्यासाठी त्या प्रयत्न करतात. पण सुट्या आणि नाताळ असल्याने सगळ्या विमानांची तिकिटे आधीच आरक्षित झालेली असतात. खूप प्रयत्न केल्यानंतर त्यांना लांसा एअरलाईन्स ५०८ या विमानाचे तिकीट मिळते. त्या ज्युलिअनच्या वडिलांना ही बातमी कळवतात. 'लांसा या विमानकंपनीची ख्याती तशी फारशी चांगली नाही. तिच्या विमानांना अपघात झाले आहेत. तेव्हा त्या विमानाने येऊ नका ' असे तिचे वडील कळवतात. पण दुसऱ्या कोणत्याही विमानाचे तिकीट उपलब्ध नसल्याने त्या दोघी याच विमानाने यायचा निर्णय नाईलाजाने घेतात.**

**२४ डिसेंबरची रात्र त्यांच्यासाठी काळरात्र बनून उभी ठाकते. त्या दिवशी विमान येते तेच सात तास उशिरा. खराब हवामानामुळे विमानाला उशीर झालेला असतो. विमानाची वाट पाहण्यातच सारा उत्साह मावळलेला असतो. अखेर एकदाचे विमान येते. सगळेजण आपापल्या आसनांवर स्थानापन्न होतात आणि विमान हवेत झेपावते. तसा तर तो प्रवास तासाभराचाच असतो. त्यामुळे उशीर झाला तरी एक दीड तासाने आपण आपल्या घरी जाऊ ही आशा मनात असते.**

**पण थोड्याच वेळात वातावरणात बदल होतो. विमान काळया ढगांमधून वाटचाल करते. विजा चमकू लागतात. विमान आता हवेमध्ये हेलकावे खाऊ लागते. प्रवाश्यांमध्ये भीती निर्माण होते. विमानातील वस्तू, बॅग, नाताळसाठी खरेदी केलेली खेळणी लोकांच्या अंगावर पडू लागतात. अचानक विमानाच्या डाव्या बाजूला बाहेर प्रकाशाचा लोळ दिसतो. ज्युलिअनची आई म्हणते, ' आता सगळे संपले बहुतेक. ' तेच तिच्या आईचे शेवटचे शब्द तिला ऐकू येतात. काही क्षणातच हवेतच स्फोट होऊन विमानाचे दोन तुकडे होतात. ज्युलिअनने सीटबेल्ट बांधलेला असतो आणि आपल्या खुर्चीला ती घट्ट पकडून असते. तिला विमानातून आपण खाली कोसळतो आहोत एवढी जाणीव फक्त होते.**

**ज्युलिअनला जेव्हा शुद्ध येते, तेव्हा तिला आढळते की आपण एका घनदाट जंगलात पडलेलो आहोत. तिच्या खांद्याचे हाड मोडलेले असते. तेथे जखम होऊन प्रचंड वेदना होत असतात. पायाला दुखापत झालेली असते. उजव्या हाताला दुखापत झालेली असते. ती सुमारे दहा हजार फूट उंचीवरून खाली कोसळलेली असते. एवढ्या उंचीवरून पडूनही ती जिवंत असते हेच खरे तर मोठे आश्चर्य. ' देव तारी त्याला कोण मारी ' असे आपण म्हणतो ते तिच्या बाबतीत अक्षरशः खरे ठरले.**

**पण ती वाचली तरी पुढचा जगण्यासाठीचा संघर्ष अजिबात सोपा नसतो. ती जेथे पडलेली असते ते ठिकाण म्हणजे अमेझॉनचे घनदाट आणि महाभयंकर जंगल. सर्वसाधारण माणसाची जाण्याची हिंमत होणार नाही असे ते ठिकाण. उंचच वाढलेली झाडे. सूर्यप्रकाश क्वचित दिसला तर भाग्य. विषारी साप, वाघ, सिंह इ प्राण्यांची रेलचेल, पिसवा, डास, निरनिराळे चावणारे कीटक यांनी हे जंगल भरलेले. शिवाय हे पावसाळी जंगल. कायम ओली जमीन. रात्री प्रचंड थंडी. अशावेळी या ज्युलिअनच्या अंगावर असतो फक्त एक आखूड स्कर्ट. पायातली एक सँडल कुठेतरी हरवलेली असते. एकाच सॅण्डलचा वापर करून ती चालते. निदान तो पाय तो सुरक्षित राहील या आशेने.**

**सुरुवातीला तिला आपल्या आईची आठवण येते. आपल्या बाजूच्याच सीटवर असणारी आई कुठे असेल ! ती आजूबाजूला फिरून आपल्या आईचा आणि सहप्रवाशांचा शोध घेते पण व्यर्थ. त्या घनदाट जंगलात कोणताही मागमूस तिला लागत नाही. अशावेळी ती थकलेली असते. पोटात प्रचंड भूक असते. तिला एक मिठाईचा बॉक्स सापडतो. कदाचित विमानातूनच कोणाचा तरी पडलेला असावा. ती तेवढा बॉक्स संपवते.**

तेवढ्यापुरती भूक तर भागलेली असते. त्यातल्या त्यात एक सुरक्षित जागा बघून रात्र तेथे काढायची ठरवते. पण जंगलातील डास, कीटक तिला चावून हैराण करतात. अंगावरच्या पातळ कपड्यांमुळे प्रचंड थंडीलाही तोंड देणे कठीण होते. तशीच रात्र ती काढते. सकाळ होते. जीवनाच्या नव्या आशेने ती मार्ग शोधायला सुरुवात करते. पण अमेझॉनच्या प्रचंड आणि घनदाट जंगलात रस्ता तरी कसा आणि कुठे शोधणार ? चालून चालून दमते आणि पुन्हा तशीच रात्र कुठेतरी काढते.

दुसऱ्या दिवशी तिला आपल्या डोक्यांवर विमानांची घरघर ऐकू येते. पण दाट झाडांमुळे विमान दिसत नाही. तरी ती सगळा जीव एकवटून ओरडते. पण काही उपयोग होत नाही. तिच्या विमानाला झालेल्या अपघातामुळे त्या शोधार्थ काही शोधपथके अमेझॉनच्या जंगलात येतात पण त्यांना काहीही सुगावा लागत नाही आणि ते परत जातात.

बिचारी ज्युलियन जंगलात एकटी, असहाय भटकत राहते. तसे जंगल तिला अपरिचित नसते. जंगलातल्या वनस्पती, प्राण्यांविषयी तिला आपल्या आईवडिलांमुळे चांगली माहिती असते. पण यावेळी ती एकटी आणि असहाय असते. अशावेळी तिला आपल्या वडिलांनी सांगितलेला पहिला धडा आठवतो. जंगलात समजा तू हरवलीस तर पाण्याचा शोध घे. पाण्याच्या, नदीच्या प्रवाहाच्या दिशेने चालत राहा म्हणजे कुठेतरी मानवी वस्ती दृष्टीस पडेल.

ती पाण्याचा शोध घेत असताना तिला पाण्याचा खळखळाट ऐकू येतो. तिला खूप हायसे वाटते. ती ते पाणी पिऊन आपली तहान भागवते आणि गुडघाभर पाण्यातून वाट काढत चालत राहते. पाण्यातून किंवा नदीकाठाने चालणेही सोपे नसते. नदीतही विषारी जलचर, मगरी यांचे साम्राज्य असते. काठावरून इतके दाट जंगल आणि वेली असतात की सराईताला देखील चालता येऊ नये. आता तिच्या खांद्यावरील जखम चिघळलेली असते. त्यात अळ्या झालेल्या असतात. असे आठ दिवस ती चालत राहते. उपाशी राहण्यामुळे आणि सततच्या श्रमांमुळे आपली शक्ती आता संपत आली आहे, हे तिला जाणवते.

नवव्या दिवशी नदी पार केल्यानंतर एक चढण तिला दिसते. मोठ्या कष्टाने ती चढण चढते. आणि आश्चर्य म्हणजे तिच्या दृष्टीला नदीकाठी बांधलेली एक नाव नजरेस पडते. बाजूलाच एक झोपडी असते. त्या झोपडीत कोणीही नसते. तिथे तिला रॉकेलचा एक डबा दिसतो. तिला आठवते की तिच्या वडिलांनी त्यांच्या कुत्र्याला जी जखम झाली होती आणि ज्यात अळ्या झाल्या होत्या त्यावर रॉकेल लावले होते.

त्यामुळे ती त्या डब्यातील रॉकेल आपल्या खांद्यावरच्या जखमेत लावते. प्रचंड आग होते. पण इलाज नसतो.

एकदा तिच्या मनात येते की किनाऱ्यावर बांधलेली ती नाव घेऊन आपण निघून जावे. पण अशाही परिस्थितीत तिची सद्सद्विवेकबुद्धी तिला सोडून गेलेली नसते. ती विचार करते की ज्यांनी कोणी ती आणली असेल त्यांची पंचाईत होईल म्हणून ती तो विचार सोडून देते. अतिश्रमाने ती तिथेच थकून झोपी जाते.

दुसऱ्या दिवशी काही लोक तिथे येतात. या मुलीला पाहून त्यांना खूप आश्चर्य वाटते कारण अशा प्रचंड, भयानक जंगलात ही एकटीच तरुण मुलगी कुठून आणि कशी आली हा प्रश्न त्यांना पडतो. मग ज्युलियन त्यांना सगळी हकीगत सांगते. ती माणसे मग तिच्यावर जुजबी औषधोपचार करतात. त्यांच्याजवळ असलेले खायला देतात. लवकरच तिच्या वडिलांची आणि तिची भेट घडवून आणतात.

तिच्या वडिलांची अवस्थाही अत्यंत वाईट झालेली असते. या सगळ्या घटनेचा मानसिक परिणाम त्यांच्यावरही झालेला असतो. ज्युलियन त्यांना तिच्या आईबद्दल विचारते. पण त्यांनाही अजून तरी तिच्याबद्दल काही कळलेले नसते. ज्युलियन थोडी बरी झाल्यावर त्या अपघातग्रस्त विमानाच्या शोध घेणाऱ्या पथकात ती सहभागी होते. आपल्या आईचा शोध घेते. अखेर तिची आई त्यांना सापडते. पण अपघातामुळे ती जखमी होऊन प्रचंड यातनांना तोंड देत असते. तिला दवाखान्यात नेण्यात येते पण ती तेथेच प्राण सोडते. ज्युलिअनच्या जखमा अजून पूर्णपणे बऱ्या झालेल्या नसतात. तिला पुढील उपचारासाठी जर्मनीत नेण्यात येते. तिथे ती बरी होते.

पण धन्य ती ज्युलियन की एवढ्या घटनेनंतर देखील ती पुढे आपल्या वडिलांसोबतच अमेझॉनच्या जंगलात शोधकार्यासाठी स्वतःला वाहून घेते. प्राणिशास्त्रात डॉक्टरेट करते. या घटनेनंतर सुमारे चाळीस वर्षांनी म्हणजे २०११ मध्ये ती आपल्या आठवणी ' व्हेन आय फेल फ्रॉम द स्काय ' या पुस्तकात शब्दबद्ध करते. तिच्या या पुस्तकाला उत्कृष्ट कलाकृतीचा पुरस्कार मिळतो. तिच्या उत्कृष्ट कार्याबद्दल पेरूच्या सरकारतर्फे तिचा नुकताच २०१९ मध्ये सन्मान केला गेला.

या तिकडच्या हिरकणीच्या जीवनावर अनेक चित्रपट आणि डॉक्युमेंटरी पण निघाल्या आहेत.

थोड्याफार संकटाने खचून जाण्याऱ्या, नैराश्यग्रस्त होणाऱ्या सर्वांसाठीच ज्यूलियनची कथा प्रेरणादायी आहे. आपले जीवन ही परमेश्वराने आपल्याला दिलेली सर्वात मोठी देणगी आहे. थोड्याशा संकटांनी खचून जाऊन आत्महत्या करण्याइतके जीवन स्वस्त नाही. दुर्दम्य इच्छाशक्ती आपल्याला कठीणातल्या कठीण प्रसंगातून तारून नेऊ शकते हाच संदेश ज्यूलियनचे जीवन आपल्याला देते.

{विश्वास देशपांडे, चाळीसगाव,९४०३७४९९३२}

# संगीत - हृदयाला भिडणारं !

**संगीतशास्त्र हे मानवनिर्मित आहे पण संगीत हे काही मानवनिर्मित नाही . ते तर निसर्गातच आहे. प्रत्येक जीवांमध्ये भिनलेली एक कला. चिमण्यांचा चिवचिवाट ,पाण्याचं झुळझुळ वाहणं ,ढगांचं खर्जामध्ये गडगडणं हे सगळं संगीतच आहे कि ! 'भीमसेन जोशी बिजलीसारख्या ताना घेतात ' यामध्येसुद्धा तानांना बिजलीचीच तर उपमा दिली आहे ! म्हणजे वीज कडाडते असं म्हणण्यापेक्षा वीज ताना घेते असं म्हणणंच योग्य .. ! ' मला संगीत आवडत नाही ' असं बोलणारा माणूसच संगीतावर नकळतपणे प्रेम करत असतो. माझा दादा संगीत या विषयात औरंगजेब आहे , पण तरीही त्याला गुणगुणत असताना मी अनेकदा पाहते.**
**हे तर सगळं निसर्गाचं संगीत ! पण शास्त्रोक्त ? ते काही सगळ्यांनाच आवडेल असे नाही. पण मला मात्र शांत मंदिराच्या गाभाऱ्यात बसल्यावर जसं पवित्र वाटतं तसाच अनुभव शास्त्रीय संगीत ऐकताना येतो.**
**कौशिकी चक्रवर्ती ,किशोरीताई आमोणकर आणि निराली कार्तिक ह्या माझ्या आवडत्या गायिका . तिघींचाही आवाज अत्यंत मधुर आहे आणि तेवढाच धारदारही आहे. तबला वादनात मी झाकीर हुसेन यांची प्रचंड चाहती आहे. अजूनही मला त्यांचं प्रत्यक्ष वादन ऐकण्याची संधी मिळाली नाही ,पण त्यांच्या कितीतरी व्हिडिओंचा माझ्याकडे संग्रह आहे. जो मी अगदी सोन्यासारखा जपते. ते स्वतः तबला वाजवतच नाहीत ,तर केवळ त्यांच्या हाताच्या स्पर्शाने तबला स्वतःच वाजू लागतो. या सर्वांचं गायन -वादन ऐकताना मला कशाचंच भान नसतं . दूध उतू गेलं म्हणून मम्मा माझ्या नावाचा गजर करत असते. काहीतरी विसरले म्हणून दादा माझ्या नावाने आरोळ्या मारत असतो. पण झाकिरजींचा तबला बोलू लागला किंवा किशोरीताईंनी राग आळवायला सुरुवात केली कि बस्स ! माझ्यासाठी जणू स्वर्गानंदच !**
**किशोरीताई आमोणकरांना भूप राग खूप आवडायचा आणि रसिकांचीही नेहमी हीच फरमाईश असायची. सर्वसामान्यांच्या भाषेत भूप राग त्या मानाने सोपा ! ( कोणतेही कोमल -तीव्र स्वर लावायची भानगड नाही ,म्हणून असेल कदाचित ! ) पण खरं हा राग इतका सोपा असता तर सगळेच किशोरीताईंसारखे नसते का गायले ??! त्यांचा 'भूप ' ऐकताना फारच अद्‌भुत वाटत हे खरं . पण मला मात्र भूप पेक्षा किशोरीताईंनी गायलेला 'ललित ' ऐकायला प्रचंड आवडतं . ललित रागाबद्दल मला 'अ' का 'ढ' माहित नाही . पण किशोरीताई गाताना तो काळजात भिडतो . कौशिकी चक्रवर्तींच्या आवाजातला भीमपलास किंवा ठुमरी . अहाहा ! दरबार फेस्टिवलमध्ये त्यांनी गायलेली ' जा जा रे अपने मंदिरवा ' ही बंदिश प्रारंभिकच्या**

मुलांना शिकवली जाते असं कोणाला सांगूनही पटणार नाही. एवढे प्रचलित आणि सर्वसामान्य राग जेव्हा त्यांच्या गळ्यातून येतात तेव्हा ते मिया कि मल्हार , मुलतानी ,दरबारी कानडा यासारखे भरगच्च असे कोणतेतरी राग वाटतात. मिया कि मल्हार वरून आठवली निराली कार्तिक. तिचा आवाज शब्दांमध्ये कसा वर्णावा तेच कळत नाही. नुकताच तिने गायलेला मिया कि मल्हार एका वेगळ्याच जगात नेऊन सोडतो. या तिन्ही गायिकांचा आवाज ऐकताना माणूस मंत्रमुग्ध होतो . शांत डोळे मिटून ऐकतच रहावंसं वाटतं . अगदी तसाच झाकिरजींचा तबला ! त्यांच्या आणि उस्ताद अल्ला रखाजींच्या अनेक जुगलबंदी झाल्या. पण त्यातलीच एक विशिष्ट जुगलबंदी मला खूप खूप आवडते . पेशकार वाजवण्याची कसलीही औपचारिकता न करता थेट आक्रमण ! लेहऱ्याच्या दुसऱ्या आवर्तनापासून त्यांची बोटं सुसाट धावतात ते थेट शेवटीच विश्रांती घेतात . ते ऐकताना तर अक्षरशः अंगावर काटा येतो. उ. झाकीरजी आणि पात्री सतीश कुमार यांची तबला -मृदूंग जुगलबंदी जवळ -जवळ ५० वेळा तरी पाहिली असेल.  पण तरीही पुन्हा पुन्हा पाहण्याचा मोहच आवरत नाही . झाकिरजींचा तबला आणि जयंती कुमारेश यांची वीणा . या दोन वाद्यांमधील संवाद तर विलक्षण आहे.

या सर्व गोष्टी अर्थातच हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताच्या छटा आहेत . पाश्चात्य शास्त्रीय संगीतही ऐकायला तेवढंच प्रसन्न वाटतं . फ्रॅन्झ शुबर्टच्या रचना ,सोनाटाज ,सिंफनी ,बीथोवनच्या रचना आणि मोझार्टच्या रचना सृजनशीलतेचं कलात्मकतेचं प्रतीक आहे. या सर्व रचना ऐकताना आपणच musical notes बनून वाहतोय कि काय असं वाटतं . जॅझ ऐकताना तर एखाद्या शांत ,पवित्र जागी बसल्याचा भास निर्माण होतो. खरंच ,संगीत किती अद्भुत ,किती अफाट आहे ना ! पण मग एवढं सगळं अद्भुत असतानाही आजची पिढी हनी सिंग आणि बादशाहाचाच मागे वेडी का आहे ???

लेखात सांगितलेल्या सर्व कलाकारांचं नमूद केलेले संगीत ऐकण्यासाठी खाली लिंक देत आहेत.

https://www.youtube.com/watch?v=QI749_-TjqU -राग ललित ,किशोरीताई आमोणकर

https://www.youtube.com/watch?v=uEqYzdz3Zvg - भीमपलास ,कौशिकी चक्रवर्ती

https://www.youtube.com/watch?v=o6oL9kKftFo - ठुमरी ,कौशिकी चक्रवर्ती

https://www.youtube.com/watch?v=EelXOm_iou0 - मिया कि मल्हार ,निराली कार्तिक

https://www.youtube.com/watch?v=yFcSkWn2oGk -
उ. झाकीर हुसेन आणि उ. अल्ला रखा जुगलबंदी

https://www.youtube.com/watch?v=Lgj_4xyUt2s -
उ. झाकीर हुसेन आणि पात्री सतीश कुमार  जुगलबंदी

https://www.youtube.com/watch?v=sFLh4uYxbe0
उ. झाकीर हुसेन आणि जयंती कुमारेश  जुगलबंदी

{मृणालिनी}

# बाबासाहेबांचे शेतकरी आणि कामगार यांच्या हक्कांचे धोरण

देशासाठी, समाजासाठी अहोरात्र कार्य करुन सामाजिक बांधिलकी व राष्ट्रनिष्ठा जोपासणाऱ्या अनेक महापुरुषांनी आजपर्यंत भारताच्या पावन भूमीत जन्म घेतला आहे. त्यांचा सेवेचा वारसा आजही देशवासियांसाठी आपल्या विकासयात्रेत आदर्श, मार्गदर्शक व दिशादर्शक ठरतो आहे. अशा या थोर महापुरुषात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव नेहमीच अग्रक्रमावर घ्यावे लागेल. कारण ते आपल्या विशाल आणि सर्वांगीण कार्यकर्तृत्वाच्या जोरावर भारतीय समाजजीवनाच्या समग्र क्रांतिचे जनक आहेत. म्हणून ते एका अर्थाने भारताचे भाग्यविधातेही आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी झाला. रामजी व भीमाबाई यांचे ते चौदावे व शेवटचे अपत्य. बाबासाहेब हे अतिशय कुशाग्र बुद्धीचे विद्यार्थी होते आणि त्यांना ही कुशाग्र बुद्धी आणि तल्लख स्मरणशक्ती आपल्या प्रचंड मेहनतीने मिळाली होती. याच कुशाग्र बुद्धिमत्तेच्या जोरावर बाबासाहेबांनी आयुष्यात एकूण सर्व मिळून ३२ पदव्या संपादन केल्या.

बाबासाहेब म्हणजे अष्टपैलू व्यक्तीमत्व. त्यांनी शिक्षणाद्वारे अनेक क्षेत्रांचे परिपूर्ण ज्ञान व माहिती मिळवली होती. पत्रकार, लेखक-ग्रंथकार-समीक्षक, अर्थतज्ञ, राजतज्ञ-धुरींदर राजकारणी, जलतज्ञ, समाजशास्त्रज्ञ, कृषितज्ञ, स्त्री मुक्तीचे समर्थक, कामगार नेते, कुशल संघटक, तत्वज्ञ, धर्मशास्त्राचे अभ्यासक आणि धर्म संस्थापक अशा विविध क्षेत्रात आपल्या अमोघ वक्तृत्वाने व कुशल नेतृत्वाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दीन, दलितांच्या,

श्रमिकांच्या विस्थापितांच्या, शोषितांच्या अंधकारमय जीवनाला प्रज्ञेचा संदेश दिला.

इंग्रजांनी १८५८ पर्यन्त जवळजवळ सर्व भारतावर वर्चस्व निर्माण केले. त्यांच्यासोबत त्यांची व्यापार व आर्थिक यंत्रांनाही स्थिरावली. येथील उद्योग, व्यापारावर ब्रिटीशांनी नियंत्रण मिळवले. औद्योगिक क्रांत्तीमुळे देशात कारखानदारी वाढू लागली. परिणामी कामगारांची संख्या वाढली. एकोणविसाव्या शतकात या औद्योगिक स्वरुपाच्या नवीन विकासासोबत उत्पादनास गती आली. इंग्रजांनी उद्योग व कारखाने सुरू करून त्यांच्या गरजा पूर्ण करून घेण्याचा आटोकाट प्रयत्न केला. वाढती कारखानदारी, वाढते उत्पादन, सुधारीत दळणवळण यामुळे संख्येने सतत वाढणाऱ्या कामगारांच्या वाट्याला सुबत्ता, संपन्नता, येण्याएवजी इंग्रजांच्या आणि मालकांच्या स्वार्थी धोरणांमुळे दैन्य, गुलामी आली. मालक वर्ग कामगारांच्या हालअपेष्टांबद्दल बेफिकीर राहिला. परिणामी कामगारांची स्थीती खूपच दयनीय बनली. प्रचंड काम, कमी पगार, कामावर सुरक्षित वातावरण नाही, अपघात झाल्यास वैद्यकीय मदत नाही, त्यामुळे कामगारांचे जीवन अतिशय हालाकीचे बनले. अस्पृश्य कामगारांची स्थीती तर खूपच दयनीय होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कामगार विषयक कार्याचे प्रामुख्याने स्वतंत्र मजूर पक्षाच्या माध्यमातून कामगार विषयक कार्य, मजूर मंत्री म्हणून कामगार विषयक कार्य, कायदा मंत्री म्हणून कामगार विषयक कार्य, मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून कामगार विषयक कार्य अशा ४ गटात वर्गीकरण करता येईल.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मजुरांवर होणाऱ्या अन्यायाला संघटीत मजुरांकडूनच वाचा फोडण्यासाठी १५ ऑगस्ट १९३६ ला स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. पक्षाचा कामगारांच्या

उत्कर्षांच्या नि उद्धाराच्या ध्येयाने प्रेरित असलेला, निःसंदिग्ध व जनहितार्थ, संरक्षणार्थ, दक्षता बाळगणारा जाहीरनामा 'टाइम्स ऑफ इंडिया' या इंग्रजी दैनिकात पहिल्यांदा प्रकाशित करण्यात आला होता.

१७ फेब्रुवारी १९३७ रोजी प्रांतिक विधानसभांसाठी निवडणूक घेण्यात आल्या .या निवडणुकीत बाबासाहेबांच्या मजूर पक्षानेही १५ उमेदवार उभे केले होते व दोन उमेदवारांना बाहेरून पाठिंबा दिला होता .डॉ .बाबासाहेब आंबेडकर स्वत :मुंबईमधून उभे होते . पक्षाने उभे केलेल्या उमेदवारांपैकी १३ उमेदवार व पाठिंब्याचे दोन असे १५ उमेदवार विजयी झाले .बाबासाहेब विरोधी पक्षात होते तरी स्वतंत्र मजूर पक्षाने १९३७ ते १९३९ या दरम्यान महत्त्वाची कामगिरी केली .या पक्षाच्या प्रतिनिधींनी विधिमंडळात अनेक विधेयके मांडली .अनेक विधेयकांवर प्रभावीपणे मते मांडली .

१५ सप्टेंबर १९३८ साली ट्रेड डिस्प्युट बिलाच्या संदर्भात कौन्सिलमध्ये डॉ. आंबेडकरांनी कामगारांच्या अधिकारावर मालकाने लादलेल्या बंधांनांचा कडाडून विरोध केला. याचसाठी ७ नोव्हेंबर १९३८ ला स्वतंत्र मजूर पक्षाच्या वतीने गिरणी कामगारांनी एक दिवसाचा लाक्षणिक संप करण्याचा निर्धार केला. डॉ. आंबेडकरांनी संप यशस्वी करण्यासाठी पुढाकार घेतला होता. हा संप अयशस्वी व्हावा यासाठी गिरणी मालकाने पोलिस बळाचा वापर केल्याने अनेक कामगार जखमी झाले. तर काही कामगारांना अटक झाली. मात्र संप यशस्वी झाला. कामगार संघटनांचा विजय झाला आणि स्वतंत्र मजूर पक्ष बळकट झाला.

डॉ. आंबेडकर गवर्नर जनरलच्या कार्यकारी परिषदेत चार वर्ष मंजूर मंत्री (१९४२-१९४६) होते. त्यादरम्यान त्यांनी सेवायोजन कार्यालयाची स्थापना केली. इंग्लंडमधून कामगार आयात केले जात असल्याने भारतीय खाणीमध्ये भारतातील कामगारांनाच

फारशी संधी दिली जात नसे. डॉ. आंबेडकरांनी कायद्याद्वारे या आयातीवर प्रतिबंध लावून भारतातील कामगारांना खाणीमध्ये कामावर प्रवेश मिळवून दिला. त्यातही सुरवातीला अस्पृश्यांना डावलले जायचे. डॉ. आंबेडकरांनी केलेल्या विशेष कायद्यामुळे त्यांनाही खाणीत काम करता येऊ लागले.

मजूरमंत्री म्हणून खाण महिला कामगारांसाठी बाबासाहेबांनी कायद्यात विशेष तरतुदी केल्या. त्यात कोळसा खाणीत काम करणाऱ्या स्त्री कामगारांना पुरुषांइतकीच मजुरी, मजूर व कष्टकरी स्त्रियांसाठी २१ दिवसांची किरकोळ रजा, एका महिन्याची हक्काची रजा, दुखापत झाल्यास नुकसान भरपाई आणि २० वर्षांची सेवा झाल्यावर निवृत्तिवेतनाची तरतूद यांसारख्या महत्त्वाच्या निर्णयांचा उल्लेख करायला हवा. कामगार किंवा नोकरी करणाऱ्या स्त्रीला प्रसूती रजा मिळवून देणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जगातील पहिले व्यक्ती आहेत.

मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून काम करताना बाबासाहेबांनी समतेच्या तत्वातून भारतीय संविधानाद्वारे कामगारांसाठी अनेक तरतुदी केल्या आहेत. कलम २३ च्या माध्यमातून त्यांनी वेठबिगारीवर कायमची बंदी आणली. तसेच भाग ४ मधील राज्य धोरणाच्या मार्गदर्शक तत्वातून कामगार कल्याणसाठी राज्यावर काही जबाबदऱ्या दिल्या आहेत. बाबासाहेबांचे कामगारांविषयीचे धोरण कार्ल मार्क्स पेक्षा काही प्रमणात वेगळे आहे, साम्यवादापेक्षा समाजवादावर त्यांचा जास्त विश्वास आहे. आपल्या बुद्ध की कार्ल मार्क्स या पुस्तकात त्यांनी या विषयीचे विस्तृतवर्णन केले आहे.

भारतीय शेतीच्या समस्यांचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सविस्तर विवेचन केले आहे. १९४७ साली STATE OF MINORITIES या लेखात आणि १९१८ साली 'JOURNAL OF INDIAN ECONOMY' या नियतकालिकेमध्ये SMALL

**HOLDINGS OF INDIA** लेखाद्वारे बाबासाहेबांनी भारतीय शेतीसंबंधी आपली मते मांडली आहेत.

गेल्या काही काळापासून भारतीय शेती आणि शेतकरी दोघांचेही स्थान मोठ्या प्रमाणात खालावत चालले आहे. कृषिक्षेत्राबाबत अनेक प्रश्न स्वातंत्र्यापासून प्रलंबित आहेत. भारतीय कृषिक्षेत्राच्या अनेक प्रश्नांची उत्तरे आजही बाबासाहेबांच्या विचारातून मिळू शकतात. म्हणून बाबासाहेबांचे विचार आजही कालसंगत आहेत. बाबासाहेबांनी शेती व्यवसायाचा संबंध समाजव्यवस्थेशी जोडला होता. ग्रामीण भागातील जातीवर आधारित समाज व्यवस्थेचे कारण त्यांनी ग्रामीण भागातील आर्थिक व्यवस्थेमध्ये शोधलं होतं. त्यामुळेच जातीवर आधारित समाजव्यवस्था बदलायची, तर त्यासाठी ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या शेतीमध्ये परिवर्तन घडवावं लागेल असे बाबासाहेबांचे मत होते. शेतीला उद्योग मानून पायाभूत सुविधा पुरवून शेतकऱ्यांचा आर्थिक विकास झाला पाहिजे. शेतकरी आर्थिक समृद्ध झाला तर शेतमजूर आणि शेतीशी निगडित सर्वच घटकाला या आर्थिक सक्षमतेचा फायदा होईल. आर्थिक स्रोत तळागाळापर्यंत झिरपले म्हणजे ग्रामीण माणसाच्या मानसिकतेत सकारात्मक बदल घडतील. हे बदल सामाजिक परिवर्तनासाठी पोषक ठरतील. आर्थिक विषमता ही जातीय व्यवस्थेला पूरक व पोषक ठरते. आर्थिक विषमता जितकी कमी होईल, तितकी जातीय भेदभावाची दरी कमी होईल, असे त्यांना वाटत होते.

शेतीसाठी जमीन व पाणी हे मुख्य घटक आहेत. पाण्याशिवाय शेतीचा विकास अशक्य आहे. शेतकऱ्याला शाश्वत पाणी मिळणे गरजेचे आहे. पाण्याशिवाय उत्पादकता वाढणे आणि शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर उंचावणे शक्य नाही, हे बाबासाहेबांनी ब्रिटीश सरकारच्या निदर्शनास आणून दिले होते. शेतीला शाश्वत पाणी

**पुरविण्यासाठी नदीच्या पाण्याचे नियोजन झाले पाहिजे. देशात घडणारे दुष्काळ हे मानवनिर्मित आहेत. दुष्काळ हटवायचा तर दुष्काळात पाण्याचे नियोजन करावे. जिरायती शेती, बागायती करण्याचे प्रयत्न वाढवावेत. शेती व शेतमजूर समृद्ध झाला तरच देश समृद्ध होईल, असे मौलिक विचार बाबासाहेबांनी मांडले. पाण्यासंदर्भात केवळ विचार व्यक्त न करता त्यांनी ब्रिटिश सरकारला, नदीच्या खोऱ्यातील पाण्याच्या नियोजनाची योजना सादर केली. ही योजना 'दामोदर खोरे परियोजना' म्हणून ओळखली जाते.**

**<u>डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्वांत महत्त्वाची संकल्पना मांडली ती 'शेतीचे राष्ट्रीयकरण' करण्याची. यातून बाबासाहेबांनी राज्य समाजवादाची पायाभरणी केली आहे.</u> शासनाने शेतजमिनी ताब्यात घेऊन, त्या विकसित कराव्यात, अशा विकसित शेतजमिनी शेतकऱ्यांना काही अटींवर कसण्यासाठी द्याव्यात. हा एका अर्थाने सामुदायिक शेतीचाच प्रयोग होता. अशी शेती करण्यासाठी शासनाने अधिनियम बनवावेत. पीकपद्धती, पाणी उपलब्धता, बांधबंदिस्ती, उत्पादकता वाढ, साठवण व्यवस्था, शेतमालाची विक्री, शेतमालाचे भाव या संदर्भात स्पष्ट नियम करावेत. यामुळे कोणत्याही एकाच पिकाखाली मोठे क्षेत्र येऊन, शेतमालाच्या उपलब्धतेत विषमता येणार नाही. मागणी व पुरवठा या अर्थशास्त्रीय नियमानुसार, शेतमालाला रास्त भाव मिळतील. त्याचबरोबर अतिरिक्त उत्पादन टळून शेतमालाचे नुकसानही टळेल. आजही शेतकऱ्यांना शेतमालाला रास्त भाव मिळावा यासाठी शासनाशी झगडावे लागते. या पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विचार किती मोलाचा होता, हे अधोरेखित होते. <u>डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या काही संकल्पनातूनच नंतरच्या काळात कमाल जमीनधारणा कायदा,</u>**

सावकारी व खोती पद्धतींना प्रतिबंध करणारा कायदा, सामूहिक शेतीचे प्रणालीवर आधारित शेती महामंडळ, राज्यातील नद्यांच्या खोऱ्यांची विभागणी व विकास, जलसंवर्धन योजना अमलात आल्या. मात्र दुर्दैवाची गोष्ट ही की भारतात आजही शेतकरी आणि कामगार या दोन घटकांसमोर अनेक आव्हाने आहेत. यावर बाबासाहेबांनी सुचवलेल्या उपाययोजनांना राजकीय इच्छाशक्तीच्या अभावामुळे पुर्णपणे न्याय देऊ शकलो नाहीत. बाबासाहेबांनी दीन, दलित, श्रमिक, शोषित, महिला, कामगार, शेतकरी यांना अनेक जोखडातून सोडविण्यासाठी भारतीय संविधानात समता, स्वातंत्र्य, बंधुभाव, सामाजिक न्याय या तत्वांचा समावेश केला. तो या तत्वांशी सुसंगत असा समाज निर्माण करण्यासाठी, हा त्याचा खरा अर्थ आहे. म्हणजे समता, स्वातंत्र्य, बंधुभाव, सामाजिक न्यायला जे जे हानिकारक आहे ते ते नाहीसे करणे हे ओघानेच आले. याचा दूसरा अर्थ समता केवळ संविधानात असून चालणार नाही, तर ती समाजात असयला हवी म्हणून समाजात बदल घडवून आणणे अपरिहार्य ठरते.

त्यासाठी बाबासाहेबांच्या स्वप्नातील कामगार, शेतकरी, दलित, महिला यांची स्थीती काय? याचा परामर्श घेणे भाग आहे. बाबासाहेबांनी यांच्यासाठी पाहिलेले स्वप्न पूर्ण झाले असे आज म्हणता येणार नाही. त्याला अनेक कारणे असू शकतात. मात्र त्यावर उपाय शोधले जाऊ शकतात. त्यासाठी गरज आहे अधिक आंबेडकरवादी आणि संविधानवादी होण्याची.

शेवटी आपल्या ६५ वर्षाच्या अल्प वयात एवढी महान कामगिरी करणाऱ्या महापुरुषाचे वर्णन त्याच्याच शब्दात केले जाऊ शकते, जीवन लहान असले तरी चालेल पण महान असले पाहिजे.

{वैभव अनिल अलई}

# विषयांचे नाव: लघु उद्योगासमोरील संधी आणि आव्हाने

**डेमोस्थेनिस म्हणाले आहेत की छोट्या संधी बऱ्याचदा मोठ्या उद्योगाच्या सुरुवातीस असतात.**

**लघु उद्योग म्हणजेच एसएसआय(Small Scale Industries) हे असे उद्योग आहेत जे छोट्या प्रमाणावर उत्पादन करतात किंवा उत्पादन करतात. या उद्योगांचे दोन प्रकारांमध्ये वर्गीकरण केले जाते अर्थात उत्पादन उत्पादन व सेवा उपक्रम. स्वातंत्र्यापूर्वी भारत केवळ कच्चा माल पुरवठा करणारा आणि तयार वस्तूंचा आयातकर्ता होता. पण हे परिस्थिती आता बदलली आहे. गांधीजी, लाल बहादूर शास्त्री जी यांच्यासारख्या अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी लघुउद्योगांचे महत्त्व पटवून दिले आहे. एसएसआय प्रभावी, कार्यक्षम, लवचिक आणि नाविन्यपूर्ण उद्योजकीय मानसिकतेसह विकसनशील अर्थव्यवस्थेचा आधार आहे. भारताच्या परराष्ट्र व्यापार धोरणात बदल झाल्याने लघु उद्योगांना मोठ्या प्रमाणात चालना मिळू लागली आहे. भारत सरकारने परदेशी वस्तूंवर शुल्क लादले आहे, कोटा यंत्रणा बनली आहे आणि तेथे आयात प्रतिस्थापन आहे. आयात प्रतिस्थापन म्हणजे आम्ही निर्यात करण्यासाठी वापरली जाणारी कोणतीही गोष्ट भारतातच तयार केली जाते. कंपन्यांना त्यांची उत्पादने भारतात तयार करण्यास प्रोत्साहित करण्यासाठी आणि मॅन्युफॅक्चरिंगमध्ये समर्पित गुंतवणूकीला चालना देण्यासाठी प्रोत्साहित करण्यासाठी मेक इन इंडिया 25 सप्टेंबर २०१ on रोजी भारत सरकारने सुरू केली होती. एसएसआय ग्रामीण तसेच शहरी लोकसंख्येच्या मोठ्या प्रमाणात रोजगार पुरवठा करणारे असल्याचे सिद्ध करते. शहरी आणि ग्रामीण लोकसंख्येमधील दरी कमी करणारे एसएसआय ग्रामीण लोकसंख्येस नवीन कौशल्य प्रदान करते. एसएसआय श्रम-केंद्रित असतात अर्थात मशीनपेक्षा काम जास्त करतात. एसएसआय समाजातील उत्पन्न वितरणास मदत करते अशा प्रकारे खरेदी शक्ती समता म्हणजे पीपीपी वाढवते. यामुळे समाजातील दुर्बल घटक वाढण्यास मदत होते. एसएसआयच्या माध्यमातून लोक कल्याण साधले जाते. उदाहरणार्थ एकल आई आपल्या मुलास कंपनीमध्ये क्रॅचे सुविधा पाठवू शकते आणि त्याचबरोबर ती नोकरी देखील करू शकते. दोन्ही महिला रोजगार आणि मुलांच्या काळजीची जबाबदारी नियोक्ता घेतो. लघुउद्योगांकडून महिला सबलीकरण प्रदान केले जाते. लघुउद्योगांची अशी अनेक उदाहरणे आहेत जी महिलांकडून पूर्णपणे मालकीच्या आहेत आणि त्यांचे काम आहेत. उदाहरणार्थ लिज्जत पापड इ. एसएसआय आमच्या**

लोकसंख्येच्या विविध प्रकारच्या वस्तू आणि सेवा पुरवते ज्यामुळे त्यांचे जीवन सुकर होते.
लघु उद्योग मोठ्या प्रमाणात उद्योगांना समर्थन देतात उदाहरणार्थ कार कार उत्पादन करणाऱ्या कंपनीने रबर्स, चेसिस इत्यादींचे सुटे भाग छोटे उद्योगांकडून विकत घेतले. म्हणूनच लघु उद्योगांना देशाचा कणा म्हणतात.
पूर्वी लघुउद्योग काही भागात केंद्रित होते परंतु आता तेथे क्षेत्रीय उद्योग पसरत आहेत ज्यायोगे इक्विटी होते. भारताच्या निर्यातीत वाढ झाली आहे. १7171१-72२ निर्यात १ 155 कोटी होती. २०१ 2018 मध्ये भारताने एकूण B२6 बी डॉलरची निर्यात केली आणि ती जगातील १ in व्या क्रमांकाची निर्यातदार ठरली. एकूण निर्यातीत एसएसआयचे योगदान 40% आहे. लघु उद्योग केवळ भारताचा जीडीपी वाढवत नाहीत तर देशातील परकीय साठाही वाढवत आहेत. हे देशाच्या पेमेंट बॅलेन्स (बीओपी) मधील दबाव कमी करण्यात योगदान देते. एसएसआय आम्हाला स्वावलंबी होण्यास मदत करते. ग्राहकांच्या गरजा भागविण्यासाठी भारताला प्रचंड बाजारपेठ मिळाली आहे.
संधींसह लघु उद्योगांनाही काही आव्हाने आहेत. एसएसआयकडे पायाभूत सुविधांचा अभाव आहे. एसएसआयच्या वाढीसाठी मजबूत पायाभूत सुविधा महत्त्वपूर्ण भूमिका निभावतात. पायाभूत सुविधांचा अभाव हे एक कारण म्हणजे पतपुरवठा सहाय्य नसणे. क्रेडिट सहाय्य सहसा व्याज उच्च दर असते. एसएसआय पतपुरवठा मदतीसाठी आणि स्थानिक सावकारांच्या सहाय्याने मदत करण्यास मागेपुढे पाहत नाहीत. लघुउद्योगांना आधार देण्यासाठी भारत सरकारकडे विविध योजना आहेत. परंतु लोकांना बऱ्याच योजनांची माहिती नसते. म्हणून एक योग्य चॅनेल सेट करणे आवश्यक आहे जेणेकरुन सरकारी योजना आणि एसएसआयमधील दरी कमी होईल.
एसएसआय पुढील आव्हान कौशल्य आहे. जागतिकीकरणामुळे एसएसआयला जागतिक समुदायासह वाढण्यासाठी नवीन अपग्रेड केलेल्या तंत्रज्ञानाची माहिती असणे आवश्यक आहे. एसएसआयने जागतिक समुदायाशी संपर्क साधला पाहिजे आणि तंत्रज्ञान, कौशल्य, मानव संसाधन इत्यादी बाबतीत ते मागे राहणार नाहीत याची खात्री करुन घ्यावी. ताज्या घडामोडींविषयी ज्ञान नसणे म्हणजेच स्पर्धात्मक किनार नसणे. आणखी एक आव्हान म्हणजे विपणन धोरणांचा वापर. लघु उद्योगाने उत्पादित केलेली उत्पादने विकण्यासाठी विपणन ही गुरुकिल्ली आहे. म्हणून विपणनासाठी विविध प्लॅटफॉर्मचा वापर केला जाऊ शकतो. बाजारातील शक्तींचे मर्यादित ज्ञान आहे - मागणी आणि पुरवठा. एसएसआयमध्ये स्त्रोतांची कमकुवत संघटना पाहिली जाते. व्यवसायाच्या योजनेवर पारंगत नाही. चांगली व्यवसाय

**योजना संसाधनांच्या संघटनेत मदत करू शकते. व्यवसाय कार्यक्षमतेने वाढविण्यासाठी संसाधन ऑप्टिमायझेशन केले जाऊ शकते.**

**कोविड - १ या वर्तमान परिस्थितीनंतर लघु उद्योगांसाठी बऱ्याच संधी आणि आव्हाने आहेत. कोविड - १ एक आपत्ती आहे ज्यासाठी जग तयार नव्हते. या वेळी कोविड या परिस्थितीसह जगण्याच्या वास्तविकतेला सामोरे जाण्याची वेळ आली आहे. स्वच्छता सुविधा, आरोग्य आणि वैद्यकीय सेवा सुविधा, शेती, हरित अर्थव्यवस्था, हवामान अनुकूल अर्थव्यवस्था, दुर्गम कामकाजात अनेक संधी उघडल्या आहेत. लघुउद्योगांना सध्याच्या परिस्थितीसह अद्ययावत केले जाणे आवश्यक आहे आणि त्यानुसार भारताच्या उन्नतीसाठी कार्य करणे आवश्यक आहे. चांगले नेतृत्व गुण आणि व्यवस्थापकीय कौशल्य अंगभूत असण्यामुळे लघु उद्योग एक नवीन मैलाचा प्रगतिदर्शक घटना मिळवू शकतात. जॅक वेलच म्हणाले आहेत की, "चांगले व्यापारी नेते दृष्टी तयार करतात, दृष्टी स्पष्ट करतात, दृश्यास्पद असतात आणि दृढतेने ते पूर्णत्वास नेतात."**

{कोमल शिवाजी मुळे
8668784338 / 7756838455}

# शोध सुखाचा

प्रत्येक नवीन वर्षात काही नवीन केले पाहिजे अस वाटत, पण ते करण्यासाठी कोणाकडेच वेळ नसतो आणि म्हणून आपण आधुनिकतेच्या वाऱ्यात सुखाला शोधत बसतो.

प्रत्येक नवीन वर्षात काही तरी करून धावणारे आपण, एक लहान गोष्ट विसरतो, कि त्या नवीन वर्षाच्या मनात काय आहे ? त्याला आपल्या कडून काय करून घ्यायचे आहे ? आपणास काय जाणीव करून द्यायची आहे?

अश्या वेळी एक अस वर्ष येत  कि जे आपल्याला आत्मचिंतन करण्यास भाग पाडत, विचार करायला भाग पाडत कि सुखाच्या शोधात धावणारे आपण ... स्वतः तर थकून गेलो आहोत पण सुख शोधायचे कुठे आणि ते काय असते हे हि विसरून गेलो आहोत...

आणि मग असा एक शब्द कानावर पडतो ज्यातून सर्वात गुंतागुंतीचे प्रश्न "माझ्या कडे वेळ नाही", “मलाच का नुसते त्रास सहन करावे लागतात “, ह्याच उत्तर मिळतं आणि आत्मनिरीक्षणाची संधी मिळते. असा तो शब्द म्हणजेच "लॉकडाउन".

वर्षाच्या सुरवातीला, माझ्या कानावर ह्या शब्दाचा मारा पडला, लहानापासून मोठ्यांपर्यंत प्रत्येक व्यक्ती वेळ कसा घालवावा हा विचार करत होती, तसा मी पण. आता उतरत्या वयात घरात बंद राहणं म्हणजे प्रत्येकाला अवघड वाटते.

पण मी मात्र ठरवलं कि हा वेळ सदुपयोगी लावायचा, घरात जरी बंद असलो तरी मनाचे दार उघडावे.जुनी सर्व पुस्तक वाचून काढली, जुनी जुनी आवडती गाणी ऐकली, काही पदार्थ बनवायच्या फर्माईशी पण केल्या. आणि मग एक दिवस असा आला कि त्याने माझे संपूर्ण समीकरण बदलून टाकले. त्या दिवशी एक युद्ध झाले आणि त्यात दोनीही पक्ष जिंकले अर्थात माझं मन आणि मी. तो दिवस माझा चांगला लक्षात आहे. त्या दिवशी,

सायंकाळचा चहा झाल्यानंतर मी माझी आवडती गाणी ऐकत होतो, तेवढ्यात एक गाणं चालू झालं, प्यासा चित्रपटातील साहिर लुधियानवी यांच गीत

"हर एक जिस्म घायल, हर एक रुह प्यासी

निगाहो में उलझन, दिलों मे उदासी

ये दुनिया है या आलम-ए-बदहवासी

ये दुनिया अगर मिल भी जाये तो क्या है..."

आणि हे शब्द ऐकून माझ्या मनातल्या विचारांना वेग मिळाला, गाणे ऐकताना मी विचार करू लागलो, ह्या जगात प्रत्येक जीव हा दुःखी आहे व प्रत्येक जीव हा सुखासाठी धडपड करत आहे, सुखाच्या शोधात आहे. पण सुख म्हणजे काय हे कोणाला कळत नाही, प्रत्येकाची सुखाची व्यख्या वेगळी असते. मला वाटत सुख हे मृगजळा प्रमाणे असते, जेवढे आपण धावतो तेवढे अजून दूर पळते. आणि मुख्य म्हणजे ते दिसत सुद्धा नाही, संत तुकाराम महाराज म्हणतात

"सुख पाहता जवापाडे । दुःख पर्वता एवढे ॥"

कोणाला नवीन वस्तू घेण्यामध्ये  सुख वाटते, पण ती वस्तू मिळाली कि तिची किम्मत शून्य....परत येरे माझ्या मागल्या..... आसक्ती वाढत जाते, तृष्णा संपत नाही. आपल्या माना सारखें झाले तर सुख ,नाही झाले तर दुःख. आपण आपले रडगाणे दुसऱ्या जवळ सांगतो.. पण तो दुसरा तरी सुखी आहे काय.... रामदास स्वामी म्हणतात

"जगी  सर्व सुखी असा कोण आहे...."

मग सूख समाधान आहे तरी काय ?

सुख-समाधान हि काही पैश्यानं मिळणारी गोष्ट नाही

**आपले मन भीती, चिंता, इर्षेने ग्रासले असेलतर सुख- समाधान कोठून मिळणार**

**त्यासाठी मन निर्विकार, निर्विकल्प झाले पाहिजे.. हे कसे होणार?**

**इथे मला एक प्रसंग आठवला**

**एक व्यक्ती एकदा एका दुकानात गेली, तिथे प्रत्येक डब्यावर वस्तू चे नाव लिहिले होते जसे कि साखर, गूळ, बदाम, काजू...**

**मात्र एका डब्यावर काहीच लिहिले नव्हते, त्या व्यक्तीने दुकानदाराला विचारले ह्यात काय आहे,**

**त्यावर तो म्हणाला ह्यात सद्गुरू आहेत... सद्गुरू...**

**क्षणभर शांतता परसरली कारण त्या व्यक्तीस कळले नाही कि काय बोलावे...**

**क्षणात दुकानदार म्हणा**ला आहो **हा डबा रिकामा आहे...**

**हि विचार करण्यासारखी गोष्ट होती, डबा रिकामा म्हणजे त्यात सद्गुरू...**

**म्हणजेज जर आपले मन रिकामे असेल , त्यात  काम, क्रोध, मोह, भय, चिंता नसेल तरच त्यात सद्गुरू चा वास राहील**

**मग सुख-समाधान किती दूर राहील..**

**पण त्यात एक मोठी अडचण आहे ... सद्गुरू मिळत नाही...**
**होय,सद्गुरू मिळत नाही... गुरु पुष्कळ मिळतात... मात्र सद्गुरू नाही...त्यासाठी आपले पूर्वज संचित असावे लागते.**

**सद्गुरू चा प्रत्येक शब्द हा आपल्या कल्याणासाठीच आहे, हि खूण-गाठ जो मनाशी बांधतो तोच उत्तर -उत्तर प्रगती पथावर जातो.**

**सेवा जशी वाढते तसे अनेक अनुभव येत जातात, सद्गुरुंना फक्त कल्याण करावयाचे असते, त्यात स्वार्थ नसतो**

**त्यांची दिव्यवानी प्रेमळ द्रुष्टी, मायेची सावली, हीच आपल्या सुखाच्या पायरी पर्यंत घेऊन जाते.मी सगदुरुंचा महिमा काय वर्णावा . सद्गुरूच्या मार्गदर्शनाने आपले जीवन सुधारते. एक वेगळा प्रकाश द्दष्टीस पडतो, दिसतो फक्त आनंद...आनंद... आनंद...सद्गुरूनी सांगितलेली सेवा केली कि मन निरिच्छ होते.मग सुख समाधान ह्याची प्राप्ती होणे हे काही कठीण नाही.**

**सध्यस्थितीत आपणास प्रत्येक देवस्थानात , मंदिरासमोर गर्दी दिसून येते, म्हणजे आपण अत्यंत भाविक झालो आहो अस म्हणता येईल काय ?**

**अर्थात नाही... उलट माझ्या मते आपण अत्यंत दुःखात, अडचणीत आहोत आणि म्हणूनच आपण देवासमोर गार्हाने मांडतो.**

**येथे कवीचे शब्द चपखल बसतात "हर एक जिस्म घायल, हर एक रूह प्यासी"**

**प्रत्येक जीव आत्मा हा अडचणीने, दुःखाने जखमी झाला आहे. प्रत्येक आत्म्याला  एक प्रकारची तहान सतावत आहे, काय  करावे समजत नाही अशी प्रत्येकाची अवस्था आहे, आणि म्हणून सद्गुरूला शरण जाणे, मनोभावे स्मरण करणे हा एक मार्ग आहे**

**शोध तर सुरूच राहील पण दिशा मात्र मिळाली...पण मला शांत वाटत होते.. अश्या विचारानंतर परत मी माझ्या दैनिक मार्गावर आलो आणि पुढची गाणी ऐकू लागलो.**

**{संजय चेपे}**

# आनंदाची झालर

त्याच अचानक जग सोडून जाणं जरा खटकलं,
पण त्यातचं त्या बाईचं बाई पण हरपलं,

तिच्या सौदर्याचा संबंध फक्त तिच्या कुंकवाशी होता,
त्यानं जाताना याचा कुठे विचार केला होता.

वखवखलेल्या नजरा आता तिला बोचत आहेत,
बाई आता जगण्याचा आधार शोधत आहे,

तिच्यातल्या तिने कधीच चितेत उडी घेतली,
पण मुलाच्या भुकेल्या नजरेने जगण्याची उमेद भेटली,

पण मनाचं काय ते कुठे गुंतवाव,
स्वतः च्या आवडली आता बुडवाव,

अनेकदा मनात आलं तू कोण आणि स्त्रित्व कुणासाठी,
तिचा दुःख आणि त्रास तिच्यापाठी,

तिची कुचंबणा तिलाच जाळते आहे,
तिच्याल्या तिला मारते आहे,

माझ्यातलं जगणं त्याच्या बरोबर गेलं,
फक्तं मारायचा वाटा मागे सोडून गेलं,

कणव करणारे आता टोचत आहेत,
त्याला गमवल्याच बोच देत आहेत,

एका विधवेला यापेक्षा नरक कुठे दिसेल का,
कधी आनंदची झालर तिला मिळेल का.??

{अरुणा धनंजय विचारे}

# फुलवा

**कुणी घातला अंगणी माझ्या प्राजक्ताचा सडा ?**
देठ केशरी, शुभ्र पाकळ्या
"भामेच्या" पाणावल्या कडा

**लाल, पांढरे झुपके लोंबती**
अहो, ही तर, मधुमालिनी !
रंगांच्या अगणित छटा
पसरवी मनोमनी

**नाजूक,इवल्या तीन पाकळ्या खरोखरीच ती अबोली !**
ताटव्या मधूनी हळूच पाहते,
नववधू पाहू कशी सजली !

**कशी फुलली धुंद,मंद**
गंधाळलेली रातराणी !
जणू नभीच्या तारका
उतरल्या मम अंगणी

**कसा बहरला अंगोपांगी**
मादक हा मोगरा !
मधुमिलानाचा सोहळा
याविण कसा होईल साजरा ?

**{सुवर्णा बाबुराव कळसे}**

# माती

**माती रुजवते कसे**
एक बीज अंतरात
आणि मोहरती जसे
प्राण प्राण अंकुरात

**माती अंगिकारे वसा**
दाट हिरवेपणाचा
उमटवी खोल ठसा
आत नवनिर्मितीचा

**माती फुलविते नाती**
आंतरिक जिव्हाळ्याने
माती जपते विश्वास
पुन्हा नव्याने नव्याने

**माती बाळगते गंध**
एक आपलेपणाचा
माती दृढावते बंध
एक माणूसपणाचा

**{मंजुषा कुलकर्णी}**

# !!!!! मुठेची कैफियत !!!!

सह्याद्रीच्या मावळ हृदयी जन्मा जी आली,
गटार म्हणुनी घ्यायचे आले आज तिच्या भाली ----[१]

मी नच उगमतें यदाकदाचित सह्याद्रीपोटी,
कधीच न वसते गाव पुनवडी, मम तिराकाठी ----[२]

त्या इवल्या पुनवडीस मी अमृतजल पाजिले,
पिउनि ते जल त्या बालेने रूप कि हो धरिले -----[३]

परमपावन माँ जिजाऊ घेऊनि शिवबाळाला,
फिरावी सोन्याचा नांगर या मम तीराला ----[४]

पुण्यश्लोक त्या मायलेकांचे घेउनी दर्शन,
धन्य जाहले झुळझुळणारे हे मम जीवन ----[५]

परमपराक्रमी प्रथम बाजीराव घेउनी समशेर,
मज ओलांडुनी चढवी स्वारी त्या दिल्लीवर ----[६]

किती उलटली इतिहासाची पाने मजपुढती,
परी तसेच राहिले झुळझुळणारं पाणी निर्मळ किती ---[७]

स्वतंत्र झाला देश जाहली औद्योगिक क्रांती,
प्रचंड जाहले घाण, प्रदूषण, फुगली शिरगणती ----[८]

लोकमाता मी तुमची आणि तुम्ही माझे पूत,
निर्मळ माझे पाणी सोडले सांडपाणी त्यात ----[९]

भिकारीण अशी करुनि टाकीली,तुम्हीच आपुली माय,
गटारलेल्या या शरीराचे सांगा करू काय ? ----[१०]

नका लोटू मज मृत्युशय्येवर, विनविते मी दीनवाणी,
मुक्त करा मज महारोगातून, तरीच म्हणवा पुत्र ऋणी ---[११]

{अजय चव्हाण}

# रडत मात्र बसू नकोस

**सगळे तुझ्यावर हसतात म्हणून रडत मात्र बसू नकोस,**
वर्तमान रडण्यात घालवून तू तुझा भविष्यकाळ पूसु नकोस...

**काही नाही तुझ्याकडे असं मात्र समजू नकोस,**
डोक्यात तुझ्या मेंदू , मनगटात बळ आहे इतकं मात्र विसरू नकोस...

**झालं गेलं विसरून जा लाग नव्या उमेदीने कामाला,**
दाखवून द्यायची वेळ आली तू काय आहेस ते या जगाला...

**स्वतःसाठी जगण्यापेक्षा इतरांसाठी जगून बघ,**
तुला काय हवंय ते सर्व मिळेल मग...

**घाबरून कसं जमेल आता वेळ आली लढायची,**
तुझी स्वप्न साकारून सद्य स्थिती बदलायची...

**आत्मविश्वास कायम ठेव भीती कशाचीच नाही वाटणार,**
सत्याच्या मार्गावर मात्र तू आयुष्यभर चालणार...

**मरेपर्यंत लक्षात ठेव असत्याचा मार्गावर चालू नकोस,**
वर्तमान रडण्यात घालवून तू तुझा भविष्यकाळ पुसू नकोस, भविष्यकाळ पुसू नकोस..

**{अजिंक्यतारा. ऑंकार संतोष सुमारे**
**संपर्क- 9076070728}**

# प्राजक्त एवढासा दारासमोर फुलतो

प्राजक्त एवढासा दारासमोर फुलतो
न्यारा सुगंध त्याचा आभाळभर पसरतो..
नकली असे मुखवटा फसगत सदैव होते..
दिसतो समोर चेहरा तो वास्तवात नसतो..
मुसळास शोधताना डोळ्यात रोज त्याच्या
कुसळास पाहण्याला माझ्याच का विसरतो..
सत्यातला भिकारी भिक्षेत दंगतो मी
स्वामी तिन्ही जगाचा स्वप्नात रोज असतो..
तुम्ही मला असे का वै-यासमान बघता
झालो कवी जणू हा माझा गुन्हाच ठरतो.

{विजयकुमार देशपांडे, सोलापूर

मो. ९०११६६७१२७}

# आठवणीतला पाऊस

भरसुगीच्या दिसात
उगवती समोरून .
निघाला एक ढग
आलं आभाळ भरून .

गर्जे राक्षसी आभाळ
बेधुंद सुटला वारा.
विज कडाडली वर
पडतात  मग गारा.

सुट्टी  शाळेला  लागली
मला आठवतो दिसं
शेळ्या कोकरांच्या संग
जीव होतो कासावीस

सुगी सारी पागंलेली
सुटे वारा अवकाळी
काळकुट्ट आभाळ हे
फोडुलागे डरकाळी

कुठं गाठला निवारा
कसातरी माणसाने
झोडपली जितराब
गारासह पावसाने

{दत्ता वालेकर , 9421440922
dattawalekar@gmail.com}

# अनुबंध

तुझे माझे अनुबंध
बकुळीचा जणू हार
सुकलेल्या क्षणांना ही
येतो सुगंध अपार

कढ कोंडते जे आत
बने त्याचेही अत्तर
गंधाळतो देह सारा
मनी तुझाच जागर

मन कोरडे कराया
केली रिती मी घागर
आठवांचा कढ येता
पुन्हा पाझरे पाझर

पुन्हा रुजते नव्याने
पुन्हा येतसे बहर
पुन्हा सुकती नव्याने
पुन्हा उमले अत्तर

काय म्हणू या नात्याला?
'तुचं' प्रश्न नि उत्तर
जीवाशीवाचे हे बंध
इथे नुरते अंतर

{कविता नवरे}

# सखे तुझ्याच साठी

सखे तुझ्याचसाठी
लिहिते मी आज
जागवाया तुझा
आत्मविश्वास झोपलेला...!! धृ!!

फेक तुझे ते शस्त्र
जुनेच अश्रूंचे
इथे प्रत्येकाच्या भावनांचा
समुद्र आहे आटलेला..!!१!!

बघीतल्या नाहीत कधी
जिजाऊंनी रेषा हातावरच्या
सोड तुही आता
हा विचार बुरसटलेला..!!२!!

नशिबाला दोष देत कधी
रडली नाही सावित्री
सोडू नकोस कधी
तिने विचार सांगितलेला...!!३!!

विचारांनी बनव तू
सुंदर स्वतःला
नश्वर असते कधीही
देह अलंकारांनी नटलेला...!!४!!

स्वार्थी या जगात
माणसे ओळखणे कठीण
मुखवट्यांमधून ओळख तू
खरा चेहरा झाकलेला...!!५!!

जगाण्यासाठीच फक्त जगतो
जो-तो आज इथे
देव पुजने सोड तू
अस्तित्वच नसलेला...!!६!!

भावनांवर जगणे
पुरे झाले आता
आवरायला शिक तू
हुंदका दाटलेला...!!७!!

मुक्त तुझ्या विचारांना
दाखव दिशा नवी
भोवती तुझ्या संधीचा
वारा उधानलेला...!!८!!

{सौ.लता अनिल बहाकर(तळोकार)
9011316906,bahakarlata@gmail.com}

# तिला कविता आवडत

तिला कविता आवडत नाही.
त्याला कविता आवडते....(२)

मन दाटून आलं की,
ती त्याच्या तावडीत सापडते.

मी तुला आवडतो,
पण कविता आवडत नाही....(२)

अस वागणं तुझं,
मला मुळीच पटत नाही.

कविता म्हणजे, गर्दी सारा
कविता म्हणजे, अडगळ
कविता म्हणजे, कागद कोरा
कविता म्हणजे, तळमळ

कवितेत शुध्द हरपते
नुसती वैतागवाडी....(२)

कविता शब्दांची पायवाट
कविता म्हणजे, हिरवी झाडी

कवितेत रेंगाळती कामे
बैठक तासंतास....(२)

कवितेमुळे गुपचुप निसटुन
बंक केले कित्येेक क्लास.

रोजच्यारोज कविता बनते,
रोजच्यारोज असं होतं....(२)

कवितेमुळ भांडण होऊन,
मित्रांमधे हसं होतं.

कविता आवडत नसल्या तरी
तो तिला आवडतो....(२)

कविते सोबत आवडावा
म्हणून तोही झगडतो.

चिडून मग तो निघून जातो
रडत बसतो पायऱ्यात....(२)

असं तिच त्याच भांडण
आडकलं कवितेच्या भोवऱ्यात.

----*----

{आशुतोष अरूण महागांवकर}

# ॥ श्रीकृष्णस्वरूप राधा ॥

ती फुलराणी राधा, साज तिचा साधा ।
सौंदर्य आगळे, यमुनाकाठी खेळे ।
निसर्गफुले वेणीत गुंफले ।
मन मात्र श्रीकृष्णचरणी लोळे ॥१॥
क्षण क्षण 'श्रीकृष्ण' नाम स्मरून झाले
हृदय पवित्र ।
श्रीकृष्णचरणी विलीन होणे हे एकच
जीवनाचे सूत्र ।
नेत्रात गोजिरे रूप दिसे 'श्रीकृष्ण' ।
अंत:करणात दिव्यरूप स्मरे 'श्रीकृष्ण'
॥२॥
श्रीकृष्णरूप झाली राधा ।
जीवनाला अर्थ मिळाला त्या
फुलांसारखा साधा ।
नित्य फुलावे नित्य गंध उधळून द्यावा ।
देह सारा श्रीकृष्णचरणी समर्पित व्हावा
॥३॥
असेच पुष्पमय जीवन शोधत आहे दिन
रात ।
श्रीकृष्ण श्रीकृष्ण असे गात गात ।
राधा होण्याची आस आहे मोठी ।
पण भ्रमररूपी मनाची बुद्धी आहे
खोटी ॥४॥
हे राधे, माझ्यावर आता एकच कृपा
कर ।
तुझे मन मला थोडे उमजेल असे कर ।
हे राधा, मलाही त्या धामाला यायचे
आहे ।
तुझ्यासम प्रत्येक श्वासावर श्रीकृष्ण
लिहायचे आहे ॥५॥



{स्केच-अयुष्का जोशी, कविता-डॉ कल्पना देशमुख}

# किती बदलले वेश

किती बदलले वेश, किती बदलले देश
अनोळखी एक वेस, भासती आपुलकीचे..

किती बदलले रस्ते, किती बदलल्या वस्त्या
अनोळखी एक वाट, भासते आपुलकीची..

किती बदलली गावे, किती बदलली नावे
अनोळखी एक पत्ता, भासतो आपुलकीचा..

किती बदलल्या भाषा, किती बदलल्या बोली
अनोळखी एक शब्द,  भासतो आपुलकीचा..

किती बदलला काळ, किती बदलली वेळ
अनोळखी एक क्षण, भासतो आपुलकीचा..

किती बदलली नाती, किती बदलले गोत
अनोळखी एक कुणी, भासतो आपुलकीचा..

जिवापाड जपू वाटे, जरी अनोळखी सारे
नजर एक नि:शब्द, भासते आपुलकीची..

होताना पापणी चिंब, थेंब ते कुजबुजती
अनोळखी काही नाही, ती साद आपुलकीची

{वैशाली मोहिते}

---

# पाऊस वारीत वाजवितो टाळ

पाऊस वारीत वाजवितो टाळ...
मृदंग आभाळ भरोनिया..
नाचती विजांचे झेंडें आटोकाट..
अबिराचा थाट भाळावरी..
माथी वृदांवन जन्माची तुळस..
नाचती कळस भक्तांसवे..
**वाऱ्याचा** जागर धरे हरीताल..
त्याची उलाढाल अभंगात..

आ**शीर्वाद** गायी मुखे मुक्त विणा..
माऊलीला वेणा भक्तांसाठी...
सर सर झरे नामांची ही माळ..
ओलेता कल्लोळ कंठामध्ये..
धडके वादळ गर्जते हे नाम..
विठाईचे काम चित्त शांतवणे..
भक्तीरंगे भिजे अवघा कोलाहल..
पावतो विठ्ठल पावसाला..

{सन्दिप अवचट}

# लॉक डाऊन

" कामावरल्या बाया म्हणत होत्या, ते चीनच्या वोन शहरात म्हणे पाहिला करोनाचा रुग्ण सापडला आणि आख्या चीनमध्ये म्हणे त्याची लागण झालीया. तिथून म्हणे आपल्याकडे त्याच लोण आलाया "

"वोन नाही माय ते वूहान आहे. अग कधीतरी टी.व्ही.च्या बातम्या बघत जाव्या. कामवाल्या बायकांकडूनच कशाला सगळ कळायला हवं? टी.व्ही. वरच्या बातम्यातून संमद समजत की.अग अन त्या बायकांबरोबर राहतीस तेव्हा त्याचं पाहून थोड शुध्द बोलायला शिक ना!"

"मला कुठे शुध्द बोलून कालिजात जायचं हाय? अन टीव्हीच म्ह्न्तीया पण 'आशी' येळ कुठ असतोय मला टी.व्ही. बघायला? तूच तर सकाळी आठ वाजता कामावर नेऊन सोडतीया मला. आणि संध्याकाळी साडेसात कधी आठ तर कधी साडेआठला घरी घेऊन येतीया मला. सकाळी घरच उरकायचं आणि आल्यावर पुन्हा घरचं हायच की! कुठल्या बातम्या अन कुठली सिरीयाल? सार आयुष्य असचं लोकांच्या घरची धून भांडी आणि पोळ्या लाटण्यात जाणार. अन पुन्हा कामावरच्या बायांची कुचकी बोलणी खायाची. कुणाला बी दया नसती. सर्वांना फकस्त काम दिसतया. 'काही खाल्ल का? पाणी देऊ का? कधी तरी कुणी बाई इचारणार. नाहीतर आहेच रोजच अर्धपोटी धावत पळत काम ओढायचं."

"अग माय मी तुला समजावते, चीन देशात हा आजार खुप वाढला, हा आजार संसर्गजन्य आहे.त्याची सर्व लोकांना लागण व्हायाला लागली म्हणून तिथे लॉक डाऊन जाहीर झालं. म्हणजे समद्या बाजारपेठा बंद झाल्या.सारी शहर सुनसान झाली. त्याचा जागतिक बाजारपेठेवर पण परिणाम झाला. जगातले इतर लोक त्याबाबत हळहळ व्यक्त करीत होते. तरिही आपल्या पासून काय हा आजार कोसो दूर आहे या गोड गैरसमजात गाफील होते ग. ह्या आजाराचं गांभीर्य कुणालाच नव्हत. त्यामुळे इतर देश चीनच्या लोकांना आपल्या देशात येण्यापासून रोखत नव्हते. आणि इथेच सारी गडबड झाली बघ. हा विषाणू सगळ्या देशात, सगळ्या जगात घुसला आणि हातपाय पसरायला सुरुवात केली त्याने मग सगळे देश खडबडून जागे झाले. आणि उपाय यंत्रणा सुरु केल्या. एक

छोटा विषाणू पण त्याने आख्खा जगाला त्रस्त करून हैराण करून सोडले आहे बघ. सगळ जनजीवन विस्कळीत करून टाकल हाय. सध्या बरेच देश  न भूतो न भविष्यती अशा महासंकटात, करोनाच्या विळख्यात सापडले आहेत. हा अजगराचा विळखा माणसांना गिळत चालला आहे.फक्त आपल्याच देशात नाही तर जगभरात ह्याचा धुडगूस चालू आहे ’’

“ आशी तुझ बोलण जास्त काय मला समजत नाय. तू कॉलेजला जातीया, शिक्षण संपल्यावर खूप मोठी आधिकारी होणार. माझ्या कामवाल्या बायांसारखी मोठ्या पगाराची नोकरी तुला मिळणार एवढ मला माहीत आहे. मग तरी मला विसरू नकोस बाये. तुझ्या आशेवर जगत हाय मी. धुण भांडी सोडून देता येईल, तुझ्या बाकडे जरा लक्ष देता येईल.  सर्वजण सुखाचा घास खाऊ. तुझ लग्न, नवं घर, काय काय सपन हायत बघ माझी.माझ्या आशीच संमद चांगल होऊ दे असं रोज देवाला म्हणते. देवाची कृपा होईल तेव्हा खर बघ.”

“काळजी करू नकोस माय, मी आहे. मीच तुझा मुलगा आणि मीच तुझी मुलगी बघ.” आपल्या बेकार, नशेच्या आहारी गेलेल्या मोठ्या भावाकडे एक तुच्छतेचा जळजळीत कटाक्ष टाकत आशा बोलली.

भारताच्या उंबरठ्यावर असलेला हा करोना अजगर भारतात न कळत घुसला. त्याने आपला विळखा घट्ट करण्या अगोदर आपल्या भारत सरकारने त्याला हुसकावून लावण्याची उपाय यंत्रणा सुरु केली आहे. इतर देशाच्या अनुभवावरून भारताने आधीच बिकट परिस्थिती टाळण्यासाठी कडक पाऊले उचलली आहेत. लॉक डाऊन सुरु झाला आहे पण कालावधी वाढतच चालला आहे. त्यामुळे नवेच प्रश्न समोर येत आहेत. गोर गरिबांच्या आणि मजुरांच्या हातची कामे गेली आहेत. घरकाम करणाऱ्या बायका सध्या घरी बसून आहेत. ज्या घरी त्या काम करतात त्या घरच्या लोकांनी जर दया दाखवून फुकट पगार दिला तर ठीक. नाहीतर ह्या लोकांचे हालच आहेत. दुर्गा ही अशीच घरकाम करणारी बाई.

दुर्गाच्या घरात तिचा नवरा अंथरुणाला खिळून असलेला. दुर्गाला एक मुलगा आणि एक मुलगी. मुलगी सी. ए. च्या  शेवटच्या वर्षाला तर मुलगा तिच्यापेक्षा मोठा २६ वर्षाचा. झोपडपट्टीत राहणाऱ्या इतर मुलांच्या वाईट

संगतीत राहून बिघडलेला. एक पैशाचीही कमाई न करणारा. एकूण काय तर सारा प्रपंचाचा डोलारा दुर्गाच्या खांद्यावरच! कष्ट म्हणजे किती कष्ट करावेत याला सीमाच नाही. सकाळी आठ वाजता दुर्गा कामावर येते ते संध्याकाळी साडेसात पर्यंत सोसायटीत कामाचे ढिगारे उपसतच असते. कधीतरी एखाद्या बाईला तिची दया येते आणि म्हणते,

"अग बाई नको एवढी कामाने मरूस! थोडे कमी कष्ट कर, तुला काही झाले तर तुझ घरच बसेल ग! तुला कुणी फुकट पगार घरी आणून देणार नाही." त्यावर ती हसून बोलते,

" मला काही एक होणार नाही बघा ताई, देवानेच माझ्यावर ही परिस्थिती आणलीया, तेव्हा त्यो काळजी घेणार, मला काही होऊ देणार नाही बघा."

बिकट परिस्थितीत दिवस काढत असताना सुद्धा, जीवनाकडे बघण्याचा दुर्गाचा आशावाद खरच कौतुकास्पद होता.

"अग मुलाचे लग्न कर म्हणजे त्याला जबाबदारीची जाणीव होऊन तो सुधारेल आणि काहीतरी कामाला लागेल. तुझ्याही हाताखाली मदतीला सून येईल."

"पर ताई आमच्या पण जातीत आताशा मुली शिकाया लागल्यात, त्यांना दोन खोल्यांचं घर हवं, मुलगा काहीतरी उद्योग धंदा करणारा हवा असतो. पण इथे साराच उजेड आहे. एक खोलीचं घर आणि मुलगा बेकार. कसं लग्न होणार? तरी  बघाया सुरुवात केली हाय म्हणा."

दुर्गाचे कष्ट, आणि तिचा तो कामाचा झपाटा सगळ पाहून सोसायटीतल्या घरात आळसात दिवस काढणाऱ्या बायका तर आवकच होत असत. नुसत्या धूण भांड्यावर दुर्गा वीस हजार रुपये महिना कमावते. पण महिन्याच्या शेवटी पाच –दहा रुपयाला मोताद असते. नवऱ्याच औषधपाणी, मुलीचा कॉलेजचा खर्च आणि मुलाला पैसे पुरवण, घरखर्च तिच्या आवाक्यात राहत नाही. नवरा अंथरुणावर पडल्या पडल्या बरळत राहतो.

"दुर्गे पोराकडे वाईच लक्ष दे. त्यासनी  मार्गी लाव. व्यसनी झालाय तो. घराकडे तू आजीबात बघत नाय."

"सगळ खर हाय, पर घरात बसून घर चालवायला पैका कुठून आणू? मी म्हणते, ह्या पोट्याला पण जरा कळायला हवं ना आईच्या कष्टाची किंमत."

लॉक डाऊन सुरु झालं आणि दुर्गाच्या घरचं चित्र पालटल. नवऱ्या बरोबर आता सगळेच घरात राहू लागले. मुलीचं कॉलेज बंद झालं. मुलाचं मित्रांच्या टोळक्या बरोबर वेळ घालवण आणि देशी दारूच्या अड्ड्यावर जाण बंद झाल. मुलगी घरी बसून आभ्यास करू लागली. दुर्गाच्या चेहऱ्यावर जरा तकाकी आली. रोजच्या कामातून तिची थोडे दिवसांसाठी का होईना सुटका झाली होती. दिवसभर एकाटाच खाटेवर पडून राहणारा दुर्गाचा नवरा त्यालाही भरलेलं घर पाहून बर वाटायला लागलं. कुणीतरी घरात संवाद साधणार मिळालं, पण मुलाच्या जीवाची घालमेल चालू झाली होती. पण घरात तळमळत बसण्या पलीकडे त्याच्याकडे दुसरा पर्याय नव्हता. एकदा त्याने मित्रा बरोबर घराबाहेर पडून कुठे देशी मिळेल का याचा शोध करून पाहिला आणि दोघांना पोलिसांच्या लाठीचा प्रसाद मिळाला. सिट आणि पिंढरी चोळत बसून राहिला. तसा त्याने पुन्हा घराबाहेर पडण्याचा प्रयन्त केला नाही. दुर्गाला त्याची घालमेल जाणवत होती. त्याला व्यसनापासून दूर नेण्याचा तिचा प्रयत्न चालू होता. परिस्थिती नसताना सुध्दा पोराला आपण घरी असेपर्यंत काही बाही चांगल खायला करून घालाव म्हणजे त्याला दारूची आठवण होणार नाही अस तिला वाटत होत म्हणून दुर्गा पोराला म्हणाली,

“ रघ्या मी तुझी खाण्याची चंगळ करेन. दारोदार लोकांना चांगलचुंगल करून खायाला  घालतेया ते तुला करून घालतेया,पर हे दारूच येड सोडून दे. हे लॉक डाऊन संपल्यावर कुठतरी आपण तुझ्यासाठी काम बघू या.”

दुर्गाने घरच्यांना वडे, मिसळ, भेळ, चटणी-पाव असं काय काय करून घातलं, घरचं आईच्या हातचं चवदार जेवण जेऊन रघुला थोड बर वाटत होत. नशेत नसल्यामुळे आईच बोलण थोड थोड पटायला लागलं होत. बहिणीच सतत पुस्तकात डोक खुपसून आभ्यास करण पाहून त्याला स्वतःची लाज वाटायला लागली होती. त्याच्या मनात विचार येऊ लागले. आपल्या पेक्षा लहान असणाऱ्या आणि चार महिन्यांपूर्वी लग्न झालेल्या चुलत भावाचा संसार तो पहात होता. तो चांगल्या मार्गाला लागला होता.त्याला टुरिस्ट कंपनीत ड्रायव्हरची नोकरी मिळाली होती त्यामुळे गड्याची दारू एकदम सुटली होती. आपल्याला सुध्दा त्या आईच्या मावस

**बहिणीच्या मुलीचं शुभांगीच स्थळ आलं पण त्या लोकांनी नाकारलं, आपण काही उद्योग धंदा करीत नाही म्हणून. मुलगी मनात भरली होती.पण च्यामारी हात चोळत बसावं लागलं. तिला चोरून मेसेज केला तर उलटा मेसेज केला तिन म्हणाली, ‘पाहिलं नोकरीला लाग मंजे पुढलं बघू, पुन्हा वाटेला जाऊ नकोस. माझ्या भावड्याला सांगेन.’ लई भाव खातीया. पण आपण भी काहीतरी कराया हवं. आशा सी. ए. झाल्यावर मग काय तिचा रुबाब वाढणार. आपण एवढ बी.कॉम झालो आहोत, तेव्हा साधी क्लार्कची तरी नोकरी नको का कराया? संमद कळत पण ते दारू घेतली की शुध्द जातीया. घरी बसल्यावर संध्याकाळी रघूची गुत्त्यावर जायची वेळ झाली की तळमळ चालू व्हायची, ते लक्षात घेऊन त्यावेळी दुर्गा, आशा त्याच्याशी गोड गोड बोलत, समजुतीने घेत.**

**लॉक डाऊन चालू होऊन दहा दिवस झाले. दुर्गाला कामावरल्या डॉक्टर बाईचा फोन आला.**

**“ दुर्गा जरा ऐकतेस का? लॉक डाऊन मध्ये तू कामावर येणार नाहीस पण मी तुला घरी बसल्या एक काम देते. पोळ्या लाटायची  तर तुला सवय आहेच”**

**“ हं कामावर रोजच्या चांगल्या शे दीडशे पोळ्या लाटते की! ”**

**“ तर त्या आता घरी बसून लाटायच्या, दारोदार फिरायचं नाही.आणि इतरही काम नाही. आहे ना मजा! अग एक सेवाभावी संस्था आहे. ती परप्रांतीय मजुरांना आणि ड्युटीवरच्या पोलिसांना जेवायला देऊन मदत करत आहे. त्यांना पोळ्या लाटून द्यायच्या. त्या कुठे पोह्चत्या करायच्या ते मी तुला सांगते. तुझा मुलगा किंवा मुलगी हे काम करतील. तुम्हाला घर बसल्या रोजगार मिळेल.”**

**दुर्गाला घरबसल्या काम मिळालं म्हणून आनंद झाला. तिने रघुला विचारलं, “ रघ्या जाशील का र पोळ्या पोह्चत्या करायला? तुला पोलीस पास देतील म्हणे. पुण्याचं काम हाय वर पैसे बी मिळतील.”**

**“छा म्या असली काम करणार नाय, तुज तू बघ.” रघु बोलला.**

**“माय मी जाईन पोळ्या पोह्चत्या करायला, कशाला त्येची विनवणी करतीया, तो शुध्दीत कुठे असतो? तो काय बी कामाचा नाही बघ .” रघुला बहिणीच बोलण लागलं.**

नाही होय करत शेवटी रघु तयार झाला या कामाला. पोलिसांच्या संगतीत पोरग मार्गाला लागेल म्हणून दुर्गाला पण आनंद झाला.तिच्या घरी गव्हाच्या पिठाच्या गोण्या येऊन पडल्या.बाकी जरुरीच सामान आलं. रोज सकाळी साडे अकरा वाजेपर्यंत दुर्गा पोळ्या तयार ठेवू लागली. आईच्या धावपळीत आपला आभ्यास सांभाळून पोरगी पण मदत करू लागली. दुर्गा पोळ्या लाटे तर आशा पोळ्या भाजण्याचे काम करू लागली. पहाटे पासून उठून घाम गाळत पोळ्या लाटणाऱ्या आईला आणि बहिणीला पाहून रघूच्या जीवाची कालवाकालव होऊ लागली. आई कामावर जाऊन किती काम करते हे त्याने कधी पाहिलच नव्हत. नावाप्रमाणे खरच आपली आई दुर्गा आहे. कामाला डगमगत नाही. आणि आपण फक्त आळसात वेळ काढतो. ठरल्या ठिकाणी पोळ्या पोह्चत्या करण्याच काम रघु करू लागला. शाळांमध्ये आपल्यापेक्षा वाईट अवस्थेत राहणाऱ्या मजुरांना तो जवळून बघत होता. त्यांच्याशी गप्पा गोष्टी करत होता. उत्तर प्रदेशातून कामासाठी आलेल्या, आणि मजुरी करून आपले पोट भरणाऱ्या मजुरांची परिस्थिती खूप दयनीय होती. ही लोक  स्वत: वेळेला अर्धपोटी राहून आपल्या गावाकडे पैसे पाठवत असतात. हे ऐकल्यावर रघुला आपल्या परिस्थितीची जाणीव झाली. आपण इथल्या इथे राहून सुध्दा आपल्या आईला हातभार लावत नाही की, वडिलांच्या औषध पाण्याचं पहात नाही. हळू हळू रघूच हृदय परिवर्तन व्हायला सुरुवात झाली होती.

वीस दिवस झाले होते, रघूने दारूला स्पर्श केला नव्हता. आता त्याच्या मनाने पक्का निर्धार केला होता, दारूचे व्यसन सोडण्याचा. ह्या व्यसनापायी आपण नाती विसरून जातोया, नको ती वाईट काम करून बसतोया. आपल्या माणसांना आपणच सुख द्यायला हवं. ते आपण चांगल वागल तरच मिळणार. हे रघूच्या मनाने पक्क ठरवलं.

ज्या संस्थेसाठी रघु हे काम करत होता, ती एक पतपेढी होती. तिथल्या संचालकांशी त्याची आता चांगली ओळख झाली होती. ते त्याला रोज उपदेशाचे डोस पाजत असत. रघुला त्यांचे बोलणे आवडत असे. त्याच्या कामातला प्रामाणिकपणा पाहून संचालकांनी त्याला लॉक डाऊन नंतर पतपेढीत नोकरी देण्याचे कबूल केले. दीड दोन महिन्याच्या कालावधीत रघु बदलला होता. त्याच्यातला हा बदल पाहून शुभांगीच्या घरच्यांनी सुध्दा

**रघुला लग्नासाठी होकार दिला. लॉक डाऊनच्या काळाचा दुर्गाला घर सावरण्यात आणि रघुला सुधारवण्यात चांगलाच उपयोग झाला. एक संसार नव्याने उभा झाला.**

**{जयश्री देशकुलकर्णी,कोथरूड,पुणे-३८**
**९४२३५६९१९९}**

# देवाची फुलं

"कार्तिका,ऊठ रे बाबा ! रात्री लवकर झोप म्हटले तर झोपला नाही.शुक्रवार आहे आणि उद्या सुट्टी आहे,म्हणून रात्री उशीरापर्यंत टीव्ही बघत बसला.त्याला शनिवारला सुट्टी असते ,थोडी त्याची मदत होईल म्हणून आज ठेवली पुजा.पण कसले काय,याची झोप उरकेल तेव्हा ना ! "आईची बडबड कार्तिक बेडवर पडल्या पडल्या ऐकत होता.शनिवारी लवकर न उठायचा नियम त्याचा.इतर दिवशी ऑफिसला सकाळी लवकर जायचे असते,म्हणून उरलेली झोप ,उरलेला आळस सगळा शनिवारी काढायचा आणि आपल्याला ज्यात मन रमते तेच करायचे असा त्याचा सुट्टीच्या दिवसाचा नियम .पण आज घरी सत्यनारायणाची पूजा ठेवली होती त्यामुळे आईला घरात मदत लागणार होती.इकडे आईचा आवाज आणि इकडे बेडवरून उठू न देणारा आळस,यामध्ये शेवटी आईच्या आवाजाचा विजय झाला आणि कार्तिक उठला झोपेतून.

कार्तिक ,आई ,बाबा आणि क्रांती असे चौकोनी कुटुंब. क्रांतीचे लग्न होवून २ वर्ष झाली.कार्तिक postgraduate करून ६-७ महिन्यापूर्वी नोकरीला लागला.घरात कार्तिक आणि क्रांती याच्यामध्ये फरक केला जात नसे.दोघांनाही चांगले शिक्षण दिले.घरातली कामंही दोघांना शिकवली गेली.मुलगा आणि मुलगी असा भेदभाव घरात नव्हता. सणावाराला क्रांती आणि कार्तिक दोघेही आईला मदत करत असे. क्रांतीचे लग्न झाल्यावर कार्तिक वेळ मिळेल तसा आईला घरात मदत करत असे.देवांच्या फोटोकरिता फुलांचे हार करण्याची जबाबदारी कार्तिकचीच असायची. तो खूप मन लावून करायचा ते काम.त्यांमध्ये तो धार्मिक होता असे नाही तर त्याचे त्यामध्ये होते ' फुलंप्रेम '.

कार्तिक उठून अंघोळीला गेला.आईला त्याने विचारले काय मदत हवी ती.अपेक्षित उत्तर आले त्याला की, फुलं आणि हार हवे आहेत पुजेकरिता.कार्तिक आईला म्हणाला, "मी 'तिला ' १० मिनिटात भेटून येतो आणि आले की करतो तुला मदत पटापट. " आई जरा चिडून म्हणाली, "आज नाही गेले तर चालणार नाही का तिला भेटायला ? रोज जातोस की नियमाने " " आलोच ग पटकन  ! " असे म्हणत कार्तिक गेला पण. " एवढे काय तिला भेटायचे ! माझ्याशी बोलायला वेळ नसतो घरी आणि " तिचे " फार कौतुक तुला. तिच्याशी बसतो तासनतास बोलत " कार्तिकला आईचे बोलणे ऐकू येत होते आणि

आता सवय पण झाली होती त्यांचं त्या डायलॉगची ! ह्या ज्या " तिच्या " तक्रारी चालू होत्या ती होती कार्तिकची ' फुलांची बाग ' ! घराच्या मागच्या बाजूला कार्तिकने फुलांची छोटीशी बाग फुलवली होती.त्याला त्या बागेचे खूप वेड होते.रोज तो थोडा वेळ तरी बागेत जायचा.त्या झाडांशी बोलायचा.सुट्टीच्या दिवशी स्पेशल वेळ दिला जायचा तिला, दिलखुलास गप्पा मारायला.झाडांची फुलं तोडायच्या तो विरोधात होता.झाडाला हलकेसे हलवून आवाज द्यावा आणि त्याच्या खाली हात पसरून उभे राहावे आणि त्यांनी जेवढे दिले, तेवढे फुले घ्यावे,अशी त्याची भावना होती.जमिनीवर पडलेली ताजी फुले तो उचलून आणत असे आणि ती स्वच्छ करून देवाला वाहत असे.त्याच्या या संकल्पनेवर बरेचजण आकक्षेप घेत.त्याची आई पण त्याला विचारत असे,'अशी खाली पडलेली फुले कशी देवाला वाहायची ? देव रागावला तर ?' त्यावर त्याचे उत्तर असे

" त्याचीच जमीन,त्याचीच माती,त्याचाच वारा, त्याचेच झाड,त्याचेच फुले,मग तो कशाला रुसेल ? शिवाय झाडाचे खाली पडलेले फळ आपण नैवद्य म्हणून दाखवतो देवाला आणि आपण पण खातो,मग फुलांच्या बाबतीत का असा भेदभाव करायचा ? ' यापुढे आईकडे बोलायला काही नसायचे.हळू हळू आईलाही त्या मागची धारणा पटू लागली.

कार्तिकने आज जरा घाईनेच "तिच्या"शी गप्पा मारल्या आणि फुले घेवून हार करण्यास सुरुवात केली.आईने चहा ठेवला कार्तिककरिता.

'कु हू कू हु ' चा आवाज पाऊस येण्याची वार्ता घेवून आली.कार्तिक डोळेभरून पावसात भिजणाऱ्या ' तिच्याकडे ' खिडकीतून बघत होता.पावसाच्या झरी झाडांना अंघोळ घालत होत्या आणि त्या अंघोळीचा आस्वाद झाडे ,फुले, पाने अगदी हवेच्या तालावर डोळे बंद करून हलके हलके डोलत घेत होती. ओल्या मातीचा वास सगळीकडे दरवळत होता. बाहेरून येणाऱ्या ओल्या मातीचा सुगंध आल्याच्या चहाला मात देत होता.स्वस्तिकाचे झाडाने पांढऱ्या फुलांची एम्ब्रायोडरी केली होती.जास्वंदीच्या फुलांचा लाल तोरा ही छान डुलत होता.गुलाबाचे फुल,फांदीच्या मागे लाजून लाजून,लपत लपत,आपले सौंदर्य जपत नाचत होते.

तेवढ्यात बाजूच्या काकु आल्या फुलं मागायला.आजुबाजुच्या शेजाऱ्यांना कार्तिकची ' फुल तोडण्याची ' संकल्पना थोडी किचकट आणि त्याचे ' फुलं प्रेम ' जरा अती वाटत असे.म्हणून शक्यतोवर कुणी

**फुलं मागायला आणि त्यांच्या भाषेमधे सांगायचे झाले तर कार्तिकची फुलोसाॅफी अर्थातच फुलांविषयाची फिलॉसॉफी त्यांना फारशी पटत नसे.पण आज काकु फारच विनंती करत होत्या.शेवटी आईला जास्त नकार देता आला नाही आणि आई हळूच हळू आवाजात म्हणली,'अरे, काकूंना जरा फुले हवी होती बागेतली,पूजेकरिता ! इतर वेळेला त्या कधी येत नाही आपल्याकडे ,पण आज कुठे मिळाले नसतील ,म्हणून नाईलाजाने आल्या असतील कदाचित! देऊयात का थोडी? तु आणलेली पण फुले संपलीत '**

नाखुषीनेच कार्तिक मान डोलावली. इकडे आधीच उशीर झाल्यामुळे,पावसाची सर थोडी थांबताच, काकूंनी घाईने पटापटा फुले तोडायला सुरुवात केली.या घाईमध्ये त्यांनी काही झाडांच्या न उमलेल्या कळ्या तोडल्या,काही फुलांच्या पाकळ्या ही तुटल्या ओरबडल्यामुळे.कार्तिक बघायला येईपर्यंत काकूंची बरीच फुले तोडून झाली होती. गुलाबाचे फुल तोडताना काकूंना काटा रुतला, त्यावर काकु चिडत म्हणाल्या,' अरे देवा,तुझी काही इच्छा नाही मी तुला गुलाबाचे फुलं वहावे ते! केवढा जोरदार काटा रुतला! ,' न राहवून कार्तिक म्हणाला,' गुलाबाचे सौंदर्य , त्याचा नाजूकपणा जपला जावा आणि त्याला ओरबडता येवू नये म्हणून विचार करूनच दिलाय तो काटा.बाकीच्या फुलांना पण असा काटा न देवून देवाने त्यांच्यावर अन्यायच केलाय.त्यांनाही काटा असता तर ओरबडण्याच्या आधी आपण जरा विचार केला असता! हा निसर्ग देवानेच बनवलाय असे म्हणतो ना आपण.मग त्या अर्थी,हे फुलं देवांनी,देवांकरिता बनवलेली "देवाची ही फुलं" ! त्याला अर्पण करून, त्याच्यापर्यंत पोहचवण्याचे आपण फक्त एक निमित्त ! या विचाराने तरी आपण त्यांना जपून हाताळला हवं ' काकूंच्या चेहऱ्यावरचे अपराधी भाव, कदाचित कार्तिकची ' फुलोसॉफी ' पटली असावी,असे सांगून गेले.

इकडे पावसाने पुन्हा जोम धरला. काकू आणि कार्तिक आपापल्या घरी गेले.योगायोगाने आईने तिचे आवडते सुधीर फडकेंचे आवडते गाणे लावले होते ,

' देव देव्हाऱ्यात नाही,देव नाही देव्हाऱ्यात !
देव आभाळी ,सागरी, देव आहे चराचरी ! '

गाणी ऐकता ऐकता कार्तिकची तंत्री हिरमुसून डोलणाऱ्या ' तिच्यावर ' लागली.

{संपदा}

# पॉझिटिव्ह (?)

"अरे, विश्वास..." कुणाचा तरी आवाज आला आणि विश्वासने मोटारसायकल रस्त्याच्या बाजूला घेऊन थांबवली. आवाजाच्या दिशेने पाहिले. त्याच्या शोधक नजरेस त्याच्या गल्लीत राहणारा अजय नावाचा त्याचा मित्र दिसला. तो रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला उभा होता. रस्ता पार करून आलेला अजय म्हणाला,

"बरे झाले. वेळेवर भेटलास बाबा. बघ ना, माझी मोटारसायकल नेमकी आत्ताच पंक्चर झाली. घरी जाऊन बायकोला कधी एकदा ती 'पॉझिटिव्ह' आहे असे सांगतोय असे झालेय बघ."

"पॉझिटिव्ह? म्हणजे तू..."

"हो ना. दैवगतीच कशी निराळी आहे. जाऊ दे. गाडी थोडी पळव ना. बायको वाट पाहात असेल रे. तुला सांगतो ना, नंतर डिटेल..."अजय म्हणाला आणि पॉझिटिव्ह हा शब्द ऐकताच अंतर्बाह्य भीतीने ग्रासलेल्या विश्वासने दो मनाने गाडीचा वेग वाढवला. काही क्षणात ते त्यांच्या गल्लीत पोहोचले. अजयचे घर आधी असल्यामुळे विश्वासने त्याच्या घराजवळ गाडी उभी केली. अजय उतरत असताना त्याची पत्नी दारात उभी असल्याचे विश्वासने पाहिले. त्यावेळी तिचा चेहरा काहीसा काळवंडला असल्याचे विश्वासला जाणवले. त्याने आपल्या घरासमोर मोटारसायकल उभी केली. तो लगबगीने घरात पोहोचला. बुट काढत असताना घाईघाईने म्हणाला,

"अग, लवकर गिझर लाव. आंघोळ करायची आहे. ते सॅनिटायझर दे. आंघोळीच्या पाण्यात भरपूर डेटॉल टाक..."

"अहो, पण झाले काय?" पत्नीने गिझर लावताना विचारले.

"अग, अजयची बायको पॉझिटिव्ह आली आहे..."

"अहो, ती पॉझिटिव्ह आलीय ना मग तुम्ही का तिच्या नावाने आंघोळ करताय?"

"तुला समजते का? तिला कोरोना झालाय?"

"कोरोना तिला झालाय ना? मग तुमचा नि तिचा काय संबंध? असे तर नाही ना...?"

"अग, माझे बायको, कशाचा संबंध कशाशी लावू नको. ती पॉझिटिव्ह झालीय याचा अर्थ अजयलाही कोरोनाने कवटाळलेच असेल आणि आत्ता बायको पॉझिटिव्ह असल्याचा रिपोर्ट घेऊन तो माझ्या गाडीवर बसून आलाय."

"असे आहे का तुमचे कोरोनापुराण?..." असे विचारत पत्नीने पाण्याचा नळ सुरू केला. विश्वास आंघोळीला जाताना म्हणाला,

"हळद टाकून गरम पाणी करून ठेव आणि मी तीन दिवस होम क्वारंटाईन होणार आहे. उगीच रिस्क नको."

"अहो, पण अजून अजय पॉझिटिव्ह आला नाही ना? मग आपण का उगीच दूर दूर राहायचे म्हणते."

"अग, पण त्याने स्वतःचा पॉझिटिव्हनेस माझ्यापासून लपवला असेल तर? आजकाल ना कुणावर विश्वास टाकणे आणि कुणाला लिफ्ट देणेही महागात पडू लागते की काय?" असे बडबडत विश्वास आंघोळीला गेला. तशी विश्वासची बायको चिंतेत पडली. विश्वास बोलत असताना विनोदाने बोलत असली, स्वतःची काळजी लपवत असली तरीही तिला धक्का बसलाच होता. तो काळच तसा होता की, घरात एका कुणाला कोरोना झाला की, घरातील अनेकांना विशेषतः पती किंवा पत्नीला हमखास कोरोना झाल्याची शेकडो उदाहरणे वाचायला मिळत होती. अजयच्या पत्नीला कोरोना झाला याचा अर्थ अजयलाही कोरोना झालाच असणार. अजयला कोरोना झाल म्हणजे तो ज्याच्या ज्याच्या संपर्कात जाईल त्यालाही कोरोना होणारच. म्हणजे त्यातून विश्वासचीही सुटका नक्कीच नाही. या विचारात तिने गॅस पेटवून पाणी गरम करायला ठेवले, त्यात हळदही टाकली. त्यासोबतच वाफ घ्यायचे यंत्रही काढून ठेवले. वाफ घेतली म्हणजे संसर्ग होणार नाही या हेतूने...

तितक्यात आंघोळ करून आलेल्या विश्वासने बाल्कनीत धाव घेतली आणि तिथून अजयच्या घराचे निरीक्षण केले परंतु तिथे सारे काही शांत असल्याचे पाहून तो आत आला. त्याने कपडे घातले. पुन्हा एकदा बाल्कनीत जाऊन डोकावले. त्याची तशी घाई पाहणाऱ्या बायकोने विचारले,

"अहो, असे काय बाल्कनीत चकरा मारताय? कुणी येणार आहे का?"

"कोण येणार आहे? अजयच्या घरात काय चालले आहे ते बघतोय."

"अहो, आता काय चालणार? ट्रिटमेंट सुरू करावी लागणार..."

"तेच तर ना! पण आतापर्यंत हालचाल सुरू व्हायला हवी होती म्हणजे एक तर अजयने पत्नीला दवाखान्यात न्यायला हवे होते किंवा रुग्णवाहिका बोलवायला हवी होती..."

"होईल ना सारे. करतील ते. त्यांनाही काळजी असेलच ना. घ्या. गरमागरम हळदीचे पाणी प्या. नंतर वाफ घ्या आणि आत आराम करा. मी काही तरी खमंग नाष्टा करते." बायको सांगत असताना तिच्या हातातील पाण्याचा प्याला घेत विश्वासने विचारले,

"अग, मला तर कोरोनाची लागण होणार नाही ना? कसे आहे, येताना अजयने आवाज देऊन मला थांबविले. त्यावेळी तो बायकोचा पॉझिटिव्ह अहवाल घेऊन निघाला होता. अशा परिस्थितीत एक तर त्याने माझ्या गाडीवर बसायचे नव्हते. बरे, बसला तर बसला पण चक्क नेहमीप्रमाणे माझ्या गळ्यात हात टाकून बसला ग. याचा अर्थ..."

"कळतोय मला पण अजून अजय पॉझिटिव्ह आला नाही ना..."

"म्हणून काय झाले? बायकोची तपासणी केली म्हणून तिचा पॉझिटिव्हनेस समजला. अजयनेही त्याचवेळी करून घेतली असती तर तोही कोरोनाच्या गळाला लागल्याचे समजले असते..." असे म्हणत विश्वास पुन्हा बाल्कनीत गेला. त्याचे बोल ऐकून तिच्या हृदयाचा ठोका चुकला परंतु तिने स्वतःवर संयम ठेवला. काही क्षण बाल्कनीत थांबून अजयच्या घराकडे पाहून विश्वास घरात परतत म्हणाला,

"असे तर करणार नाहीत ना की, बायकोला कोरोना झालाय हे सर्वांपासून ते लपवून तर ठेवणार नाहीत ना?"

"तुमचे आपले काहीतरीच. लपवून ठेवल्याने का तो आजार लपणार आहे. कोरोना लपविणे म्हणजे संकटाचे ढग अजून ओढून आणल्यासारखे आणि अजयने तुम्हाला सांगितले आहेच की. मग आता कसे लपवून ठेवणार आहे?"

"बाप रे! अग, म्हणजे मलाही कोरोना नक्कीच होणार तर. मायगॉड! काय होऊन बसले हे. आता ग कसे? त.. त.. तू आत्ताच्या आत्ता तुझ्या माहेरी जा बरे. याच शहरात तर राहतात तुझे आईबाबा!..."

"व्वा! तुम्ही असे घाबरलेले असताना मी माहेरी जाऊ? तिथे माझे लक्ष लागेल? घास माझ्या घशाखाली उतरेल? महत्त्वाचे म्हणजे तुमच्या डोक्यात शिरलेले कोरोना नावाचे भूत काढून टाका. तुम्हाला काहीही होणार नाही. तो कोरोना तुमच्या आसपासही फिरकणार नाही. बघाच तुम्ही..." बायको सांगत तर होती आत्मविश्वासाने पण आत

कुठेतरी तिचाही आत्मविश्वास डळमळत होता पण ते विश्वासला जाणवू नये ह्याचा ती आटोकाट प्रयत्न करीत होती. विश्वासने हळदीचे पाणी पिले. पाठोपाठ आले टाकून केलेला गरमागरम चहा पित असतानाही त्याने दोन -तीन चकरा बाल्कनीत टाकून अजयच्या घराकडे नजर टाकली. तिथली शांतता त्याला अस्वस्थ, बेचैन करीत होती. त्याची घालमेल, तगमग, अस्वस्थता वाढत असल्याचे पाहून बायकोने त्याला बळेबळे शयनगृहात ढकलले आणि म्हणाली,

"थोडावेळ शांत पडून रहा. तुम्हाला बरे वाटेल. मी तुमच्या आवडीचा स्वयंपाक करते." विश्वास अनिच्छेने परंतु बायकोच्या समाधानासाठी पलंगावर पडला पण डोक्यात विचारांची आवर्तने सुरुच होती...

नवऱ्याला शयनगृहात सोडून आलेल्या बायकोची स्थिती का वेगळी होती. तिच्या हातापायातील त्राण लोप पावल्याप्रमाणे ती काही क्षण सोफ्यावर बसून राहिली. परंतु लगेच उठली. मनाशीच म्हणाली, 'असेच बसून राहिली तर विचारांचे कीडे कुरतडत राहणार आणि विश्वास काही जास्त वेळ झोपून राहणार नाही. तो उठला आणि मी अशीच बसून राहिलेली त्याने पाहिले तर तो अजून हबकून जायचा. त्यापेक्षा तो उठेपर्यंत स्वयंपाकात मन रमवूया...' असे पुटपुटत ती उठली खरी पण स्वयंपाक घरात जाण्यापूर्वी ती बाल्कनीत गेली. तिने अजयच्या घराकडे नजर टाकली. तेव्हा अजय आणि त्याची पत्नी हसत हसत घराबाहेर पडताना दिसले. दोघेही मोटारसायकलवर बसले. तसे अजयच्या बायकोचे हात त्याच्या खांद्यावर विसावताच दुसऱ्या क्षणी अजयची मोटारसायकल गल्लीच्या बाहेर पडली. तशी विश्वासची बायको पुन्हा मनातल्या मनात पुटपुटली,

'हे दोघे दवाखान्यात जाणार म्हणावे तर दोघांचा विशेषतः अजयच्या पत्नीचा थाटमाट एखाद्या लग्नात जाण्यासारखा होता. दागिन्यांनी ती मढली होती. पॉझिटिव्ह आली आणि अशी सज धज के कुठे निघाली म्हणावे. विश्वासला उठवून सांगू का? नको. पुन्हा तो टेंशनमध्ये यायचा. बघू काय होईल ते...'

विश्वासची पत्नी स्वयंपाक घरात गेली. तिने कुकर लावला आणि ती बाहेर आली. ती पुन्हा बाल्कनीत आली. अजयच्या घराला लागून असलेल्या घरातील दोन- तीन बायका एकत्र जमून हलक्या आवाजात कुजबुजत असल्याचे तिने पाहिले. एकदा तिला वाटले,

पहावे का विचारून त्यांना? पण लगेच तिला वाटले, नको. उगीच कुणाला माहिती नसेल तर बोलताना आपल्या तोंडातून काही निघालेच तर ती बातमी वाहिन्यांच्या बातमीपेक्षा जास्त टीआरपी मिळवायची. कारण बायकांना अशी बातमी समजणे म्हणजे सारे अवघडच आहे...

तितक्यात शयनगृहाचे दार उघडल्याचा आवाज आला आणि ती पटकन घरात आली. तोपर्यंत विश्वास बाहेर आला. तो झोपला नसल्याचे त्याच्या चेहऱ्यावरून समजत होते. ती काही बोलण्यापूर्वीच विश्वासने विचारले,

"का ग, काही बातमी आली का अजयची?"

"नाही ना. पण काही वेळेपूर्वी दोघेही बाहेर गेलेले दिसले."

"दोघेच? कुठे गेले असतील? तिला दवाखान्यात दाखल तर करणार नसतील?"

"काय सांगावे? समजेल थोड्या वेळात. पुन्हा एकदा चहा टाकू का?"

"होय. टाक. डोके नुसते भणभण करतेय." विश्वास म्हणाला तशी त्याची बायको आत गेली. विश्वास विषण्ण मनाने सोफ्याच्या कडेला डोके टेकवून बसला. काही क्षणातच पत्नी चहाचे दोन कप घेऊन आले. दोघेही काही न बोलता चहा घेत असताना दारावरची घंटी वाजली. विश्वासने प्रश्नार्थक नजरेने बायकोकडे बघत दार उघडले. पाहतो तर दारात अजय पत्नीसह उभा होता.

"अजय, तू? दोघेही आलात? कसे काय? वहिनींना दवाखान्यात न्यायचे सोडून इकडे का आलात?"

"दवाखान्यात कशाला?"

"अरे, त्या पॉझिटिव्ह आल्या आहेत ना?"

"होय! म्हणून तर आलो आहोत."

"अज्या, वेडं लागले काय तुम्हाला? अरे, वहिनी पॉझिटिव्ह आहेत. कदाचित तुलाही... असे असताना तू सर्वत्र फिरतो आहेस?"

"मग काय झाले? ती पॉझिटिव्ह आहे म्हणून तर पेढे वाटतोय. आत येऊ देणार नाहीस का?" असे म्हणत अजय विश्वासला ढकलत आत आला... पाठोपाठ पत्नीही! दोघांच्याही बायकांची नजरानजर झाली. अजयच्या पत्नीच्या डोळ्यातील भाव, लज्जेने लालसर

चेहरा पाहताच विश्वासच्या बायकोने तिच्या मनातील भाव ओळखले. ती पटकन पुढे झाली आणि तिचा हात हातात घेऊन तिला हलकेच सोफ्याकडे नेताना म्हणाली,
"अभिनंदन! अजय, तुमचेही अभिनंदन!..." गोंधळलेल्या विश्वासकडे पाहून ती पुढे म्हणाली,
"अहो, असे पाहताय का? ती पॉझिटिव्ह आहे पण कोरोनाने नव्हे तर आई होणार म्हणून पॉझिटिव्ह आहे..."
"अस्से काय? अभिनंदन! अजय... वहिनी!" असे म्हणत विश्वासने हसत हसत सारी 'पॉझिटिव्ह' कथा ऐकवली आणि सारे हसत सुटले...

{नागेश सू. शेवाळकर,पुणे ४११०३३
९४२३१३९०७१}

# सेलिब्रेशन

'धबधब्याखाली दहा वाजता. Belated celebration..'
इतका तूटक निरोप कोणी देत का?

पण या मन्याच सगळं असच असतं. मोजकंच बोलणार आणि नेमकंच बोलणार. बरं जमतं याला असं. नाहीतर मी! अघळपघळ.
एका वाक्यातल्या उत्तराकरताही अख्खं पानभर खरडणार.

बरं निरोप धाडलान तसं उत्तरही ऐकून जायच ना माझं? ते नाही. पलट निरोपाची काही सोयच नाही.

स्वत: जाऊन उभा राहील तिथे, डॉट दहाला. प्रॉब्लेम माझाच आहे. त्यात इतर कोणता दिवस असता तर ठिक होतं. आज जमवायचं जरा कठीणच आहे.

घरात पाहुणे जमलेत. बाबा तिकडे बाहेर हॉलमधे व्यवस्था बघतायत. आईला आज किचन पुरुन उरणार आहे. पिंट्याची एकट्याची धावपळ सुरु आहे सकाळपासून. त्यालाच सारखे कामं सांगतायत दोघेही.

आई म्हणे, "अरे! जरा दूधवाल्याला फोन कर आणि दोन दिवस जास्तीचं दूध टाकायला सांग."

बाबा म्हणे, "पिंट्याऽऽ गुरुजींना फोन कर."

आजी म्हणे, "सामानाची यादी चेक कर."

मी आपली घरात एका कोपऱ्यात बसून आहे. मला तिथून उठून जायची परमिशन नाहीये, किमान पुजा होईपर्यंत तरी. सोवळं ओवळं  एरव्हीही असतंच आजीच पण, आता जरा जास्तच काक नजर तिची सगळ्यांवर.
आई दिव्यात तेल घालायला आली तेव्हा तिचा उजवा डोळा लवतोय का बघायची उगीचच इच्छा झाली होती मला. तितक्यात सुमाक्काने आईला हाक मारली.

"मावशीऽऽ, या दोन दिवसाच्या भाज्या निवडून ठेवल्यात. निघू मी?" म्हणत आईच्या हातात तिने निवडलेल्या भाज्यांची पिशवी दिली, एकदा माझ्या दिशेने बघितलं आणि "चहा तरी घेऊन जा", या आईच्या वाक्यावर मानेनेच 'नको' म्हणत आजीने टोकायच्या आत निघूनही गेली.
आजीच्या तावडीत सापडती तर वाटच होती तिची. "हेऽ गोऽऽ काय नखरे? केस बांधून ना कराव काऽऽम" असं वर ऐकावं लागलं असतं तिला.
पण आज ती होती म्हणून आईला मदत तरी होत होती. माझा इथे बसून काहीही उपयोग होण्यासारखा नव्हता तसाही.
पण इथून निघायचीही परवानगी नव्हती.

हे सगळ मन्याला सांगायच होतं पण आहे कुठे तो इथे? तो जाऊन बसला असेल तिथे, धबधब्याखाली.

समोर असता तरी म्हणाला असता, "ना माझा विश्वास आहे या सगळ्यावर ना माझ्या घरच्यांचा"

विश्वास तर माझाही नव्हता पण तरी का कोण जाणे गपचूप बसलेय मी इथे कोपऱ्यात शहाण्या बाळासारखी. पहिल्यांदाच ऐकावं वाटतय घरच्यांचं. कोपऱ्यात बसून का होईना पण हे सगळं बघावं वाटतय कसलेही प्रश्न न विचारता.

पण हे सगळं बोलायला भेटायला तर हवा तो. तो तर आत्तापर्यंत पोहोचला असेल तिथे धबधब्याखाली.

नेहमीची सवय आहे ही त्याची. त्यादिवशीही असच केलं त्याने. एक sms तेव्हढा केला, हा असाच आजच्यासारखा 'धबधब्याखाली १० वाजता see u - love'

त्याला आमची प्रपोज ॲनिव्हर्सरी त्याच स्पॉटला साजरी करायची होती म्हणे, जिथे त्याने प्रपोज केलं होतं.

पावसाने जोर धरला होता. आई म्हणाली होती, "नको बाहेर पडूस आज. जीव घाबरा होतो अशा पावसाने, त्यात उजवा डोळा फडफडतोय सकाळपासून."

"आई ग! या सगळ्या अंध्रश्रद्धा  आहेत", तिला असं ऐकवून 'आलेच जाऊन' म्हणत निघाले होते मी ॲक्टिव्हा घेऊन.

दोन गल्ल्यापुढे मन्याला पिकअप केलं. पाऊस वेड्यासारखा कोसळत होता. मन्या माझ्या कानात काहीतरी बोलत होता. काहीतरी इंटिमेट असं. पावसाच्या आवाजात शब्द नीट कळत नव्हते. धबधबा आता अगदी जवळ आला होता. समोरच्या उजव्या वळणावरुन एक अर्धा किलोमीटर आत गेलं की आलाच धबधब्याकडे जाणारा रस्ता.
उजव्या वळणावर गाडी व्यवस्थित इंडीकेटर देऊन वळवली मात्र, समोरुन एक ट्रक इतक्या झपकन आला की धस्सं झालं एकदम.

तिथेच थांबाव लागलं. गाडी स्किड झाली. ट्रकवाला आमच्या समोरुनच पळून गेला. बऱ्याच वेळाने त्या रस्त्याला गाडी आल्यावर मदत मिळाली. आमचं सेलिब्रेशन अर्धवटच राहिलं.

तेच साजर करायला तो भेटायचा निरोप. मन्या जाऊन पोहोचला असणार खात्रीने. पण मी कशी निघू? इतक सगळं होऊन गेल्यावर आई बाबांना न सांगता, ते ही माझ्याच दहाव्याची तयारी सुरु असताना.
मी नाही निघू शकत. सगळं आटपेपर्यंत, गुरुजी असेपर्यंत, आईचे अश्रू सुकेपर्यंत.. पिंट्या कर्ता होई पर्यंत.

{कविता नवरे}

# परिवर्तन

**अग,अक्षता ऐकलंस का?सामानाची पिशवी ठेवत अनिलने बायकोला आवाज दिला. तशी कपाट आवरता आवरता ती बाहेर आली.**

" काय झाले?" अग,आज मला बाजारात मोहन भेटला.कंपनीच्या कामासाठी तो आला होता.काम संपवून तो कोल्हापूरला निघाला होता.अचानक आम्ही एकमेकांसमोर आलो एखाद्या हिंदी चित्रपटाप्रमाणे..

"अहो, मग घरी नाही का आणायचे? "अक्षता मध्येच नव-याला म्हणाली.

**मी म्हणालो.पण त्याला गाडी होती दोन तासांनी तितक्या वेळात घरी घेवून येणे शक्य नव्हते. पुढच्या वेळेस नक्की येईल म्हणाला. मग जवळच्या हाॅटेल मध्ये चहा नाश्ता करत गप्पा मारत बसलो.**

**काळ किती पटापट पुढे जातो सोफ्यावर आरामात बसत अनिल विचारात मग्न झाला....**

**मोहन अनिलचा बालमित्र .शेजारीच राहत होते दोघे तसा मोहन अनिलपेक्षा दोन वर्षानी मोठा होता.पुढे शिक्षणासाठी तो मुंबईला आला त्यानंतर त्याचा सुमन सोबत विवाह झाला.अगदी मोहनला साजेशी अश्याच होत्या सुमन वहिनी..त्यांच्या संसारात आगमन झाले ते छोट्या राहूलचे.किती खूश होता मोहन आपल्या लग्नाला आला तेव्हा.. आणि सहामहिन्यानी कळाली ती सुमन वहिनीच्या अपघाती निधनाची बातमी.आॅफिसमधून घरी येताना झालेला तो भंयकर अपघात मोहनवर तर आभाळच कोसळले होते...**

"अहो..चहा घेणार का"? अक्षताच्या आवाजाने तो भानावर आला..

**नको..मोहन सोबत घेतला होता मी.हे ऐकून मेथी निवडण्यासाठी घेवून अक्षता हाॅलमध्ये येवून बसली.**

"कशा आहेत समिक्षा वहिनी ?" त्यांची लेक काय म्हणतेय? ..बिचारा राहूल आईच्या छत्राविना वाढला..

**सावत्र आई सोबत..**

**अक्षताला मध्येच थांबवत अनिल म्हणाला,"अग,सख्खा आई इतकेच प्रेम दिले त्यांनी राहूलला.स्वत:ला मूल होऊ द्यायला पण तयार नव्हत्या.पण मोहनच्या आईने खूप समजावले त्यांना...**

**अग मघाशी होटेल मध्ये बोलताना मोहनही गतकाळात हरवला होता.सुमनच्या जाण्याने तो पुरता कोलमडून गेला होता.छोट्या राहूल कडे पाहून तो दु:ख विसरण्याचा प्रयत्न करत होता.आईकडूही वार्धक्यामुळे सर्व जमत नव्हते.**

**मोहनची नोकरी छोट्या राहूल कडे बघणे ही सर्व तारेवरची कसरत होत होती.सुमनला तो विसरू शकत नव्हता लग्नासाठी तो तयारच नव्हता.पण नोकरीसाठी बाहेर गावी जावे लागे त्यात राहूल कडे हवे तसे लक्ष देवू शकत नव्हता.तेव्हाच त्याची ओळख समिक्षावहिनीशी झाली.ओळख मैत्री वाढत गेली आणि सर्व परिस्थिती माहिती असतांना देखील समिक्षाने त्याच्यासोबत लग्नाची इच्छा बोलून दाखवली. त्याने खूप विचार केला पण मन मानत नव्हते. सर्वांनी खूप समजावले आणि समीक्षा वहिनी सोबत त्याने लग्न केले. खूप छान सांभाळले त्यांनी घराला आणि राहूलला.**

"पण,स्वताची ही लेक आहे ना त्यांना आता". अनिलला मध्येच थांबवत अक्षता भाजी निवडता निवडता मध्येच म्हणाली.

**अग हो ,पण त्याने त्याच्यात कोणताही फरक पडला नाही. दोघाबहिण भावाचं नात छान आहे.वहिनी सुध्दा दोघांवर सारखेच प्रेम करतात.मोहन म्हणाला ,"राहूल वर त्यांचा जास्त जीव आहे."**

**अनिलच्या वाक्यावर अक्षताने कांहीही प्रतिक्रिया दिली नाही.सावत्र आई याबद्दल तिचे विचार काहिसे ठामच होते.त्यात आपल्या लेकीच्या मैत्रीणीला सावत्र आईचा असलेला त्रास ती बघतच होती.**

"तु काहीच का बोलली नाही"?अनिलने विचारले.

"त्यात काय बोलायचे?सावत्र आई कशी असते.ते आपल्या आशाचा मैत्रिणीचे ऐकून पाहून मला चांगलेच माहीत आहे." अक्षताने न बोलण्याचा खुलासा केला.

" अग,अक्षता हाताची पाचही बोटे सारखी असतात का? एकावरून आपण सर्व तसे असे नाही म्हणू शकत."काहीशा समजवण्याच्या सुरात अनिल म्हणाला.

**अक्षता आपल्या स्वयंपाकाला लागली आशा,अंकित येण्याची वेळ झाली होती. त्यात अंकितचे हे बारावीचे वर्ष त्यामुळे त्याच्या कडे लक्ष देणे,सर्व वेळा पाळणे आवश्यकच होते आंणि हे सर्व अक्षता व्यवस्थित करत होती.आणि आशाचे एम.काॅम.चे वर्षे.**

**संध्याकाळी जेवण आटपून फिरत असताना अनिल अक्षताला म्हणाला आपण आशासाठी आता स्थळ बघायला सुरूवात करायला हवी.**

**हो,पण अंकितचे बारावी होऊन जाऊ देत.आशाचेही एम.काॅम. पूर्ण होईल.**

"हो चालेल तसे"....अनिलने संमती दर्शविली.

**दैनंदिन रूटीन चालू होते.एखाद्या विवाह संस्थेत नाव नोंदवावे का? नातेवाईकांनाही आशा साठी चांगले स्थळ असेल तर सांगाल असे सांगावे का? बघत पर्यंत लागतोच वेळ.तोपर्यंत अंकितची परिक्षा ही होईल.असे विचारचक्र चालू होते.दारावरची बेल वाजली तसा एकदम आपल्या विचारातून अनिल बाहेर आला.**

"अहो, बेल वाजते आहे."अक्षताने स्वयंपाघरातून आवाज दिला.

"बघतो,बघतो "सोफ्यातून उठत अनिल म्हणाला.

"अग,मोहन आला आहे."तशी अक्षता हाॅलमध्ये पाणी घेऊन आली.

"कसे आहात?खूप वर्षांनी आपण भेटत आहोत न."अक्षता म्हणाली.

**हो ना मध्यंतरी अनिल सोबत धावती भेट झाली.त्या वेळीच पुढच्यावेळी नक्की घरी येईल असे आश्वासन दिले होते. आज रविवारही आहे म्हटलं सर्वांची भेट होईल. गाडीसाठी ही अजून वेळ होता.मोहनने खुलासा केला.**

"अरे, मोहन आरामात बस.छान वाटलं तु आलास आता जेवण करूनच जायचं."अनिल म्हणाला.

"अरे नको रे मस्त गप्पा मारत बसू ."

**नाही हं भाऊजी जेवूनच जायचे.अक्षतानेही आग्रह केला.**

**मोहनही आता काहीच बोलू शकला नाही.**

'आशा, अंकिता अरे बाहेर या.' अनिल ने मुलांना आवाज दिला.

**दोघांची ओळख करून दिली आपल्या बालमित्रासोबत. आणि ते जुन्या आठवणीत रमून गेले.**

**पान वाढलीत हं.अक्षता ने आवाज दिला.**

**आशाने दोघांनाही वाढले.जेवण आटोपून मोहन निघाला आणि सर्वांना कोल्हापूरला येण्याचे आग्रहाचे निमंत्रण दिले.**

**अग,अक्षता काल मोहनचा फोन आला होता.त्याने आपल्याला बोलावले आहे.त्याचे नवीन घर बघायला आणि सर्वजण या असे आग्रहाने सांगितले आहे.एक दिवसात जाऊन येऊ. महालक्ष्मीचे दर्शनही होईल.**

**अक्षता त्यावर हो म्हणाली.तिलाही देवीच्या दर्शनाला जाण्याची इच्छा होतीच. त्यामुळे तिने संमती दर्शविली.**

**रविवारी पहाटेच चौघेही निघाले.बरोबर आठ वाजता मंदिरात पोहचून देवीचे दर्शन घेतले आणि मोहनकडे निघाले.**

**गेटजवळ मोहन वाट पाहत उभा होता .गाडी पार्क करण्यासाठी प्रशस्त जागा एका बाजूला छोटीशी बाग.**

**दारात समिक्षा वहिनी उभ्या होत्या. त्यांनी हसतमुखाने स्वागत केले. राहूल व शीतलची मोहनने ओळख करून दिली. बँकेला सुट्टी असल्यामुळे आज राहूलही घरीच होता. मोहनने घर दाखवले खूपच सुंदर बांधले होते. जेवण झाल्यावर सर्वजण हाॅलमध्ये गप्पा मारत बसली.मोहन व अनिल बाहेर चक्कर मारायला गेले.**

**मोहन अनिलला म्हणाला,"अनिल तुझ्याकडे आलो तेव्हा आशाला पाहिले तेव्हाच ती राहूलसाठी मला अगदी योग्य वाटली.तसे मी त्यासोबत आज बोलतो राहूलसोबत.आणि तु ही आशा व वहिनी सोबत सविस्तर बोल मी करेन फोन.तु ही यावर विचार कर."**

**अनिल व मोहनच्या फॅमिलीनी एकमेकांचा निरोप घेतला.**

"घरी पोहचले की फोन कराल वहिनी." समिक्षा म्हणाली.

'हो नक्की' अक्षता म्हणाली.

**घरी पोहचत पर्यंत दहा वाजले.सर्वजण थकले होते.**

**सकाळी उठल्यावर रूटीन सुरू झाले. पण आज अनिलने थोडे उशिराच ऑफिसला जायचे ठरवले होते. अंकित ,आशा काॅलेजला गेले. आणि काल मोहनने काढलेला विषय त्याने अक्षताला बोलून दाखविला.**

**तसा राहूल,त्याची नोकरी,मोहनचे टुमदार घर तिलाही आवडले होते पण समिक्षा ही राहूलची सावत्र आई आहे त्यामुळे ती साशंक होती...**

"अग वहिनी चांगल्या आहेत स्वभावाने तुझ्या मनातून ते सावत्र काढून टाक बर..."अनिल समजूतीच्या स्वरात म्हणाला.

**संध्याकाळी आशा सोबत हा विषय काढला. ती लाजली तिलाही राहूल आवडला होता.**

**फोनची रिंग वाजली.मोहनचाच फोन असेल अनिल म्हणाला.**

"अरे, बोललास का तु दोघी सोबत." मोहनने विचारले.

**हो,आशाला पंसद आहे पण ....अनिल मध्येच थांबला.**

**अरे ,मला माहित आहे तु काय म्हणतो आहेस ते तु चिंता करू नकोस. समिक्षाच्या बाबतीत...अरे राहूल खूप खूश होता...मोहन म्हणाला.**

**अंकितच्या परिक्षेनंतर मे महिन्यात लग्नाची तारीख निश्चित करण्यात आली.**

**खरेदी,च्या निमित्ताने राहूलची भेट गप्पा होत होत्या.राहूलची आई त्याची सावत्र आई आहे ह्या विचारानी ती थोडी बेचैन होत असे तिची खास मैत्रीण आरतीला होणारा त्रास तिने जवळून पाहिला होता.त्यामुळे सावत्र आई बाबत तिचे काही ठाम मत तयार झाले होते.**

**लग्नाची तयारी हळूहळू सुरू होती अंकितची परिक्षा झाली तशी अक्षताची लग्नाच्या तयारीला जोमाने लागली.बघता बघता लग्न घटिका जवळ आली आणि मोठ्या थाटामाटात राहूल व आशाचा विवाह संपन्न झाला.**

**नव्या सुनेचे स्वागत समिक्षाने केले. शीतलाही वहिनीच्या आगमनाने आनंद झाला.नवीन संसाराला सुरूवात झाली.राहूल आशाच्या सर्व आवडीनिवडी जपत होता.**

**शीतलचचा वाढदिवस आला होता. त्यासाठी समिक्षाने दोन तोळ्याचा नेकलेस तिच्यासाठी केला.**

"अग,आशा हे बघ शीतलचे बर्थडे गिफ्ट" समिक्षाने सुनेला गिफ्ट दाखवले.

" हो,छान आहे"आशा म्हणाली.

**वाढदिवसाला एवढे मोठे गिफ्ट शेवटी सख्खी आहे ती.आरतीकडेही असेच होते असा रूममध्ये बसली असताना तिच्या डोक्यात विचार वारंवार येत राहिला.**

"अग,कोणत्या विचारात मग्न होतीस ?"राहूलच्या प्रेमळ हाकेने ती भानावर आली.

"अहं शीतलच्या वाढदिवसासाठी नेकलेस केला दोन तोळ्याचा" आशा उत्तरली.

"हो,हो अग आई म्हणाली मला." राहूल म्हणाला.

**पण तिच्या डोक्यात तो विचार घोळत राहिला...**

**खाण्याच्या छोट्या छोट्या सवयी ,एकत्र राहत असताना येणा-या काही मर्यादा, या व अशा छोट्या कुरबुरीने आशाने एक दिवस राहूलला वेगळे राहण्याचा विषय काढला.**

**ही गोष्ट राहूलला पटण्यासारखी नव्हतीच कारण आईचे त्याच्यावर असलेले प्रेम,शीतलचा लाडका दादा ,बाबा यांना सोडून राहणेहे त्याला पटत नव्हते पण आशाने हट्टच धरला.शेवटी त्याने एकदिवस हा विषय बाबानकडे काढला.**

**मोहनला व समिक्षा दोघांनाही ही गोष्ट आवडली नाही. पण आशाची इच्छा असेल तर राहा तुम्ही वेगळे.**

**मोहनने राहूलला बँकेजवळच घर घेण्याचा सल्ला दिला त्यामुळे वेळ वाचेल राहूलाही हा विचार पटला.**

**आशा राहूलच्या नवीन घरासाठी लागणा-या ज्या वस्तू शक्य होत्या त्या दिल्या समिक्षाने वेगळे राहत असल्याची कोणतीही नाराजी न दाखवता.**
**नवीन फ्लट सजवताना आशा खूप खूश होती. फ्लॅट छानच होता बॅक ही जवळच होती. पण आई,बाबा ,शीतल यांना सोडून राहण्याची राहूल ला सवय नव्हती.आई बाबाना काय वाटले असेल असा विचारही मनात येत होता.**

**आईची राहूलला विशेष आठवण येई.तिचा राहूलवर खूप जीव.शीतलतर नेहमीच म्हणायची दादा तुझा जास्त लाडका.**

**आशा आनंदात होती.**

"नवीन सिनेमा लागला आहे आपण जाऊ या का? आज रात्री म्हणजे उद्या सुट्टी निवांत उठता येईल." आशाने राहूलच्या हातात नाश्ताची प्लेट देत विचारले.

"बघतो तिकीट मिळाली तर..तसा फोन करेन ऑफिस सुटल्यावर."पाकिट खिशात ठेवत राहूल उत्तरला.

**फोन आला तशी आशा पटापट तयार झाली.राहूल ही का ॅफी घेवून तयार झाला. घराचे लॅच ओढले.आणि बोलत बोलत पायरी उतरत असताना तिची चप्पल स्लीप झाली आणि ती जोरात पडली.तिला उठताही येईना.राहूल एकदम खूपच घाबरला.त्याने मोहनला फोन लावला.मोहन समिक्षा गाडी घेवून आले.हा ॅस्पिटल मध्ये अॅडमिट केले.पायाचे हाड मोडले होते कमरेला मार लागला होता. ऑपरेशन करावे लागणार होते.**

**समिक्षाने आशाला धीर दिला मी आहे सोबत सर्व व्यवस्थित होईल म्हणत तिच्या डोक्यावरून हात फिरवला.व तिला जेवू घातले.**

**ऑपरेशन व्यवस्थित पार पडले.आशा तिच्या जवळच होती.**

**अनिल अक्षता ही हा ॅस्पिटल ला पोहचले.आठ-दहा दिवस तरी लागणार होते.समिक्षा शीतल आशाचे सर्व आपलेपणाने करत होते.अक्षता हे सर्व पाहत होती.**

"वहिनी,दोन दिवसापासून तुम्ही थांबत आहात आज तुम्ही घरी थांबा. मी किंवा शीतल थांबू.घरी थोडा आराम होईल."समिक्षा म्हणाली.

"खरंच किती काळजी घेतात ह्या आपल्या मुलीची आणि आपल्या डोक्यात तेच खूळ सावत्र सावत्र हे म्हणतात तेच खर हाताची पाचही बोटे सारखी नसतात."अक्षता आपल्याच विचारात होती.

"वहिनी चालेल न तुम्हाला " समिक्षाच्या प्रश्नाने ती भानावर आली.

**हो, हो चालेल.' अक्षता उत्तरली.**

"उद्या बहुतेक डिस्चार्ज मिळेल."आशा जवळ बसत राहूल म्हणाला.पण पंधरा पंधरा दिवसांनी चेकिंग साठी यावे लागेल.तीन महिने लागतील बरे होत पर्यंत.आणि आशा बाबा आई म्हणत होते त्याच्या कडेच राहा म्हणून खालचे घर असल्यामुळे हाॅस्पिटललाही चेकिंग साठी येताना त्रास होणार नाही.चालेल ना तुला.

'हो 'आशा म्हणाली.

**दुस-या दिवशी डिस्चार्ज मिळाला.मोहन गाडी घेवून आला होता. समिक्षाने शीतलची रूम रिकामी करून आशा साठी दिली. वरच्या रूममधून तिला हाॅस्पिटल मध्ये चेकिंगला जातांना त्रास झाला असता.**

"आता व्यवस्थित आराम कर आंणि लवकर बरी हो" मोहन म्हणाला.

"परवा आम्ही ही निघू म्हणतोय तशी मध्ये परत चक्कर मारू." अनिल मोहनला म्हणाला.

'हरकत नाही चालेल.'मोहन उत्तरला.

**राहूलचेही ऑफिस रूटीन सुरू झाले होते.घरी समिक्षा शीतल आशाची व्यवस्थित काळजी घेत होत्या.**

**आपण वेगळे त्यांची इच्छा नसताना राहत आहोत तरीही तिघांचेही वागणे किती आपले पणाचे शीतलने तर आपली रूम दिली माझ्यासोयीसाठी.आंणि आई किती करतात आपलेपणाने म्हणूनच राहूलला इतका जिव्हाळा आहे.आपलेच चुकले. आपण एका असा वेगळे होण्याचा विचार करायला नको होता.आशा आपल्याच विचारात होती.**

"आशा, उद्या ब्लास्टर काढणार सर्व व्यवस्थित आहे डाॅक्टर म्हणत होते."समिक्षा जवळ बसत आशाला म्हणाली.

**समिक्षाला मिठी मारत आशाला रडू आले.आई माझे खूप चुकले मला माफ करा माझ्या मनात चुकीचा समज होता आपण परत एकत्र राहिले तर चालेल न.**
**अग चालेल आवडेल हे घर आपणा सर्वांचेच आहे.**

**दारात उभेअसलेले राहूल,मोहन सासू सुनेला असे पाहून मनोमन सुखावले.**

**{सौ. माधवी मिलींद खडक्कार. तळेगाव वाभाडे,9226413006}**

# स्मार्ट मैत्री

**खूप दिवसात सविताशी बोलणंच झालं नाही, आज सकाळी सकाळीच व्हिडिओ कॉल लावू या !असं मनात आलं आणि लगेच कॉल केला. नेहमीप्रमाणे तिच्या नातवानेच उचलला. "आज्जी, जयश्री आज्जीचा फोन आहे." असं म्हणत त्याने सविताला फोन दिला.**

हॅलो, कशी आहेस सविता ? "मी बरी आहे " असं ती म्हणताच , " बरी का गं ? छान नाहीस का?" मी विचारले .." नाही ग , घरात बसून खूप कंटाळा आलाय.. चाळीस वर्षे घराबाहेर पडून नोकरी केली. शाळेमध्ये कायम मुलांच्यात रमण्याची सवय, सध्या या करोना मुळे बाहेर पडता येत नाही.. कुणाच्या घरीही जाता येत नाही..देवळंसुध्दा बंद.. कोणालाही भेटता येत नाही. कंटाळा आलाय गं अगदी. " तिच्या चेहऱ्यावरचा उत्साह, तेज नाहीसं झालं होतं तो आणण्यासाठी म्हणून मी म्हटलं .. "अगं, त्याला पर्याय आहे की भेटण्याचा.. आत्ता कसा मी तुला, व्हिडिओ कॉल केलाय तसा..!"

" बाई ग, ते मला जमत नाही म्हणून तर प्रॉब्लेम आहे ." असे ती पडेल सुरात म्हणाली.

"अग सविता, अवघड काहीच नसतं . तुझ्या लेकीनं, तुला मुद्दाम निवृत्तीचे गिफ्ट म्हणून , स्मार्टफोन दिला आहे , ते तू निवृत्ती नंतरचे आयुष्य स्मार्ट पणे जगावस म्हणून." तेवढ्यात शेजारी खेळत बसलेला नातू 'वरद' मला म्हणाला "जयश्री आज्जी , मी सगळं शिकवतो तिला.. पण , तिला अवघड वाटतं म्हणून ती शिकतच नाही " .. लगेच सविताने कौतुकाने त्याचा पापा घेतला. "हो ना,अरे मी
सांगते हं तिला समजावून ती शिकेल या पुढे ".. असं मी म्हणताच तो एकदम खुष झाला आणि सविताही हसली.

" अगं सविता , तू मला सांग सगळं शिक्षण ऑनलाईन होईल असं कधी तुला वाटलं होतं का ?"

"नाही ग, शाळा,वर्ग,मुले, टेबल-खुर्ची, फळा हा रुबाबच वेगळा ! म्हणूनच तर मी शिक्षिका झाले." असे सविता मोठ्या उत्साहाने म्हणाली. मी तीला म्हणाले " पण आता, त्या शिक्षकांना बघ , बिना वर्गाची शाळा घ्यावी लागते. पण शिक्षक व मुलांनी हा बदल स्वीकारलाय , शिकून आत्मसातही केला म्हणूनच शिक्षण थांबलं नाही." यावर सविता

निश्वास टाकत म्हणाली " बरं झालं बाई, माझ्या निवृत्ती नंतरच कोरोना आला, नाही तर मलाही असंच शिकवावं लागलं असतं. मोठं संकटच आले असते."

मी हसतच म्हणाले " खरं सांगू सविता, संकटे आपली गुरू असतात. खूप काही शिकवून जातात."

"हो ना गं,आता ही स्वच्छता, काळजी घेणं बघ ना शिकलोच की आपण " सहजपणे सविता बोलली. "अगदी बरोबर, तसेच आता आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोगही करता आला पाहिजे. त्यामुळे आपणही , काही अंशी स्वावलंबी होतो." असं मी म्हणतानाच " म्हणजे मायक्रोवेव्ह , फूड प्रोसेसर अशा गोष्टी वापरता येणे , ते येते मला." असं आत्मविश्वासाने सविताने सांगितले." हो ना , मग स्मार्ट फोन ही तुला नक्कीच वापरायला जमणार. अगं मीही तुझ्यासारखीच विचार करायचे..फोनच्या जास्त आहारी जायचं नाही... गरजे पुरता वापरता आला म्हणजे झालं... पण आता या लॉकडाऊन मध्ये मला जाणवलं.. बाहेर सगळं बंद होतं तेव्हा या फोनच्या मदतीने आम्ही कार्डद्वारे अनेक बिलं भरू लागलो ...व्हिडिओ कॉल वरून मैत्रिणींशी , मुली-जावई , नातवंडाशी गप्पा मारू लागलो... व्हॉट्सअॅप,फेसबुक ,मेल वर मी माझ्या कथा,कविता पाठवू लागले... तू ही ,सुंदर चित्र काढतेस...ते ग्रुप वर टाकू शकतेस.

वाणसामान, भाजी ,औषधे ऑनलाईन मागवू

लागले." "अगं फक्त तुलाच सांगते हं, लॉकडाऊन मध्ये मला नागीण झाली होती. ( हळू आवाजात सांगितले) त्याचे औषध कडुलिंबाच्या पाल्याचा लेप हे मला युट्युब वर सापडले .ते लावून माझी नागीण १० दिवसात बरीही झाली. "

"काय सांगतेस ?" सविता आश्चर्यने म्हणाली.

" एवढेच नाही तर युट्युब वर खूप काही शिकायला मिळतं .आत्ता सध्या आम्ही गीता शिकतोय. आपल्याला हवे ते आपण घरी बसून शिकू शकतो. माहिती घेऊ शकतो. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे आरोग्य सेतु अॅप आपल्याला वापरता आलंच पाहिजे. ते कोरोना पासून रक्षण करण्यासाठी मदत करतं.

हे सगळं मलाही शिकावं लागलं. काही गोष्टी मुलींकडून फोनवरून शिकले .काही युट्युब वर शिकले. लगेचच सगळं जमतंच असं नाही. पण हळूहळू जमतं आणि मग अवघडही

वाटत नाही. मनाशी ठरवलं की सगळं जमतं.त्यामुळे घरी बसूनही कंटाळा न येता. आमचा वेळ छान जातोय."

" प्रत्यक्ष भेटता येत नाही याचं नक्कीच वाईट वाटतं. पण सध्या घरात राहणंच सुरक्षित आहे ना ?"

इतक्या वेळ शांतपणे ऐकून घेणारी सविता म्हणाली "जयश्री,तू एवढं समजावून सांगितलंस की आता मलाही वाटू लागलाय ,आपणही शिकावंच. नातू तर एका पायावर तयारच आहे. मी नक्की शिकेन आणि तुला व्हिडिओ कॉल करीन .ग्रुपवर जॉईनही होईन. आज खूप बरं वाटलं तुला भेटून व बोलून."

मीही हसत म्हणाले " तू हुशार आहेस गं, लगेच शिकशील,पण काळानुसार फोनशी 'स्मार्ट मैत्री' करून आपले आयुष्य सुटसुटीत व आनंदी जगायचं..

हो, पण 'स्मार्ट मैत्री' कामापुरतीच ठेवायची. आहारी जायचं नाही. हे आपल्याला माहीतच आहे .चल,ठेवते आता. तुझे शिक्षण सुरू कर. तुला त्यासाठी शुभेच्छा. बाय् बाय्"

फोन बंद कसा करायचा हे सविताला सांगत वरदने ही बाय् बाय् केले.

अन् खरंच , बरोबर आठ दिवसाने सविताने सुंदर चित्र टाकून ग्रुप जॉईन केला आणि मला व्हिडिओ कॉलही करून 'स्मार्ट मैत्री' सिध्दही केली..

{सौ जयश्री जयंत श्रीखंडे}

# सुहृद

शांत-स्थिर पाणी , त्यावर मावळतीची केशरी-गुलाबी छटा , पाण्याची हलकी खळखळ , सगळं कसं निरामय . आकाशात परतीचे प्रवासी सूर्याला त्याची वेळ संपल्याचे खुणावत होते . नदीकाठी मोठाले खडक एखाद्या व्रतस्था सारखे निश्चल .

तिथेच एका खडकावर पार्थ सुन्न बसलेला . जणू युगानुयुगे ह्या सृष्टीचा तोही एक हिस्सा .

निसर्ग हा बघणाराच्या नजरेत असतो आणि पार्थला आज तो अतिशय उदासवाणा वाटला . गेले अनेक दिवस तो रोज संध्याकाळी इथे येऊन बसत असे . मनात प्रचंड गोंधळ , आणि डोळ्यासमोर अंधार . पुढे वाट दिसत नसतांना चालावे लागणे ही अगतिकता तो अनुभवत होता ......

सानियाने किती बेदारकपणे सांगून टाकले होते .....मला तुझ्याशी मुळीच संसार करायचा नाहीये ....माझ्यावर कुठलाच हक्क दाखवायचा नाही .....काही तास आधी जरी बोलली असती तरी किती मोठा अनर्थ टळू शकला असता ....अक्षता पडल्या , आणि ती कानात कुजबुजली ....किती सहज ....खेळतांना कानगोष्टी सांगाव्यात इतक्या सहज पणे ....आपण म्हणालो ...सानिया , पूर्ण आयुष्य पडलंय चेष्टा करायला ..तर..फटकन म्हणाली , ...चेष्टा तर तुम्ही सगळ्यांनी केलीय माझी .....

पार्थ खडकावरून उठला . त्याला वाटले , अंधाराचा ही एक रंग असतो . त्यात प्रकाशाची तिरीप मिसळली की बदलणारा .
नाहीतर कुठल्याही रंगाला खाऊन टाकणारा . आपल्याही आयुष्यात असा दुसऱ्या रंगावर हावी होणारा अंधाराचा रंगच आहे . आधी मम्मी पप्पांच्या रुपात , आणि आता सानियाच्या .

पार्थ चौथीत असेल . शाळेतून घरी आला , दप्तर जागेवर ठेवले आणि
" मॉ ऽ ऽ म ! " अशी हाक मारली . आई स्वयंपाक घरात नव्हती . तो घरभर आईला शोधत फिरला . दामू काका होते , वीणा मावशी होत्या , पण आई नव्हती .
" मावशी , मॉम कुठाय ? "
" मॅडम सांगून गेल्यात की त्या आता येणार नाहीत . "
" म्हणजे ? आजीकडे गेलीय का ? यु . एस ला ? " त्याचा भाबडा प्रश्न .
इतक्यात पप्पांचा फोन आला .
" पार्थ बेटा , ममा कंपनीच्या कामाने बाहेर गेलीये . येईल काही दीवसांनी हं , तू मावशी बाईंकडून सगळं करून घे
हा . " ........ .

पार्थ रोज तिची वाट पाही . तासनतास बाहेर पोर्च मध्ये गेटकडे डोळे लावून बसे . कधी मागील तळ्याच्या काठावर बसून राही . एक वीणा मावशीच होती , जीच्याकडे तो त्याच्या इवल्याश्या जगातील गोष्टी सांगत असे . मावशीला पण त्याचा खूप लळा लागला होता . दोन महिन्यात मॉम आली . एक मोठी कार बाहेर थांबली होती . इवलासा पार्थ धावत तिच्याकडे गेला . मॉम ला घट्ट मिठी मारली आणि बाहेर कार जवळ एक अंकल उभे असलेले दिसले , तशी त्याची पकड ढिली झाली .
" सगळे बोलतात ते खरे आहे मॉम? तू पप्पांसोबत आता कधीच नाही रहाणार ? "
" पण मी तुला न्यायला आलेय पार्थ , माझ्यासोबत चल बेबी , " रेवा म्हणाली .
पार्थ ने धावत जाऊन वीणा मावशींना पकडले . काही दिवसातच पप्पांनी दुसरं लग्न केलं होतं ....त्यांनी आपल्या मुलाचे शिक्षण मात्र पूर्ण केले . पार्थ खूप शिकला . मोठा माणूस झाला . त्याच्या आयुष्यात एकच व्यक्ती कायम सोबत होती , वीणा मावशी ! आई वडिलांच्या प्रेमाला तो कायम भुकेलाच राहिला .
स्टार इंडस्ट्रीच्या मालकांच्या मुलीशी , सानियाशी त्याचे लग्न ठरले . त्याच्या सावत्र आईच्या नात्यातील कुणी होते ते . लग्न लागेपर्यंत सानियाने एका शब्दाने पार्थला विरोध केला नाही , मग लग्न लागल्याबरोबर लगेच का सांगितले तिने ?....आधीच ठरवून ठेवले होते का ? ...............
........ " पार्थ , माझ्या ' पॅरेन्ट्सनी' माझ्यावर लग्नाची सक्ती केलीये . मी आधीच एका बरोबर ' लिव्ह इन ' मध्ये रहातीये . माझं तुझ्याशी काही वैर नाही , तुही माझा राग करू नकोस . मी जातेय . मी त्यांच्यावर सूड उगवलाय , त्याचा तू बळी ठरलाय इतकंच . आय एम सॉरी ! पण नो वे , मी जातेय . " ....हे सगळं आता आठवत होतं त्याला ...आठवणी तरी कशा , चिकट जळमटासारख्या....
** " पार्थ बाबा , कुठे गेला होतास ? "
" तळ्याकाठी . "
" स्वीडन वरून मोठ्या साहेबांचा फोन येऊन गेला . तुला विचारत होते . नवीन मॅडम पण बोलल्या . "
"......"
" पार्थ , "
" मावशी , आपल्या आयुष्यात आनंद कशात आहे हे कसं ओळखायचं ? "
" माझ्या आयुष्यातील आनंद तर तूच आहेस बेटा . ...तुझ्या बाबतीत म्हणशील तर तुला इतरांसाठी काम करूनच आनंद मिळतो ...आठवतं ? किसन ड्रायव्हर चा बबलू ? तुझे सगळे खेळणे तू त्याला दिले तेव्हा आणि दामू काकांच्या मुलीला आजारपणात तुझी सगळी पिगी बँक देऊन टाकली होतीस ....तेव्हा इतकं खूष कधीच नाही बघितलं मी तुला . मोठे साहेब एकदा तुला अनाथाश्रमात भेट द्यायला घेऊन गेले होते , तेव्हा दोन दिवस तू कुणाशीच बोलला नव्हतास . शेवटी साहेब

पुन्हा तुला तिथे घेऊन गेले . थंडीचे ब्लँकेट वाटले सगळ्यांना , वह्या पुस्तके दिली , तेव्हा कुठे शांत झाला होतास तू .

तळ्याकाठी बसलेला असतांना त्याच्या मनात जो अंधार होता , गोंधळ होता , तो शांत झाल्यासारखे वाटले त्याला . अचानक वाट सापडावी तसे … ….त्याचा निर्णय झाला होता .

पार्थ , मॅनेजर दळवी आणि आर्किटेक्ट आशिष एका मोठ्या जमिनीवर उभे होते .

" आशिष ह्यातली पूर्ण एक एकर जमिन आपल्याला ह्याकरता वापरायचिये . लवकरात लवकर प्लॅन बनवा . …..पार्थ भराभर सूचना देत होता .

स्वीडन वरून पप्पा फक्त चौकशी करायचे . मॉमने मनाविरुद्ध पप्पांशी लग्न केलं , जे टीकलं नाही . मग दोघांनि आपला आनंद दुसरीकडे शोधला . सानियाने आपल्या आईवडिलांवर सूड उगवतांना आपला बळी दिला ….मग इतक्या अशाश्वत जगात शाश्वत काय आहे ? ह्याचे आपल्या परीने पार्थने उत्तर शोधले होते .

वर्षभरात अर्ध्या एकरात प्रचंड मोठे अनाथाश्रम उभे राहिले , ""सुहृद" !!. उरलेल्या भागात भव्य संस्कार आश्रम उभा केला होता . प्रचंड मोठा शामियाना घातला होता . आजूबाजूला भरपूर हिरवाई होती . भरपूर वृक्षारोपण केले होते . साधी पण आकर्षक सजावट केली होती . दामू काका आणि वीणा मावशीच्या हातून दोन्ही विभागाचे उद्‌घाटन करून त्यांच्या प्रेमाची अंशतः परतफेड केल्यासारखे वाटले त्याला .

भरकटलेल्या तरुणांना तिथे योग्य दिशा दाखवण्यासाठी मोठी ज्ञानी मंडळी आली होती . समाजातील अनेक मोठी मंडळी , डॉक्टर , शिक्षक आणि समाजसेवक आले होते . आजूबाजूचे लोक हे भव्य कार्य बघायला आले होते . गाड्यांचा ताफा लागला होता .

" पार्थ , बघ कोण आलंय . " मावशी म्हणाल्या .

" मॉम ! " त्याने नमस्कार केला .

भरल्या डोळ्यांनी रेवा सगळे बघत होती .

" पार्थ , मला कधी माफ करू शकशील ? "

" मॉम , निदान माझ्या भोवतालच्या वर्तुळात तरी विवाह एक बंधन न होता एक समर्पित सहजीवन व्हावे यासाठी मी आयुष्य वेचेन . ह्यासाठी मोफत समुपदेशन केंद्र आहे इथे . शेकडो अनाथ मुलांचा सांभाळ होईल , अगदी प्रेमाने . पुन्हा कधी कुणी एका ' पार्थ ' ला जन्माला घालून दुसरीकडे आपला आनंद शोधणार नाही , नक्कीच . पार्थच्या डोळ्यात 'सुहृद' चे प्रतिबिंब दिसत होते .

{अपर्णा देशपांडे}

# उत्तररंग

कालपासून रिपरिप पडणारा पाऊस थांबायचे नाव घेत नव्हता त्यामुळे रेवा कंटाळून गेली होती एक तर कोकणातले हे आडबाजूचे गाव, सगळी कौलारू घर, एखादं अधेमध्ये सापडणार क्वचितच दिसणारे सिमेंटच घर पण ते एखाद्या सुंदर निसर्गचित्रात एखादा काळा ठिपका नको तिथे असावा असे वाटायचे,

नाही म्हणायला आता थोडा फार शहरीकरणाचा प्रभाव गावावर झाला होता पण अजून गाव आपले देखणेपण टिकवून होते,

आजूबाजूला गच्च माड पोफळ्यांची गर्दी व त्यातून दिसणारा आभाळाचा निळाशार तुकडा, सोबतीला समुद्राची घनगंभीर गाज.. आणि लाल माती....

इथे बदली झाल्याचे कळताच रेवा व सुरेश थोडे हिरमुसले होते त्यांचे अख्खे जीवन शहरात गेले होते आणि नौकरीच्या शेवटी शेवटी प्रमोशनवर इथे बदली झाली होती, ही बदली रद्द करण्यासाठी सुरेशने खूप प्रयत्न केले पण ती रद्द होवू शकली नाही आणि नाईलाजाने ते दोघे इथे आली होती, पण इथे आल्यावर मात्र दोघेही हरखून गेली होती, शहरी जीवनापासून लांब, शांत या वातावरणाची त्यांना जणू भुलच पडली,

पहिल्यांदा त्यांना या वातावरणाशी जुळवून घेताना थोडा त्रास झाला पण लवकरच ते दोघे ह्या वातावरणात एकरूप होवून गेले.

दोन दिवसांपासून पावसामुळे बाई पण कामाला आली नव्हती, त्यात तिला अंगात कणकण पण जाणवत होती त्यामुळे रेवा थोडी चिडली होती पण काम केल्याशिवाय गत्यंतर नव्हते म्हणून उठत बसत काम उरकत होती, रेवाने सर्व काम ओटपले व ती बाहेरच्या व्हान्यांड्यांत येवून उभी राहिली आणि तिला तो दिसला, साधारण पंचवीस तिशीचा असेल अगदी तिच्याकडे एकटक पाहत उभा होता, कधीपासून उभा होता काय माहीत? पण कोसळणाऱ्या पावसात निथळत एकटक पाहत उभा होता.

तिने रागाने त्याला ,

"काय रे? काही काम नाही का? निर्लज्ज कुठला"

असे म्हणून झिडकारले, तरी पण तो काही न बोलता अगदी त्याने काही ऐकलेच नाही अशा आविर्भावात उभा होता, शेवटी तीच रागारागाने आत निघून आली, आता अंगात ताप चांगलाच जाणवत होता, म्हणून तिने एक गोळी घेतली व झोपली,

"खटखट, खटखट" साखळीच्या या आवाजाने तिला दचकून जाग आली, आजूबाजूला अंधार पसरला होता, कुणीतरी दरवाजा वाजवत होते, तिला एकदम दुपारच्या त्या माणसाची नजर आठवली ती मनोमन शहारली, धडपडत तिने भरभर लाईट लावले, आता आवजाबरोबर नवऱ्याचा आवाज पण येऊ लागला, तिने पटकन जाऊन दरवाजा काढला,

"काय ग? एवढा का उशीर झाला दरवाजा उघडायला, केंव्हाचा दरवाजा वाजवत होतो, किती गाढ झोप तुझी, मी बाहेर काकडून गेलो"

तिने काही न बोलता त्याच्या हातातील पिशव्या घेतल्या व दारापलीकडे नजर फिरवली, तिथे आता कोणी नव्हते, तीला थोडे हायसे वाटले पण ती थंड, एकटक नजर तिचा पिच्छा सोडत नव्हती, असे वाटत होते जस काही ती नजर इथेच अंधारात तिच्यावर पाळत ठेवून आहे, ह्या विचाराने ती अधिकच घाबरली, कसाबसा तिने नवऱ्याला चहा केला, स्वतः घेतला आणि हातपाय धुवून देवापाशी दिवा लावला आणि स्वामी महाराजांच्या समोरचा अंगारा कपाळावर लावला त्याने तिला थोडे बरे वाटले..

सुरेश बाहेर टीव्ही पाहत बसला होता, तेवढ्यात लाईट गेले, हा तर इथला नित्यक्रम.....

सुरेशने कंदिल लावले, आणि तो रेवाला हाक मारू लागला, पण रेवाचा कुठेच आवाज येईना तो घाबरून गेला, त्याने बाहेरच्या अंगणात पाहिले तर रेवा चाफ्याच्या झाडाखाली पावसात भिजत उभी होती, तो घाबरून गडबडीने तिच्याजवळ गेला,

"रेवा..., अग रेवा, इथे काय करत आहेस...?

"चल, आत चल"

पण जसे काही रेवाला काहीच ऐकू येत नव्हते, ती एकटक कुठेतरी शून्यात पाहत उभी होती, मग  सुरेशने तिला हाताला धरून घरात आणले, तिचे अंग कोळसा तापावा तसे तापले होते, त्याने आत आणून तिचे कपडे

बदलले आणि कसेतरी एक ग्लास दूध पाजवून गरम ब्लँकेट गुंडाळून झोपवले आणि स्वतःही एक ग्लास दूध पिवून तिच्याशेजारी झोपला...
रात्रभर पाऊस उधाण आल्यासारखा घरावर नाचतच होता,
सकाळी सुरेशला जाग आली, त्याने रेवाकडे पाहिले ती अजूनही झोपेतच होती, त्याने तिच्या अंगाला हात लावला ताप थोडा कमी झाला होता, त्याने चहा केला व रेवाला उठवले तापेमुळे ती अजूनही गुंगीतच होती, कसेबसे उठून तिने नित्यकर्म उरकले  चहा घेतला व पुन्हा झोपली, सुरेशने ऑफिसमध्ये फोन करून आपण येणार नसल्याचे कळवले तेवढ्यात लक्ष्मी घरकामासाठी आली, तिने रेवाची हालत पहिली व म्हणाली,

"सायबानू, लय अंग गरम झालाय बाईच, तुमी जावा डॉक्टरांक बोलवून आण जा, मी वायल इथंच थांबतय"

सुरेश डॉक्टर कडे गेला व लक्ष्मी घरातले काम आवरू लागली, पाऊस थोडा कमी होता पण थांबला नव्हता, लक्ष्मीने रेवासाठी पातळ भाताची पेज केली व तिला पाजवण्यासाठी ती बाहेर आली तर रेवा जागेवर नव्हती, तिला वाटले बाई बाथरूममध्ये असतील म्हणून तिने पेज झाकून ठेवली व बाकीच्या कामाला लागली, बराच वेळ झाला तरी बाई का बाहेर येत नाहीत म्हणून तिने बाथरूमचा दरवाजा उघडला तर बाथरूम रिकामे होते, ती घाबरून गेली...
"बाई..., बाई, कूट हाईसा?"
पण रेवाचा काहीच आवाज येत नव्हता, तिने शेवटी अंगणात जाऊन हाक मारायला सुरुवात केली आणि तिची नजर रेवावर पडली, रेवा कम्पाउंडच्या बाहेर रस्त्यावर पावसात भिजत उभी होती, लक्ष्मीला कळेना बाई अस काय करत्यात, तिने रस्त्यावर जाऊन रेवाला हात धरून घरात आणले, तिचे डोके पुसले व म्हणाली,
"बाई, अस बाहीर का गेला व्हता?"
पण रेवाला काही ऐकूच येत नव्हते ती एकटक बाहेर रस्त्यावर पाहत होती, तिची ती थंड नजर पाहून लक्ष्मी हादरली, तिने आत जाऊन मीठ, मोहरी व

मिरची तिच्यावरून ओवाळून टाकली व आपली जाड काळ्या चामड्याची चप्पल उतारली
व कसेबसे तिचे कपडे बदलून ती साहेबाची वाट पाहत बसून राहिली...
सुरेश डॉक्टरला घेऊन आला, त्यांनी तिला तपासले व काही औषध देऊन एक इंजेक्शन दिले व काळजीचे कारण नाही असं म्हणून ते गेले..
डॉक्टर जाताच लक्ष्मीने सुरेशला मघाचा किस्सा सांगितला ते ऐकून सुरेश घाबरून गेला, लक्ष्मी म्हणाली,
"सायबानू हे काय तरी येगळच परकार हाय, काय तरी येगळच, बाईवरून काय तरी ववाळून टाकावं लागलं, बाहेरची बाधा झालीया त्यासनी"
सुरेश हे ऐकून सुन्नच झाला, आयुष्यात पहिल्यांदाच अशा प्रकारची घटना तो बघत होता, ऐकल्या खूप होत्या पण कधी अशा गोष्टींचा सामना केला नव्हता, मुळात अशा गोष्टीवर त्याचा विश्वास नव्हता, त्याला वाटले अति तापेमुळे रेवा अस करत आहे, त्याने लक्ष्मीला समजावून सांगितले, लक्ष्मी जाता जाता म्हणाली,

"सायबानू तुमचा इश्वास नाय, पण तरी सांयकाली मी गुरुजीस घेवून येती"

लक्ष्मी निघून गेली, आता पुन्हा पाऊस वेड लागल्यासारखा कोसळू लागला, सुरेशने लक्ष्मीने केलेल्या भाकरी खाल्ल्या, रेवाला पेज पाजवून गोळ्या देवून झोपवले व तो पण झोपला, अर्ध्या एक तासाने दाराच्या आवाजाने त्यास जाग आली आणि रेवाकडे नजर केली तर रेवा जागेवर नव्हती त्याला वेगळीच शंका आली म्हणून तो पळत बाहेरच्या हॉल मध्ये आला तर रेवा दरवाजा उघडून बाहेर पडत होती, घाबरून त्याने आवाज दिला,
"रेवा..."
त्या आवाजसरशी रेवाने मागे वळून पाहिले व ती म्हणाली,

"काय झाले? का ओरडलात? मी फक्त पाऊस कमी झाला की नाही ते पाहत होते"

तिने हे उत्तर देताच त्याच्या जीवात जीव आला, तो तिच्याजवळ आला, तेवढ्यात रेवा म्हणाली,

"अहो तो माणूस दिसतोय का? दोन दिवसांपासून बाहेर उभा आहे, काल तर चक्क आपल्या चाफ्याखाली येवून उभा होता, मी त्याला खूप समजावून सांगितले पण तो काही बोलत पण नाही व जात पण नाही"

सुरेश ते ऐकून घाबरला त्याने रस्त्यावर पाहिले पण रस्त्यावर कोणीच नव्हते, आता सुरेशची खात्री पटली की रेवाला तापेमुळे नको ते भास होत आहेत, त्याने रेवाला हात धरून आत आणले व पलंगावर बसवले आणि तिचा हात धरून तो मृदुपणाने म्हणाला,

"रेवा, अस काय करतेस तिथे कोणीही नाही तुला भास झाला असेल"

रेवा थोडी गप्प बसली व एकदम उसळून म्हणाली,

"म्हणजे? मी तुम्हाला वेडी वाटते का? का मला वेड करायचं तुम्ही ठरवलं आहे....? दोन दिवसांपासून तो माणूस जातच नाही तेथून मी विचारले पण त्याला, काय काम आहे तुझे? तर... बोलत पण नाही"

सुरेश पुन्हा म्हणाला,

"रेवा तू झोप, उगाच कसलातरी विचार करू नकोस"

आता रेवा तरतर उठली व सुरेशचा हात ओढत खिडकीपाशी घेवून गेली, आणि म्हणाली,

"बघ, बघ ना...., अजूनही तो तिथेच उभा आहे, लोचट मेला, आणि तू म्हणतोस तिथे कुणीही नाही"

सुरेशने आता तिच्या कलाने घ्यायचे ठरवले व तो म्हणाला,

" हो ग!' खरच.. माझं लक्षच नव्हते गेले, आता चांगले त्याला खडसावतो, पण तू टेन्शन घेवू नकोस, तू झोप आता"

हे ऐकून रेवा थोडी शांत झाली, व निमूटपणे जाऊन आत जाऊन झोपली, इकडे सुरेशने डॉक्टरला फोन करून सगळी हकीकत सांगितली, व स्वतःच्या आईला व तिच्या माहेरी फ़ोन करून गेल्या आठ दिवसातील सगळ्या घडामोडी सांगितल्या. हे सगळे ऐकून ते लोक घाबरून गेले व ताबडतोब यायला निघाले, दरम्यान संध्याकाळच्या वेळी डॉक्टर आले व त्यांनी रेवाला तपासले तिचा ताप थोडा कमी झाला होता व ती थोडी फ्रेश वाटत होती, त्यांनी तिच्याशी थोड्या जुजबी गप्पा मारून एक इंजेक्शन दिले व सुरेशला सोबतीस कुणाला तरी बोलवण्यास सांगितले, डॉक्टर जाताच रेवा उठून बाहेर आली व खिडकीतून बाहेर बघत म्हणाली,

" तुम्ही झापले का त्या माणसाला?" दिसत नाही तो "

"हो मग, चांगलेच रागावले मी त्याला, बर ऐक ना"

सुरेशने संभाषणाची गाडी दुसरीकडे वळवली,

पण रेवाचे लक्षच नव्हते, ती बाहेरच बघत होती,
पुन्हा सुरेश जोरात म्हणाला,

"रेवा.."

रेवा एकदम हडबडली व म्हणाली,

" काय, म्हणत आहेस?"

"उद्या सकाळी मुकुंद व आई येणार आहेत"

सुरेशने सांगितले, हे ऐकताच रेवाच्या चेहऱ्यावर काही वेगळेच बदल झाले पण तिने क्षणार्धात स्वतःला सावरले व म्हणाली,

" अग बाई! हो का" असे अगदी अचानक कस काय येत आहेत ते?"

"अग! मीच बोलावून घेतले, मला जास्त रजा मिळणार नाही आणि तुझी तब्येत पण ठीक नाही म्हणून"

"हम्मम" रेवा उद्गारली

त्या रात्री सुरेशने लक्ष्मीला सोबतीस बोलवले, त्याला रेवाची आता खरतर मनातून भीती वाटू लागली होती, ती रात्र शांततेत गेली दुसऱ्या दिवशी सकाळी सकाळीच सुरेशची आई मालतीबाई व भाऊ मुकुंद हजर झाले, त्यांना पाहून सुरेशला हायसे वाटले, रेवा पण त्यांच्याशी व्यवस्थित वागली, मालतीबाई जरी पंचाहत्तरीच्या असल्या तरी अजून ताठ होत्या थोडा फार सांधेदुखीचा त्रास सोडला तर बाकी कोणतेही दुखणे त्यांना नव्हते, त्यांनी आल्या आल्या स्वयंपाकघराचा ताबा घेतला आणि लक्ष्मीला मदतीला घेवून सारे काम उरकून घेतले व त्या दरम्यान त्यांनी लक्ष्मीकडून बरीचशी हकीकत जाणून घेतली, त्या नंतरचे दोन दिवस रेवा शांतच होती तिचा ताप कमी जास्त होत होता, आता डॉक्टरानी तिला हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करायला सांगितले, त्याप्रमाणे तिला ॲडमिट करायचे ठरवले, पण ते एक खेडेगाव होते तिथे मोठे हॉस्पिटल नव्हते त्यासाठी तिला पन्नास किलोमीटर वरील एका शहरात घेऊन जायचे ठरवले, त्यासाठी मुकुंद व सुरेश तयारीला लागले व काही कामासाठी बाहेर गेले, मालतीबाई बाहेरच्या खोलीत जप करत बसल्या होत्या, आणि एकाएकी त्यांना मागच्या दरवाजाचा आवाज आला म्हणून त्यांनी जाऊन पाहिले तर रेवा मागच्या विहिरीपाशी काहीतरी हातवारे करत बडबडत होती, तो प्रकार पाहून मालतीबाई पण घाबरल्या, तेवढ्यात पुढील दरवाजाने लक्ष्मीने आवाज दिला तो आवाज ऐकताच रेवाने इकडे तिकडे पाहिले व जसे काही झालेच नाही अशा आविर्भावात ती आत आली व आपल्या खोलीत जाऊन

झोपली, मालतीबाई पटकन बाहेरच्या खोलीत आल्या त्यामुळे रेवाला त्या दिसल्या नाहीत, त्यांनी बाहेर येवून लक्ष्मीला खुणेनेच बाहेर नेले व घडलेला किस्सा सांगितला, हे ऐकून लक्ष्मी म्हणाली,

"मी तवाच सायबाना बोलली व्हती, पण तेनचा इश्वास न्हाई बसला, पण तुमी बगा मोठया बाई, आज सांच्याला काई तरी ववाळून टाका तेंच्या वरन, आन मग न्या इस्पितळात"

तेवढ्यात मुकुंद व सुरेश आले, त्यांनी रेवाला घेवून जाण्याची तयारी केली तेवढ्यात घाईघाईत लक्ष्मीने दोन नारळ तिच्यावरून उतरवून टाकले व म्हणाली,

"लवकर बरे होऊन या बाईसाहेब"

रेवा काहीच बोलली नाही, फक्त जाता जाता तिने मागच्या दरवाज्याकडे नजर फिरवली व गाडीत जाऊन बसली, गाडी निघाली व रेवाने खिडकीतून बाहेर हात काढला व तिने लक्ष्मीला बाय केले, तो बाय लक्ष्मीसाठी होता का अजून कोणासाठी हे मालतीबाई पाहत होत्या कारण रेवाची नजर चाफ्याकडे होती व हात लक्ष्मीच्या दिशेने हलत होता.... तो हात अगदी घर दिसेनासे होईपर्यंत ती हलवतच होती.

पन्नास किलोमीटरचा प्रवास संपवून ते सगळे संध्याकाळी सात वाजता हॉस्पिटलमध्ये पोहचले, फक्त आजची रात्र मुकुंद व सुरेश थांबणार होते मग सुरेश दुसऱ्या दिवशी तिच्या जरुरी टेस्ट वैगरे करून गावी परतणार होता कारण त्याला आता जास्त रजा मिळणे शक्य नव्हते, पण डॉक्टरांशी फोनवर बोलून दोन दिवसाला येणे जाणे करणार होता, तर मुकुंद तिथूनच आपल्या घरी जाणार होता व मालतीबाई तिच्या सोबत तिथेच राहणार होत्या, ह्या साऱ्या प्रवासात व दवाखान्यात आल्यावर ही रेवा शांत शांतच होती आणि तिची ही शांतता मालतीबाईना अस्वस्थ करत होती त्यांनी सुरेशला सांगून रात्रपाळीच्या नर्सची सोय करून घेतली, दुसऱ्या दिवशी सर्व जरुरी टेस्ट झाल्यावर सुरेश व मुकुंद निघून गेले इकडे मालतीबाईनी

रेवाला औषध दिले व त्या तिला रामरक्षा ऐकवू लागल्या ती ऐकवत असताना त्या रेवा कडे लक्षपूर्वक पाहत होत्या पण रेवा अगदी तल्लीनतेने ऐकत होती ते बघून मालतीबाईचे  मन समाधानी झाले, संध्याकाळी हॉस्पिटलसमोर एक गणपतीचे मंदिर होते तेथे त्या जाऊन आल्या, व तिथला अंगारा आल्यावर तिच्या कपाळावर लावला, नंतर त्या व रेवा बराच वेळ गप्पा मारत बसल्या, रेवा जेवून झोपी गेली मालतीबाई पण नर्स आल्यावर झोपी गेल्या, असे दोन दिवस गेले पण रेवा शांतच होती तिचे वागणे पाहून मालतीबाईना वाटू लागले की रेवाचे जे वागणे होते ते फक्त ताप जास्त असल्यामुळे होते बाकी काही नाही, त्यामुळे त्या थोड्या निर्धास्त झाल्या व आपल्या मनातील सर्व शंकांना त्यांनी बाजूला सारले. आज रेवाचा ताप खूपच कमी झाला होता, ती फ्रेश वाटतं होती, सर्व आवरून झाल्यावर ती मालतीबाईना म्हणाली,

"सासूबाई! अजून किती दिवस राहायचे येथे?" आता कंटाळा आला, आठ दिवस झाले, आता ताप पण कमी झाला आहे, सुरेशची पण खूप धावपळ होत आहे"

"अग! माझ्या हातात थोडंच आहे..! डॉक्टरांनी सांगितले की गाशा गुंडळायचा इथला, आता तुझे रिपोर्ट पण नॉर्मल आले आहेत, करतीलच लवकर डिस्चार्ज"

मालतीबाई म्हणल्या, हे ऐकून रेवा खिडकीतून बाहेर बघत बसली, व एकाएकी तिने मालतीबाईना विचारले,

"तुम्ही दररोज दासबोध, रामरक्षा, मनाचे श्लोक, ज्ञानेश्वरी वाचता ना..? मग ह्या साऱ्यांचे सार काय आहे?"

तिचा हा प्रश्न ऐकून त्यांना खूप समाधान वाटले, त्या म्हणाल्या,

"अग हे जे सारे महात्मे होवून गेले त्या सर्वांनी आपल्या ग्रंथातून आपल्या सर्वांसाठी खूप मोठे ज्ञानभांडार आपल्या समोर खुले केले आहे"

"मानवाचा सर्वात मोठा शत्रू कोण असेल तर त्याचे स्वतःचे मन..! ह्या जगातील सर्वात अवघड काम कोणते असेल तर ते म्हणजे मनावर विजय मिळवणे, काम, क्रोध, लोभ, मत्सर, मोह व मद हे सहा  प्रकारचे षडरिपू मानवाच्या अंगात असतात त्यावर विजय मिळवणे कोणत्याही माणसाला सहजपणे शक्य नसते, पण ज्यांनी मिळवला ते संत या पदावर जाऊन पोहोचले"

"पण मग..! ' मी' पणा म्हणजे काय, आणि जर हा 'मी' पणा संपला तर माणसाचे अस्तित्व काय..?"
रेवा ने पुन्हा प्रश्न विचारला

मालतीबाईनी बरीच कीर्तन, मोठ्या मोठ्या गुरूंचे प्रवचन ऐकली होती, त्या स्वतः उत्तम प्रकारे आध्यात्मिक लेखन करत असत, त्यांना आपल्या सुनेचे कौतुक वाटले, त्यांना माहीत होते रेवाला थोड्या गूढ आध्यात्मिक गोष्टींचे आकर्षण आहे, त्या म्हणाल्या,

"अग, आपले मन आरसा असते, ज्याचा फक्त समोरचा भाग आपणास दिसतो पण लपलेला भाग आपण कधीच नाही पाहू शकत, अस म्हणतात आरसा आपणास आपले खरे रूप दाखवतो पण तसे नसते, जी बाजू आपण उघड्या डोळ्यांनी बघू नाही शकत तिथे आपल्याला मनाच्या डोळ्यांनी प्रवेश करावा लागतो, ह्या ऋचा, मंत्र, मोठी मोठी ग्रंथ आपणास हेच तर ज्ञान देतात पहिले मनावर विजय मिळवा, स्वतः तला अहंकार रुपी राक्षस दमन करा, म्हणजेच मी पणावर विजय मिळवा, फक्त बाह्य शरीर म्हणजे माणसाचे अस्तित्व नव्हे, अस्तित्व हे त्यापलीकडे आहे, हे हजारातून एखाद्यास जमते तोच तर गुरुपदी पोहचतो, फक्त त्यासाठी योग्य मार्ग सापडावा लागतो, मी पणाचा शोध घेण्यासाठी रस्ता कोणता निवडायचा हे ज्याच्या त्याच्या कुवतीनुसार अवलंबून असते"

रेवा हे ऐकून बरीच शांत झाली, ती दिवसभर शांतच होती, मालतीबाई पण ज्ञानेश्वरी वाचत बसल्या,

एक दोन दिवसात रेवाचा ताप पूर्णपणे उतरला व ती चांगली झाली आणि डॉक्टरांनी तिला घरी घेवून जाण्यासाठी परवानगी दिली,

रेवा घरी आली, लक्ष्मीने भाकरतुकडा ओवाळून टाकला, आता रेवा पहिल्यासारखी हसत खेळत राहू लागली, तिने एकदाही खिडकीकडे किंवा गेटच्या बाहेर पाहिले नाही जणू तिने अस काही केलेच नव्हते असे तिचे वागणे होते हे बघून सुरेश व मालतीबाई यांचा जीव भांड्यात पडला, अशात एक महिना निघून गेला.
रेवा व मालतीबाई दररोज समुद्रावर फिरायला जात, तो फेसळणारा अमर्याद अथांग दर्या पाहून त्या व रेवा निशब्द होवून जात आणि तो बेभान वारा, ती समुद्राची गाज ऐकत त्या दोघी बराच वेळ तिथे थांबत व संध्याछाया पडताना त्या समुद्राचे अफाट रूप डोळ्यात साठवत घरी परतत,
सुरेश त्यांना नेहमी म्हणायचा,

"एवढे काय असते त्या समुद्राजवळ, दररोज जाता तिथं"
त्या दोघी काहीच बोलायच्या नाहीत, फक्त हसून एकमेकीकडे पहायच्या...

एके दिवशी सवयीप्रमाणे त्या दोघी समुद्रकिनारी गेल्या, नेहमीप्रमाणे नेहमीच्या जागी बसल्या म्हणजे मालतीबाई बसल्या व रेवा तिथल्या तिथे फिरू लागली, फिरता फिरता ती थोडी लांब गेली, मालतीबाईचे लक्षच नव्हते अंधार पडल्यावर त्यांच्या लक्षात आले की अजून रेवा आलीच नाही फिरून, त्या घाबरून गेल्या आता थंडीचे दिवस असल्याने अंधार पण लवकरच पडला होता, त्या धडपडत उठल्या, व जोरजोरात हाका मारू लागल्या, बराच वेळ हाक दिल्या नंतर त्यांना दुरून रेवा येताना दिसली तसा त्यांना धीर आला,

"अग...!कुठे गेली होतीस? किती हाका दिल्या तुला"

पहिले तर रेवा काही बोललीच नाही, मग म्हणाली,

"चालता चालता जरा लांब गेले होते"

मालतीबाईना थोडी शंका आली पण त्यांनी ती शंका झटकून टाकली. दुसऱ्या दिवशी लक्ष्मी आल्या आल्या म्हणाली,

मोट्या बाई, तुमाला बातमी कलली का..?"

मालतीबाईनी विचारले, "कोणती ग.."

तशी लक्ष्मीने उत्साहात बातमी सांगितली,

"अव, गावात लय मोटे बाबा ईनार हाईत, लय मोट सिद बाबा हाईत अस मनंत हाईत सारे जण, त्या गपंतीच्या रावलात हुनार हाय पवचन, उद्या पासन"

मालतीबाईना बरे वाटले, त्यांनी ती गोष्ट रेवाला सांगितली, रेवा पण म्हणाली ,

"बरे झाले, इथे असा काही कार्यक्रम होत नाही ह्या निमित्ताने बायका घराबाहेर तरी पडतील"

रामन शास्त्री एक मोठे पांडित्य, सरस्वती त्यांच्या जिव्हेवर नाचत असे, अनेक पुरस्कार त्यांनी मिळवले होते आध्यात्म व विज्ञान यांची योग्य रित्या सांगड घालून आपल्या पूर्वांजाच्या ज्ञानाचा ते प्रचार करत, असे हे पंडित त्या गावात प्रवचन देण्यासाठी आले होते, त्यांच्या ओघवत्या रसवंतीत अवघा गाव नाहून निघत होता, आजूबाजूच्या गावातून पण लोक प्रवचन ऐकण्यासाठी येऊ लागले, पारायनाच्या दिवशी पंगती संपता संपत नव्हत्या, रेवा पण सातही दिवस भक्तिभावाने प्रवचनास हजर राहिली, पारायनाच्या दिवशीचा प्रवचनाचा उत्तररंग जास्तच रंगत गेला होता व रेवाच्या डोक्यात शास्त्रीचे वाक्य जसेच्या तसे घोळत होते व त्यांचा आशीर्वाद...

शेवटच्या दिवशी मालतीबाई रेवाला घेऊन शास्त्री जिथे थांबले होते तिथे दर्शनासाठी गेल्या होत्या, दुपारची वेळ असल्याने गर्दी थोडी कमी होती, तिथे घेऊन जाण्याचा मालतीबाईचा एकच उद्देश होता तो म्हणजे रेवावर त्यांची नजर पडावी व जर तिला काही झाले असेल तर ती बाधा नाहीशी व्हावी, त्यांच्या डोक्यातून समुद्रावरची गोष्ट जात नव्हती, त्या दोघी गेल्या व त्यांनी त्यांच्या पायावर डोके ठेवले त्यांनी एकदाच रेवाकडे पाहिले व म्हणाले,

"बेटा...! आता सारं ठीक आहे ना ....?

"एक लक्षात ठेव, निसर्गाने माणसाला वेगवेगळी रूप दिली आहेत, आणि कुवतीप्रमाणे क्षमता जो आपली क्षमता ओळखतो तो परिघाबाहेर जातो, जो ओळखतो पण त्याच्यात कुवत नाही तो परिघातच राहतो, आपल्या सर्व जीवनाला वेढून राहणारा तो शुभंकर ह्या सर्व परिघाबाहेर आपल्या अस्तित्वासह असतो, ऋचा, वेद, तत्वज्ञान त्याची जाणीव म्हणजे काय..? ह्या पंचमहाभूतापासून तयार झालेल्या आपल्या ह्या शरीरात इच्छा, आकांक्षा, स्वप्न  सारं सारं असतं, स्वप्न म्हणजे आपलं आयुष्य आणि सत्य म्हणजे आपलं स्वतःच अस्तित्व ...
हे आपण ठरवायचं फक्त स्वप्न आणि सत्य ह्या सीमारेषेवर घुटमळत राहायचं का ...? ही तुझी अस्वस्थता तुला नवी दिशा दाखवणार आहे, घाबरू नको वादळ येतील पण त्यास समर्थपणे तू पेलशील, रुळलेल्या पायवाटेवरून अनेक जण जातात पण तुझी जी वाट आहे ती खाच खळग्यांची आहे पण ह्याच मार्गावर तुझा उदय आहे, आधीच उशीर झाला आहे, आता उशीर करू नकोस.."

मग मालतीबाई कडे वळून म्हणाले,

"बाई, तुम्ही देखील ज्ञानी आहात, मी जे सांगितले ते कळले असणारच, त्यांना त्यांच्या वाटेने जाऊ द्या, संसारात अडकवू नका"

त्या व रेवा दोघी चुपचाप घरी आल्या, त्या नंतरचे  पंधरा दिवस गेले आणि एक दिवस भल्या पहाटे रेवाने घर सोडल्याचे लक्षात आले तीच सगळं सामान जिथल्या तिथे होते फक्त एक चिठ्ठी टेबलवर फडफडत होती व त्यावर लिहले होते

"उत्तररंग....."

मालतीबाई सुन्न होवून पाहत होत्या व सुरेश जोरजोरात रेवाला हाक मारत हुडकत होता...

{माधवी देवळाणकर}


# आजी आपण दिवाळी का साजरी करतो गं...?

**ए आई.....आई....ऐक ना गं... मला माझा तो आकाशी रंगाचा झब्बा मिळत नाहीये. तू येना गं जरा इकडे.....कैवल्य, मी बेसनाचे लाडू वळतेय... तिथेच असेल बघ ना बाळा जरा नीट. कुठे आहे गं आई...?कैवल्य हा घे तुझा आवडता झब्बा. आजी तू....?आजी मला माहित होत तूच मला शोधून देशील म्हणून.... बरं चला बरं आता कैवल्य, रमा, शंतनु आपल्याला आता मस्त आईच्या हातचा फराळ खायचा आहे. आजी काका काय करतोय गं..? अरे शंतनु, काका आकाशदिवा व्यवस्थित लावतोय. ए..रमा... तुला माहित आहे का..? बाबांनी खूप मेहनत करुन आकाशदिवा बनवला आहे आणि बाबांना खूप आवडतं सगळ्या वस्तू हाताने बनवायला.हो. अगदी खरंय.. कैवल्यचे बाबा म्हणजे सुधीर हा लहानपणापासूनच कलेमध्ये हुशार आहे. बाळांनो, तुम्ही सुद्धा शिकायचंय बरं...या सगळ्या वस्तू हाताने तयार करायला. हो, आजी बाबा आम्हाला शिकवतात.ए..रमा चल, आपण आपल्या त्या किल्ल्यामध्ये पणत्या ठेवूयात. व्वा.!!काय सुंदर वास येतोय शालिनी अगदी घरभर वास पसरलाय हो.. काहीही म्हणं, पण तूझ्या हातचा फराळ हा खूप स्वादिष्ट असतो बरं का....हो आई, मी हे सगळं तुमच्याकडून तर शिकली आहे. आजी, आई आता आम्हाला फराळ हवाय..हो,हो देते आजी आम्हाला फराळ झाल्यावर तुला काहीतरी विचारायचं. हो आजी, मी रमा आणि कैवल्य आज आम्ही तुला सोडणारच नाही आहोत. बरं बरं.. विचारा नक्की विचारा.. शालिनी या मुलांना दे आधी फराळ...अय्या!! काकू चिरोटे किती सुंदर केलेत...मग रमा तुला खूप आवडतात ना.. म्हणून खास तुझ्यासाठी बनवलेत.चला, खूप खाल्ला बुवा फराळ रमा, शंतनु आपण जायचं का आता आजीकडे..? हो,हो जाऊयात. आजी,ए आजी.. आलीत का माझी सगळी बछडं...या..हम्म...बोला, काय विचारायचं होतं बरं मला...?आजी आपण दरवर्षी दिवाळी का साजरी करतो गं..? म्हणजे बघ ना, किती साऱ्या पणत्या, आकाशदिवा, किल्ला हे सगळं आपण दिवाळीत का करतो गं..?अरे बापरे!!माझी पिल्लं आता मोठी झाली की... फार चांगले चांगले प्रश्न पडतायत माझ्या पिल्लांना... हो आजी, आज आम्हाला तुला हे विचारायचं आहे.. बरं, आज मी तुम्हाला तुमच्या सगळ्या प्रश्नांची उत्तरे देणार आहे हो....!बरं, दिवाळी हा प्रमुख हिंदू सण आहे. आणि हा सण भारतात सर्वत्र साजरा होतो. पावसाळा संपून नवीन पिके हाती आल्यानंतर शरद ऋतूच्या ऐन मध्यभागी आश्विन व कार्तिक या महिन्याच्या संधिकालात हा सण येतो. अश्विन वद्य द्वादशी ते कार्तिक शुद्ध द्वितीया हे सहा दिवस या सणाचे असतात. हा सण साधारणपणे ऑक्टोबर-नोव्हेंबर दरम्यान येत असतो.बरं का बाळांनो,जेव्हा रामचंद्र सीतेसह चौदा वर्षांचा वनवास संपवून अयोध्येला परत आला तो याच**

दिवसात. प्राचीन काळी हा यक्षांचा सण मानला जायचा. अंधार दूर करून प्रकाश निर्माण करणारा दीप मांगल्याचे प्रतीक मानला जातो. त्याच्या प्रकाशाने आपल्या जीवनातील अंधःकार दूर व्हावा म्हणून हा दीपोत्सव साजरा केला जातो. या दिवसात संध्याकाळी दारात रांगोळ्या काढून पणत्या लावतात .घरांच्या दारात आकाशदिवे लावले जातात.महाराष्ट्रात व इतर ठिकाणी लहान मुले या काळात मातीचा किल्ला तयार करतात. त्यावर मातीची खेळणी मांडतात. धान्य पेरतात. हो हो आजी, आम्ही पण किल्ला बांधलाय आणि त्या किल्ल्याचे नाव ठेवले 'राजगड'...ए आजी...आपण सहा दिवसांमध्ये काय काय करतो गं..? मी सांगू, मी सांगू, सांग रमा.. तू सांग. आपण पहाटे लवकर उठतो. आंघोळ करतो. मग फटाके उडवतो.मस्त फराळ खातो. आणि मी तर आईला रांगोळीत रंग भरायला पण मदत करते.वा!! वा!! छान सांगितलं हो.. रमा. शंतनु, आपण सहा दिवस वसुबारस, धनत्रयोदशी, नरकचतुर्दशी, लक्ष्मीपूजन,बलिप्रतिपदा व भाऊबीज हे सहा दिवस आपण दिवाळी म्हणून साजरी करतो.ए आजी..वसुबारस म्हणजे काय गं..? वसू म्हणजे द्रव्य(धन). त्यासाठी असलेली बारस म्हणजे द्वादशी. या दिवसाला गोवत्स द्वादशी असेही म्हणतात. या दिवशी संध्याकाळी गाईची तिच्या पिल्लासह म्हणजेच पाडसासह पूजा करतात. ज्यांच्याकडे घरी गुरे,वासरे आहेत, त्यांच्याकडे ह्या दिवशी पुरणाचा स्वयंपाक करतात. त्या दिवसापासून अंगणात रांगोळी काढण्यास सुरुवात होते.बाप रे..!! किती काय काय करतात ना... हो, ना आपल्याकडे पण गाय असती तर आपणही अशीच पूजा केली असती... आणि आजी अभ्यंगस्नान का करतो गं..?? मला तर माझी आई पहाटे उठवते. किती हि थंडी वाजत असली तरी उटण्याने, तेलाने आंघोळ घालते. अरे शंतनु, त्या दिवसाला खूप महत्त्व आहे बाळा. नरक चतुर्दशी या दिवशी अभ्यंगस्नानाचे महत्त्व आहे.या दिवशी कृष्णाने नरकासुराच्या देहाचे दोन तुकडे करत त्याचा वध केला. नरकासुर वधाने देवादेविकांना तसेच प्रजेला आनंद झाला. कृष्णाच्या पराक्रमाचे स्मरण म्हणून आश्विन कृष्ण चतुर्दशीस नरक चतुर्दशी हा सण साजरा केला जातो. सकाळी लवकर उठून संपूर्ण शरीराला तेलाचे मर्दन करून सुवासिक उटणे लावून सूर्योदयापूर्वी केलेले स्नान म्हणजे अभ्यंगस्नान.या दिवशी पहाटे यमासाठी नरकात म्हणजे आधुनिक परिभाषेत घरातील आदल्या दिवशी घासून-पुसून स्वच्छ केलेल्या स्वच्छतागृहात पणती लावण्याची प्रथा आहे. याच दिवशी पहाटेपासून फटाके उडवायला सुरुवात होते. तिचा शेवट भाऊबीजेच्या रात्री होतो. हो ना, किती मजा येते फटाके उडवायला. आणि आजी आज आपल्याकडे लक्ष्मीची पूजा आहे. ती कशासाठी करतात बरं..?हो ना, तसंही आई रोज पूजा करतेच की.. मग आज का बरं.. अशी मोठी पूजा करतात.?? बाळांनो, प्राचीनकाळी या रात्री कुबेर पूजन करण्याची रीत होती. कुबेर हा देवांचा खजिनदार

**आणि धनसंपत्तीचा स्वामी मानला जातो. विविध ठिकाणी झालेला उत्खननात अनेक मूर्ती सापडल्या आहेत. त्यामध्ये कुबेर आणि लक्ष्मी एकत्र दर्शविले आहेत.बाळांनो, तुम्हाला माहीत आहे का..? की, या दिवशी लोक स्वच्छता करण्यासाठी लागणारी नवी केरसुणी विकत घेतात. तिलाच लक्ष्मी मानून तिच्यावर पाणी घालून हळद-कुंकू वाहून घरात वापरण्यास सुरूवात करतात. हो, आजी मी पाहिलंय ना.. आईला तशी पूजा करताना.. अगं आजी, पण ते बाबा आईला काहीतरी भेटवस्तू देतात ते कधी..? हो ना, तेव्हा तर आईचा वाढदिवस देखील नसतो.अरे कैवल्य, तो दिवस हा दिवाळी पाडवा म्हणून ओळखतात. कार्तिक शुद्ध प्रतिपदेस बलिप्रतिपदा पाडवा म्हणून हा सण साजरा केला जातो. या दिवशी बळीराजाचे रांगोळीने चित्र काढतात व त्याची पूजा करतात. आणि "इडा पिडा टळो बळीचे राज्य येवो" असे म्हणतात. साडेतीन मुहूर्तातील एक मुहुर्त म्हणून या दिवसाला विशेष महत्त्व आहे.आणि याच दिवशी घरोघरी सायंकाळी पाटाभोवती रांगोळी काढून पत्नी पतीला औक्षण करते. व पती पत्नीला ओवाळणी घालतो. काय मगं समजतंय ना...? बाबा आईला ओवाळणी का देतात ते..?आजी तू खूप छान सांगतेयस गं... आणि भाऊबीजेला तर प्रत्येक बहीण आपल्या भावाला ओवाळते. अगदी बरोबर सांगितलंस हा शंतनु.हो ना, आणि या दिवशी आपण छान गोडाधोडाचे जेवण सुद्धा बनवतो. पण आजी, आईकडून असं ऐकलं होतं की या दिवसाला 'यमद्वितीया' असं पण म्हणतात. हो, आईने अगदी बरोबर सांगितलं कैवल्य तुला. बरं, या दिवशी यम आपली बहीण यमि हिच्या घरी जेवायला गेला होता. म्हणून या दिवसाला 'यमद्वितीया' असे नाव मिळाले असे मानले जाते.आजी, किती सुंदर माहिती सांगितलीस गं तू आम्हाला.. अरे बाळांनो, आपण आपले सणवार का साजरे करतो हे आपल्याला माहीत असलंच पाहिजे. आणि आज तुम्ही मला खूप छान छान प्रश्न विचारलेत बरं का.. अशीच माहिती नेहमीच विचारायची आणि ती लक्षात सुद्धा ठेवायची बरं का.हो आजी, आम्ही ही सगळी माहिती कायम लक्षात ठेवू.. बरं, आता मी तुम्हाला खाऊ देणार आहे. खाऊ.....? मला माहितीये की तुम्हा तिघांना ओल्या नारळाच्या करंज्या आवडतात म्हणून... आजी तू खूप गोड आहेस.. लवकर दे, लवकर दे, अरे हो हो... देते देते. आजी करंज्या खाऊन झाल्यावर आम्ही फटाके सुद्धा उडवणार आहोत.**

**काय मग मुलांनो कशी वाटली गोष्ट मला नक्की कळवा.......**



{रेश्मा अंकोलीकर – ढवणे,९४२१४७३५७५}

# वाटेकरी

रात्रीची वेळ . अंधार . एक मोठा रस्ता .त्या रस्त्याला रात्रीच्या वेळी कोणी नसायचंच. त्यात पाऊस. शहराचा तो भाग रिकामा होता . तिथे ना दुकानं होती ना घरं . कारण तो कँटोन्मेंट हद्दीचा भाग होता . दिवसा मन प्रसन्न करणारी तिथली झाडं आत्ता मात्र भुतांची आश्रयस्थानं वाटत होती . मधूनच एखादी सर्र्कन पाणी उडवत जाणारी गाडी . त्या गाड्यांनाही कसली घाई ! एखादा मरून पडला तरी कोण बघतंय आणि कोण थांबतंय .

वरून धोधो पाऊस अन खाली रस्त्यांचे झालेले नाले . रस्त्यावरून वाट काढत, मोठयाने खळखळत खोलगट भागाकडे पळणारं पाणी . घोट्यापर्यंत आलेलं . पूर्ण रस्ताच पाण्यात . एखाद्याची गाडी पाणी जाऊन बंद पडली तर सरळ सरळ बोंबच ! तशा वेळेस , पाण्यातून , पावसात गाडी ढकलायची म्हणजे ? ... अशा ढगफुटी पावसात तो त्याच्या बाईकवरून चालला होता . त्याच्या अंगात पूर्ण रेनसूट होता. डोक्यावर हेल्मेट. आकाशात कडाकड विजा चमकत होत्या . अगदी काळजात धडकी भरवणाऱ्या. बाईक भारी होती,उंच होती. तिचा सायलेन्सरही उंच होता. त्यामुळे त्याला त्या साठलेल्या पाण्याची भीती नव्हती . खतरनाक पळणारी बाईक आणि पळवणाराही तसाच खतरनाक ! किश त्याचं नाव . यशाचे नवनवीन झेंडे रोवित तो पुढे चालला होता... पण गुन्हेगारीत !

-----

थोडाफार शिकलेला होता अन बोलायला स्मार्ट होता . शरीराने तो दणकट होता . अंगात रग होती . छोट्या मोठ्या मारामाऱ्या करता करता तो हळूच गुन्हेगारीकडे वळला होता . तो एक कमालीचा रायडर होता . कुठलीही चांगली बाईक एकदा का त्याच्या हातात आली की

झालंच , तो वाऱ्याशी स्पर्धा करत सुटायचा . अन नुसती बाईकच नाही तर कुठलीही. अगदी कुठलीही गाडी तो खलास चालवायचा . खेळाडू बनता तर नाव काढता . पण त्याला चांगल्या गोष्टींसाठी त्याचं कौशल्य वाया घालवायचं नव्हतं .

त्यामुळे पहिल्यांदा तो बायकांच्या गळ्यातल्या साखळ्या चोरायला लागला . वयस्कर बायकांच्या. एकवेळ पोरी मंगळसूत्र घालणार नाहीत ; पण वयस्कर बायकांचं तसं नसतं . समोरासमोर नवऱ्याला झापतील पण त्याच्या नावाने घातलेलं मंगळसूत्र गळ्यात घालून कुरवाळतील ! अशा बायकांच्या सोनसाखळ्या चोरून गाडीवरून पळणं त्याला फारच सोपं होतं . मग पुढे तर तो सराईत झाला . पुढे तो कुठल्याही बायकांच्या गळ्यातल्या साखळ्या चोरायला लागला . पण तो एकदाही पोलिसांच्या तावडीत सापडला नव्हता . मग त्याचा रुबाब वाढला.त्याचं डेरिंग वाढलं . आपण भारी आहोत , हे दाखवण्यासाठी तो काहीही करायला तयार असायचा . कुठलंही आव्हान स्वीकारायला तो तयार असायचा .

हातात पैसा खेळू लागला आणि त्याचे षौकपाणी वाढले . कशातही तो मागे नव्हता . कमी वयातच त्याची सारी व्यसनं करून झाली होती . एका डामच्याने त्याला हेरलं. त्याचे गुण, त्याचं गाडी चालवण्याचं कौशल्य पारखलं . आणि त्याला गुन्हेगारीच्या दलदलीच्या वाटेला लावलं. ज्यामध्ये माणूस रुतत जातो , पण बाहेर कधीच पडू शकत नाही , अशी दलदल !

-----

त्या तशा साठलेल्या पाण्यातही तो वेगात चालला होता . मागून-पुढून एक गाडी नव्हती की नजरेत एक माणूस नव्हता . सगळं कसं चिडीचूप . एक पावसाचा

ताशा सोडता . तरीही त्याने मागे वळून पाहिलं - एखादी गाडी मागून येतेय का ते . खरं म्हणजे पाठलाग वगैरे करतीये का ते पहायला . काहीतरी गडबड असली की माणूस उगाच सावध राहायला लागतो .

त्याच्या पाठीवरच्या लाल सॅकमध्ये पैशाची बंडलं होती. घबाड !

नुकतीच त्याने ती गलेलठ्ठ सॅक उचलली होती . एका ठरलेल्या ठिकाणाहून . आणि त्याच्या मनात विचार चाललेले - या पैशाचे तर आपण दोघेच वाटेकरी आहोत . निम्मा पैसा आपला आहे . पहिल्यांदाच एवढा मोठा हात मारलाय आपण . काय करायचं या पैशाचं ? कुठं उधळायचा ? कायकाय घ्यायचं ? की भारताबाहेर एक गुलाबी ट्रिप मारायची ? का धंद्याला काही नवीन मार्ग ? राजा तर साला, घर घेऊन सेटल व्हायचं म्हणत होता. पण एक आहे - हा **XXX** चा राजा, साला ! ... काही खबर लागू देत नाही . तो त्याच्याबद्दल आपल्याला नीट काहीच कळू देत नाही . कामाशी काम ठेवतो . आपण त्याच्यावर पूर्ण भरंवसा ठेवतो . पण त्याचं तसं नाही . हा झटका एकदा पूर्ण झाला की साल्याची साथ सोडायला पाहिजे . आपलं आपण बघू नाहीतर दुसरा एखादा जोडीदार बघू .

-----

तो जो डामचा होता , त्याचं नाव राजा होतं . ज्याच्याकडे पाहून फार काही चांगलं मत होणार नाही अशा शरीराचा, एकूण अवताराचा ,अन चेहऱ्याचा . त्यानेच किशला वेगळे रस्ते दाखवले होते .

शहरात एक बिल्डर होता . उत्तुंग डेव्हलपर्स म्हणून . त्याची कामं कमी होती . पण इतर कामंच जास्त होती . तो इतर बिल्डर्सची काळी माया जिरवायचं काम करायचा . आणि त्यात स्वतःची पोळी भाजून घ्यायचा. केस पांढरे झाले तरी त्याची पैशाची हाव काही संपत नव्हती . त्याला एकच पोरगी होती आणि तिचा एक छोटा मुलगा . पोरगी घटस्फोटित . त्याचा नातू , तो गोड पोरगा त्याचा जीव की प्राण होता .

किशने अन राजाने मिळून त्या पोराला किडनॅप केलं होतं. त्याच्या शाळेजवळून . त्याला घेणारी कार घरून यायच्या आधी त्याला अलगद उचललं होतं . कोणाच्या लक्षात यायच्या आत . लक्षात आलं तेव्हा खूप उशीर झाला होता . किश कार चालवत होता . मागे तो पोरगा अन त्याचं तोंड दाबून बसलेला दणकट पंजाचा राजा . पोरगं गोरंपान . निष्पाप . गोड . सात -आठ वर्षांचं.

किशने गाडी बुंगाट काढली होती . झपाझप ! अगदी शहराच्या गर्दीमधूनसुद्धा. राजाने कुठून कार पैदा केली होती , कोणास ठाऊक ? जुनाट होती . पण पळायला भारी होती . लवकरच ते शहराच्या दुसऱ्या भागात पोचले होते. एक जुनाट बंगल्याला त्यांनी त्यांचा अड्डा बनवला होता . ती बंगल्यांची गल्ली अंगावर शांतता पांघरून नेहमीच गप पडलेली असायची . झाडांमध्ये लपलेली . क्वचित एखादा माणूस दिसायचा .

त्यांनी त्या पोराला तिथे बंदी बनवून ठेवलं . राजाने त्या पोराचा जीवच घ्यायचं ठरवलं होतं ; पण किशने त्याला तीव्र विरोध दर्शवला होता . राजाला ते आवडलं नव्हतं . कारण पोरगा अगदीच लहान नव्हता . त्याला बऱ्यापैकी कळत होत . पण प्लॅन त्याचा असला तरी तो पूर्णपणे किशवर अवलंबून होता .

मग त्यांनी दुसऱ्याच एका लोकेशनला जाऊन त्या म्हाताऱ्या बिल्डरला फोन केला होता आणि सिमकार्ड फेकून दिलं होतं . बिल्डर हवालदिल झाला . त्याचं काळीज विरू लागलं. त्यामुळे पुन्हा जेव्हा फोन आला , त्याने गपगुमान पैसे द्यायचं कबूल केलं .

पैसे कुठे ठेवायचे आहेत, ते त्याला सांगण्यात आलं होतं. तोही शहराचाच एक निर्मनुष्य भाग होता.

राजा म्हणाला होता - कुठलीही चलाखी , कुठलाही शहाणपणा करायचा नाय . पोलिसांना वगैरे सांगायचं नाय . कारण थोडी जरी गडबड झाली तरी

आम्ही पकडले जाऊ ; पण नातू जिवंत हातात मिळणार नाय . आमची गँग आहे आणि आमच्या माणसांचं तुमच्या प्रत्येक हालचालीवर लक्ष आहे.

गँग - बिंग ! ... राजाने सरळ फेक टाकली होती . बोलायला तो स्मार्ट होता . बिल्डरला नातू महत्त्वाचा होता . त्याच्यासाठी पैसा तो काय ? अजून एका व्यवहारातच त्याने तो वसूल केला असता .

" एक कोटी ! एक कोटी मागितले आहेत **XXX**नी ! "अशा शिव्या घालत त्याने सांगितल्याप्रमाणे एक सॅक तयार केली . लाल रंगाची . त्यात दोन हजाराच्या लाल नोटांची पन्नास बंडलं . हिशोब संपला .

-----

त्या रस्त्याला वर्दळ नव्हती . एके ठिकाणी राडारोडा पडलेला होता . तिथेच कोणीतरी कचऱ्याचा डंपर उलटा केला होता. तिथे बिल्डरच्या माणसाने ती एक लाल रंगाची सॅक ठेवली . तेव्हा पूर्ण अंधार पडला होता . सात वाजले होते . पाऊस भरून आल्याने आकाश काळवंडायला लागलेलं ; पण अंधारामुळे ते कळून येत नव्हतं .

तो माणूस तिथे थांबला नाही . तसं सांगण्यातच आलं होतं . बऱ्याच वेळ रस्त्याला कोणीच नव्हतं . त्यानंतर रस्त्याच्या कडेला असलेल्या झुडपांमधून तिथे एक भिकारी आला . खाण्यासाठी तो कचरा चिवडू लागला . खरं तर त्या कचऱ्यात खाण्यासाठी काहीच नव्हतं . त्याला ती लाल रंगाची सॅक मिळाली . कुतूहलाने त्याने ती हातात घेतली अन ती सॅक तो खालीवर करून पाहू लागला . तेवढ्यात एक बाईकस्वार आला अन त्याने शिताफीने ती सॅक त्याच्या हातातून पळवली . त्याने घातलेल्या मोठ्या हेल्मेटने आणि रेनसूटने तो कसा दिसतोय याचा काहीच अंदाज येत नव्हता . एका हाताने तो गाडी पळवू लागला . मग त्याने हॅन्डलवरचे दोन्ही हात सोडून ती सॅक हेल्मेट असतानाही पाठीवर टाकली . जराही न डगमगता , दोन्ही बंदांमधून हात

घालून . गाडी अगदी सरळ रेषेतच चालली होती . त्याने एकदा मागे पाहिलं , मागे कोणी नव्हतं . मग त्याने हँड्लची मूठ आवळली अन तो फुल्ल स्पीडने सुटलाच .

आजूबाजूलाही कोणी नव्हतं . आधीही अन आत्ताही . तसा तो भिकारी समाधानाने हसला . तो राजा होता . अन तो त्या वेशात अगदी शोभत होता . तो रस्त्याच्या बाजूला असलेल्या रिकाम्या भागात शिरला . त्याने डोक्यावरचं कांबळं फेकलं . अंगावरचा घाणेरडा , मळका कोट फेकला . तो भाग मातीचा होता . खुरटी झुडपं , बाभळीची छोटी , मोठी झाडं आणि काही मोठीही झाडं . त्यामधून तो चालत पलीकडच्या समांतर रस्त्यावर गेला . तेव्हा पावसाला सुरुवात झाली होती .

राजा त्याच्या कारमध्ये बसला . मागच्या सीटवर एका पोत्यात तो पोरगा बांधून पडलेला होता . बिचारा ! कोणीही घाबरेल अशी ती गोष्ट . मग ते तर लहानच लेकरू. राजा त्याला ठराविक ठिकाणी सोडणार होता. तसा निरोप त्या म्हाताऱ्या बिल्डरला देणार होता . विषय संपला . त्याच्या भाषेत फाईल रफादफा !

किश आता त्या ठिकाणापासून खूप लांब पोचला होता . त्याच्या मागे कोणी नव्हतं . तसा त्याच्या मनावरचा ताण गेला . अर्थात , कुठल्याही प्रसंगाला तोंड द्यायला तो तयार होताच अन त्याची गाडी पळायला .

राजा पुढच्या एका साध्या ढाब्यावर त्याची वाट पाहत थांबणार होता . अजून बरंच अंतर होतं .

पाठलागावर कोणी नव्हतं . रस्त्यावर कोणी नव्हतं . किश त्यामुळे मस्त गुणगुणत चालला होता , “ क्यूँ पैसा पैसा करती है ? “ किश त्या भर पावसातही एन्जॉय करत होता . अन त्याचं लक्ष एका बसस्टॉपकडे गेलं . स्टॉपवर एक तरुणी उभी होती . पांढऱ्या रंगाचा ड्रेस घातलेली. स्टॉपच्या

अलीकडे एक टू-व्हीलर लावलेली . पोरगी बघून त्याचा गाडीचा वेग आपसूक कमी झाला .

तो क्षणभर विचारात पडला आणि शेवटी थांबलाच . त्याचं स्त्रीदाक्षिण्य उगा उफाळून आलं . बिनकामाचं !

रात्रीची वेळ . त्यात पाऊस , निर्मनुष्य रस्ता अन पोरगी ! ... एकटी ? दिसायला सुंदर आहे का ते कळत नव्हतं . कारण स्टॉपवर थांबल्याने तिच्या चेहऱ्यावर नेमका अंधार पडला होता .

मागे झाडंही खूप होती . पावसाचे थेंब ओघळवणारी .

तो गाडी लावून चालत तिच्या जवळ आला . शेडमध्ये आल्यावर त्याने हेल्मेट काढलं . त्याच्या रेनसूटवरून आणि हेल्मेटवरून पाणी गळत होतं .

जाताजाता पोरगी गळाला लागली तर बरंच आहे, अशा विचारात तो होता .

त्याला वाटलं - रात्रीची वेळ , त्यात पाऊस , ती एकटीच अन गाडी बंद पडलेली . हिचा टाईम खराब आहे . नक्कीच !

हेल्मेटवरचं पाणी झटकत त्याने विचारलं , " एनी हेल्प ? "

" न ... नाही ... नको ! " ती सुंदर तरुणी त्याच्याकडे पाहत, त्याचं निरीक्षण करत म्हणाली . तो ऑफ़िसवरून घरी चाललेला एखादा बॅचलर तरुण असावा . असं वाटत होतं . त्याच्या पाठीवर एक सॅकही होती .

"अहो , काही प्रॉब्लेम आहे का ? रात्रीची वेळ, त्यात पाऊस , तुम्ही एकट्या ! " तो काळजीच्या स्वरात म्हणाला .

" हं ! गाडी बंद पडलीये ." ती म्हणाली .

" मग तुम्ही फोन करून कोणाला बोलवून का घेत नाही ? " त्याने विचारलं .

"माझा फोनही पाण्यात पडल्याने बंद पडलाय ," ती म्हणाली .

त्याने चमकून तिच्याकडे पाहिलं . हिचा टाईम नक्कीच खराब आहे . त्याला पुन्हा वाटलं. फोनही बंद आहे .

“ओह ! काय करावं ? एक काम करतो, मी तुम्हाला लिफ्ट देतो . गाडी तुम्ही उद्या सकाळी ताब्यात घ्या .”

ती रस्त्याकडे बघत , अंग चोरत “ राहू दे “ म्हणाली.

“बरं, ठीक आहे. मी तुमच्यासोबत थांबतो ,बस येईपर्यंत .”

“नको नको .आता या वेळेला बस कधी येईल सांगता येत नाही ... जा तुम्ही .”

आता त्याने तिचं नीट निरीक्षण केलं . ती खरंच खूप सुंदर होती . नाजुकशी . तिचे ओठ अन भुवया किंचित जाडसर होत्या . पण त्यामुळेच तिचा चेहरा आणखी गोड भासत होता . तिला गार लागत असावं . हात पोटाशी धरून , अंग आवळून ती उभी होती .

अशा पावसात . तिच्याकडे पावसाळी काहीच नव्हतं . रेनकोट वगैरे . त्यामुळे ती भिजली होती . तिचे केस भिजले होते . तिचं मूळचं सौंदर्य आणखी खुलून दिसत होतं . त्यात तिचा ड्रेस भिजलेला , अंगाला चिकटलेला ... पांढरा ड्रेस . तिचं सौंदर्य आव्हानात्मक बनवणारा !

त्याला त्या पोरीचं काही गणितच कळेना . त्याला उगा शंका आली की ती पोरगी - तसली तर नाही ? पण तिचे कपडे , खांद्यावरची मॅचिंग पांढरीच पर्स पाहता ती एकदम डिसेंट मुलगी वाटत होती .चांगल्या घरातली . मग या वेळी इथे ? का उगा नाटक करतीये , सोज्वळ असण्याचं ?

त्याच्या विचारांनी वेगळं वळण घेतलं .

त्याने तिचं निरीक्षण केलं . पोरगी दिसायला तर छान होती आणि सरळही वाटत होती ... क्वचित चांगल्या घरातल्या पोरीही ... पैशासाठी ... पाऊस तसा अचानक आलेला . ती बाहेर पडली असावी अन पावसात अडकली असावी .

आकाशात ढगांची गडगड होती अन त्याच्या मनात विचारांची खळबळ ! तो त्याचं कामही विसरला . त्याचे विचार तारुण्याच्या जोशात त्याच्या गाडीसारखे वेगात पळू लागले . वेगळ्याच दिशेने ...

त्याला वाटलं , "साली ! जबरा आहे . भर पावसातही आग लावेलशी !" तो तिच्याजवळ सरकला . त्याचा हेतू लक्षात येऊन ती लांब सरकली . त्याने तिचा हात धरला . तशी क्षणभर तिच्या चेहऱ्यावर भीती उमटली.

" प्लिज , सोडा मला , " ती म्हणाली .

कदाचित पोरगी चांगलीही असावी . पण आता - ती पोरगी अशी आहे का तशी ? या गोष्टीशी त्याला काहीएक घेणंदेणं नव्हतं . त्याला आयतीच शिकार गवसली होती. आज एवढा मोठा डल्ला मारला होता, तो सेलिब्रेट व्हायलाच हवा होता ! बस ! ...

तो त्याला जे वाटलं ते तिला थेट विचारण्याच्या बेतात असताना , एका कारचे दिवे पावसाच्या धारांना चमकवताना दिसले . तिच्याही डोळ्यांत चमक आली . ती काळी कार त्यांच्याजवळ येऊन थांबली. तिची काच खाली झाली .

आत राजा होता , तो म्हणाला , " किश !... "

राजा अन गाडी पाहून पाहून किश हसला . समाधानाने . आता पुढचा प्रवास कारमध्ये होता . मागच्या सीटवर बसून , त्या पोरीला कुशीत घेऊन . बाईक चोरीची होती . ती तिथेच सोडायची होती . जरा रस्ता सोडून, आत कुठेतरी . आंधळा मागतो एक डोळा अन देव देतो दोन! तसं झालं होतं. मजा येणार होती. आधी नुसता पैसाच होता अन आता पोरगीही ! ...

त्या आनंदात , राजा ढाब्याच्या आधीच आपल्याला येऊन कसा चिकटला ? हे त्याच्या लक्षात आलं नव्हतं .

किशने एकदा राजाकडे पाहिलं अन तो त्या पोरीकडे आसुसलेल्या नजरेने पाहू लागला . तो तिच्याकडे पहात असतानाच, त्याला कळण्याआधीच

सायलेन्सर लावलेल्या राजाच्या पिस्तुलातून निघालेल्या गोळीने त्याचा वेध घेतला होता. तो रस्त्यावर कोसळला . त्याच्या नजरेत अविश्वास होता . त्याचा रेनसूट रक्ताने लाल झाला . मग अजून एक गोळी . थेट काळजातच . हळूहळू लालभडक रक्त वेगाने पाण्यात मिसळू लागलं .

भर पावसातही किशच्या छातीत आग लागली होती ! अन ती त्या पोरीने लावली नव्हती ... त्याच्याच मित्राने लावलेली. क्षणात ती आग पूर्ण विझली . कायमची !

राजाच्या चेहऱ्यावर स्मित पसरलं . किशची फाईल रफादफा झाली होती .

पावसाच्या धारा कारच्या टपावर टपटप वाजत होत्या .

ती तरुणी कारजवळ आली .

राजा म्हणाला , " काजल , त्याच्याजवळची सॅक घे अन चल लवकर ."

तिने किशजवळची सॅक घेतली . राजा समाधानाने हसला . कारण त्याचा प्लॅन यशस्वी झाला होता . आता तो खरंच राजा झाला होता . पैसा अन जोडीला काजल !

किशला उडवायचं हे त्याने आधीच ठरवलेलं होतं . त्याला या पैशात वाटेकरी नको होता म्हणून .

काजलने तिथे थांबायचं हे राजाने आधीच ठरवलेलं . लक्ष ठेवायला , वाटेत पिकअप करायला . तिला किश माहिती होता ,पण किशला मात्र ती माहिती नव्हती . ते राजाचं गुपित होतं . किशला मृत्यू गाठणारच होता. काजलजवळ, नाहीतर पुढे कुठेतरी . ते नक्कीच होतं !

तिने सॅक घेतली . चेन उघडून हात आत घातला . त्यातल्या प्लॅस्टिक बॅगमध्ये ठेवलेल्या नोटांच्या बंडलांवरून तिने हात फिरवला . तो गार पडलेला पैसाही तिला उबदारच वाटला .

त्यावरून हात फिरवताना तिच्या बोटांना किशचं पिस्तूल लागलं .
क्षणात तिने किशचं पिस्तूल बाहेर काढलं आणि राजाला गोळ्या घातल्या .
शांतपणे , शांततेत . त्याच्याही नजरेत अविश्वास होता .त्याही पिस्तुलाला सायलेन्सर लावलेलं होतं. फक्त फट फट असा आवाज काय तो आला . किशला गोळ्या घालताना जसा आवाज आला तसाच. तो आवाज पावसाच्या पाण्यात कुठे विरून गेला .

त्याचीही फाईल ... !

बिचारा किश ! त्याला त्या XXXX राजाची साथ सोडायची होती खरी ; पण आता तो नरकातही त्याला सोबतीला होताच !

पावसाच्या धारा कारच्या टपावर टपटप वाजतच होत्या .

तिला राजा कधीच आवडलेला नव्हता . तो माणसात जमा नव्हता . कुठल्याच बाबतीत. तो साला जनावरासारखा तुटून पडायचा. अन आत्ताही तो मेला नसता तर थोड्या वेळाने त्याचं जनावरात रूपांतर झालंच असतं ! राजाला उडवायचं हे तिनेही आधीच ठरवलेलं होतं . असं नाही तर तसं ! तिने मोबाईल ऑन केला आणि कोणालातरी फोन लावला .

फोन ठेवल्यावर तिने तिची टू व्हीलर सुरु केली . ती एका झटक्यात चालू झाली . आणि ती भर पावसात निघाली . तशीच . भिजत .

पाऊस बिचारा. निर्विकार. मुकाट पडत राहिला अन पडतच राहिला . त्या मुकाट पडलेल्या दोन प्रेतांवर .

तिलाही आता धंद्याचा कंटाळाच आला होता .

तिलाही त्या पैशात, कोणीच वाटेकरी नको होता !

{बिपीन सान्गळे}

# सखी मंद झाल्या तारका

**"सखी मंद झाल्या तारका... आता तरी येशिल का..येशिल का?".**

**पहाटे पाच वाजता मी बाहेरच्या झोपळ्यावर बसून गात होतो. "येशिऽऽऽल का? येशिऽऽल का?" राहून राहून सूर इथेच अडकत होते..खालच्या सूरांत मनाला समजाऊन पाहिलं.. वरच्या सूरांत दरडावणंही झालं पण नाहीच दोनच शब्द पण त्यातली आर्तता असंख्य, अथांग, अगणित, अमर्याद, अस्वस्थ, असह्य..**
**पुढे गावसं वाटतं होतं पण मन थांबलेलं...तिथेच.. अजुनही "ती" वाट पाहतं..डोळ्यांतल्या बाहुल्यांत नकळत व्याकुळता काठोकाठ भरलेली. इतकी की, ह्या व्याकूळतेत एक अख्खा समुद्र बुडाला असता..ह्या व्याकूळतेच्या व्याप्तीचा अंदाज लावणं फार फार कठिण.. कदाचित माझ्या मनापेक्षा किंबहुना माझ्या अस्तित्वा- पेक्षाही ही व्याकूळता खुप खुप मोठी होती आणि हिला डावलून पुढे जाणं म्हणजे अशक्यच.**

**का? कोण जाणे? पण आज सहज म्हणून हे गाणं आठवावं.**
**सूरप्रवाहात न्हाऊन निघण्याच्याआधीच काहीतरी बोचावं आणि "ती" जाणीव ती सय नकळत मनात शतःपटीने दाटून यावी आणि कुठेतरी दडवलेलं ते क्रूर, निदर्यी, हलकट, कपटी, निगरगट्ट प्रेम पुन्हा उफाळून वर यावं आणि त्या थोड्या जाणत्या थोड्या अजाणत्या भावनेतून श्वास कोंडावा...ह्रद्य कोलमंडून जावं इतपत आपण अडकावं आणि सुटकेचा प्रयत्न करताना आणखीनच गुरफटावं अगदी नामंजूर असलं तरीही आणि स्वतःला हरवून समर्पित व्हावं.. समर्पित होण्याशिवाय पर्यायच उरत नाही मग..सगळीच समर्पण काही उचित नसतात आणि अनुचितही नसतात किंवा समर्पणाला आपण उचित आणि अनुचिताचं मापदंड लावूच शकत नाही..ते मितीप्रमाणेच असतं..असं म्हणतात चौथी मिती म्हणजे वेळ..वेळेच्या पलीकडे जाऊ शकतं नाही आणि अलीकडच्या वेळेत अडकलो तर चालू वेळेत जगू शकतं नाही..स्थूल देहाला काळ,**

स्थान, वेळेच बंधन असतं पण मनाला नाही..मन मस्तमौलाप्रमाणे रमेल तिथे भरकटतं असतं आणि आज तर मनाला भरकटायला आयती संधीच मिळाली होती.

"ती"ला पहिल्यांदा पाहिलेलं..तेव्हाच ह्या ह्रद्याच्या तार्या झंकारल्या होत्या. संगीत शिकवणीतल्या त्या हाॅलमध्ये भल्या पहाटे "ही" एकटीच पाय दुमडून बसलेली..मोकळे सोडलेले केसं, हातात विणा आणि विणेच्या तारांवर सरकणारी लांबसडकं बोटं..डोळे मिटलेले..चेहर्यावर गाण्यातले भाव पुरेपूर उतरलेले..अगदी मुग्ध होऊन "ती" गात होती..

"मलमली तारूण्यऽऽ माझे..तु पहाटे पांघरावे..
मोकव्ळ्या केसांत माझ्याऽऽ..तु जीवाला गुंतवावे.."

तिच्या सूरांतली "ती" आर्जवं मनोमन मी झेलली होती आणि तिच्या केसांतच काय? तर अख्खा मूर्तिमंत तिच्यात मी गुंतलो होतो..मी ही आता डोळे मिटून तिचे सूर कानात साठवतं होतो.. अहाहा! काय आवाज..आवाजात साखरेची माधुरी. अचूक सूर लागलेले आणि मनोमन मीही त्या सूरांत, तिच्यात आकंठ बुडालेलो. तिचं गाणं संपल तरीही मी स्तब्धच..हलकेच डोळे उघडले..ती माझ्याकडेच पाहत होती. थोडसं संकोचल्यासारखं झालं..धीर एकवटून म्हणालो -

"माफ करा असं चोरून ऐकायचं नव्हतं पण इथे आलो आणि तुमच्या सूरांनी मंत्रमुग्ध झालो.. छान गाता तुम्ही."

"हरकत नाही.. आपणही शिष्य आहात का?" - विणा व्यवस्थित ठेवत तिने प्रश्न केला.

"हो.. रोज पहाटे गुरूजी यायच्याआधी येतो. आदल्या दिवशीचा थोडा सराव करतो मग गुरूजी आले की, नवीन शिकायला बरं पडतं" मी सावरत सांगितलं.

"अच्छा! तुमचंही गाणं होऊ द्या मग.. ऐकू द्या मलाही तुमचे सूर"
गोड आवाजात तिने विनंती केली.

खरंतरं मित्रमंडळीत किंवा एखाद्या जमलेल्या मैफलित खुप फर्माईशी यायच्या पण ही फर्माईश निव्वळ खासचं आणि ती नाकारणं केवळ अशक्यच. मी होकारार्थी मान हलवत विणाच्या तारा लावल्या. सरस्वती आणि विणेला वंदन करत मनातल्या मनात थोडीशी तयारी करत सूर लावला..

"गुंतता ह्रद्य हे कमलदलाच्या पाशी,
 हा प्रणयगंध परीमळे तुझ्या अंगाशी"

गाणं संपल्यावर तिने दोन तिनदा वाहवा करत मनापासून दाद दिली. आयुष्यात कित्येक कौतुके झेलली, कित्येक स्तुतीसुमने माझ्यावर उधळली गेली आणि काही ऐकणार्यांनी तर अगदी खिशातून पैसे देऊन वेगळी दादही दिली पण ह्या दादेला ते मोल नाही कारण ही दाद अनमोल आहे निदान माझ्यासाठी तरी आणि सदैव अनमोलच राहील.

.............................................................................................

त्या दिवसापासून आम्ही रोजच भेटत असू. आता सारखे योग जुळून येत नसतात म्हणून  तर मी योग जुळवून आणत होतो. वेळेची सांगड घालत तिला पाहत होतो, भेटत होतो.
तिच्या सूरांत, तिच्यात नक्कीच काहीतरी जादू होती आणि मी तिच्यात वाहवत जात होतो. त्या दिवशी सहज म्हणून तिने गायलेलं -

"काय बाई सांगू? कसं ग सांगू..." हे गाणं ऐकल्यानंतर ती ही माझ्यात वाहवत जात होती हे माझ्या मनाला कळलं होतं. किती सूचकपणे तिने प्रेमात पडल्याची ग्वाही दिली होती तेव्हा आणि मी मात्र मठ्ठ तो मठ्ठच राहीलो. मनात असूनही भावना जाणूनही न स्विकारता तटस्थ राहीलो. अनामिक भीती वाटत होती. केवळ तिच्या गाण्याला हसून दाद देऊन मी

तेव्हा निरोप घेतला होता. खरंतरं ती पहाट माझ्या आयुष्यातली सर्वात सुंदर पहाट होती. स्वप्नपंखाना वर हवेत लहरण्यासाठी वारा योग्य दिशेने मिळत होता, शब्दांना सूर जुळत होते, फुलांतला प्रेमगंध चहूकडे पसरू पाहत होता आणि माझ्या मनात साठलेलं ते प्रेम फक्त एकतर्फी नव्हतचं. तिचंही तितकंचं प्रेम बसलं होतं. त्याच्या दुसर्या दिवशी आगाऊपणा करत मी ही -

"येशिल येशिल राणी पहाटे पहाटे येशिल,
तुझिया माझिया प्रेमाची पावती, साखरचुंबन देशिल?"

हे गाणं सूचकपणे गायलं होतं. गात असताना तिच्या गालांवर आलेली लाजेची हलकी लाली खुप काही सांगून गेली आणि तिथेच त्याक्षणी आमच्या प्रेमाची मूकसंमती आम्ही एकमेकांना दिली आणि एकमेकांना स्विकारलंदेखिल. सरावाने आणि तिच्या सोबतीने गळा विविध सूरांनी बहरत होता आणि बहरलेल्या तिच्या माझ्या गळ्यातले सूर आणखीनच सदाबहार होत होते. कधी चोरून तर कधी बिनधास्त आम्ही एकमेकांना भेटत होतो. नव्या प्रेमाची ती धुंदी आणि नव्या नात्याचा गंध आमच्या अंतरंगाला सुवासिक करत होता. नवे करकरीत प्रेम आमचे दिवसागणिक वाढत होते. भेटीतून आणि स्पर्शातून कित्येक शहारे तेव्हा मी झेलले होते. संसाराचे कित्येक सुखद स्वप्ने उघड्या डोळ्यांनी आम्ही पाहीली होती आणि त्या स्वप्नहिदोळ्यांवर एकमेकांना घट्ट धरत कित्येक हेलकावे हिंदकळत आम्ही खाल्ले होते.

एकेदिवशी भेटायच्या वेळी त्या नेहमीच्या जागी "ती" आलीच नाही. सहा तास तिथेच बसून तिची वाट पाहीली. तिच्या काळजीने, हुरहुरीने डोळे पाणावले होते तेव्हा आणि तेव्हा उमगलं तिच्याशिवाय जिणं म्हणजे केवळ तडफडणं आणि चरफडणं. त्या दिवसापासून अजुनही मी चरफडतोय. ती अचानक आली नि गेलीसुद्धा. कुठुनतरी मंद सुवास यावा आणि त्या सुवासाने धुंद होत असताना तो सुवास हळूहळू विरत नामशेष व्हावा अगदी तसचं "ती" माझ्या आयुष्यात आली. प्रितीच्या दोन कळ्या

उमलण्याआधीच "ती" गेली. कुठून आलेली, कुठे गेली काहीच माहीत नाही.

त्यानंतर तीन वर्षानंतर असेच एकदा कोल्हापूरला मैफलीसाठी गेलो होतो. व्यासपीठावर स्वतःला सावरत रसिकप्रेक्षकांना अभिवादन करून अलगद डोळे मिटून मी सूर लावला -

"सखी मंद झाल्या तारका..आतातरी येशिल का? येशिल का?

येशिल का वर डोळे उघडले आणि सहजच पहिल्या रांगेत माझं लक्ष गेलं. डावीकडच्या खुर्चीत "ती" बसलेली. अगदी समाधी लागावी तशाच तंद्रीत "ती" एकटक माझ्याचकडे पाहतं होती. मोरपिशी शालूत तिचं उजळलेलं रूप पाहून माझ्या मनात आनंदाचे कारंजे उडणार इतक्यातच तिच्या गळ्यात असलेल्या चकाकत्या सोनेरी मंगळसूत्राकडे माझं लक्ष गेलं आणि हात थरथर कापू लागले आणि ओठांवर कंप सुटुन मी 'येशिल का येशिल का' वर अडकून पडलो आणि मेंदूपर्यंत काही जाणिवा, काही संवेदना पोहचायच्याआधीच त्या तिथेच व्यासपीठावर कोसळून मी गारद झालो. तो कायमचाच!!

आजही ह्या मृत्यूनंतरच्या जगात माझा आत्मा त्या स्वप्नघरांतल्या झोपव्यावर बसून त्याच आशेने आणि त्याच अनामिक वेड्या ओढीने तेच सूर तेच गाणं कित्येक युगे झाली तरी आळवत असतो कारण जन्म संपला तरी ओढ तीच आहे, प्रेमही तेच आहे आणि सूरही तेच आहेत. कदाचित कधीतरी त्या सूरांनी मंत्रमुग्ध होऊन कधीतरी ती येईलच ना आणि कधीतरी ह्या अस्तित्व नसलेल्या जगात सारं काही विसरून ती माझे सूर ऐकलेच ना? आणि कधितरी सूरांतली माझी ओढ  तिला दिसलेच ना आणि पुन्हा त्याच पहिल्या ओढीने ती माझ्याबरोबर येईलच ना.

{अजय चव्हाण}

# फुंकर

तिचा दाह मला सहन होत नव्हता.. तिलाही वेदना होत असतील याची खचितही जाण नव्हती मला.. तीव्र उन्हाचा अंगार झेलत धरण केलेल्या मौन व्रताला आता पर्यंतच्या सरलेल्या वर्षांत  ओळखलेच नव्हते मी.. दिसायची मला जाता-येता ती शुष्क भेगाळलेली जमीन.. लोकांकडूनही बऱ्याचदा ऐकायचे मी "काय हा उन्हाचा तडाखा, पाण्याचा थेंब नाही बिचारीला.." पण "ती" तरीही शांत गंभीरपणे सोसतच राहायची.. माझ्या  मनांत विचार यायचा, निसर्गाचा नियमच आहे हा उन्हानंतर पाऊस पडणारच, त्यात वाट पाहण्यासारखं आणि हळहळण्यासारखं काय आहे..! लोकांचे उसासे आणि खंत पाहून मनांत हसू यायचं, अन् वाटायचं की आता पाऊस पडला की हेच लोक म्हणणार "काय बाबा पाऊस, थांबायचं नावचं घेत नाही "..

.. पण असा विचार करणाऱ्या मला आज अचानक काय झालं होतं..  या भेगाळलेल्या जमिनीचा दाह माझ्यापर्यंत का पोहोचत होता.. तिने वारुणराजाला घातलेली आर्त हाक माझ्या कानांत का घुमत होती.. तिची आकाशाकडे लागलेली भकास नजर माझ्या डोळ्यांत पाणी का आणत होती.. तिच्यासाठी आज माझे हात देवासमोर का जोडले गेले अन् का म्हणाले मी देवाला.. "हे पालनकर्त्या, आज या तहानलेल्या धरणीला तृप्त कर.. तुझ्या असंख्य जलधारांनी तिला न्हाऊ घाल.. चिंब चिंब कर तिला.. का कशासाठी..?

की, धरणीची अन् माझी आस एकच होती! उन्हात होरपळून गेलेल्या तिला आणि आयुष्याच्या वाटेवर अचानक काटा रुतलेल्या मला, एकच गोष्ट हवी होती.. एक हळूवार फुंकर.. एक थंड हवेची झुळूक जी परत एकदा दोघींनाही पल्लवित करणार होती.. या कडक उन्हाचा अन् रुतलेल्या काट्याचा दाह सोसल्यानंतर पुन्हा नव्या अंकुरासाठी.. नवीन चैतन्यासाठी.. नवीन आव्हानांसाठी समर्थ करणार होती.. त्यामुळेच आम्ही दोघीही, प्राण कंठाशी आणून "त्याची" वाट पाहत होतो.. या रखरखत्या भूवरती तुझा रिमझिमणारा नाच बघायचाय.. तुझ्यामुळं आनंदानं न्हाहणारी ती पाखरं बघायचीयेत.. वरुणराजा धावत ये..

आज पहिल्यांदाच मला सगळ्या प्राणीमात्रांची दया येऊ लागली..  गाय,  कुत्री, बैल यांनी प्रचंड उन्हात स्वतः च्या तहान भूकेची आग कशी शमवली असेल हा प्रश्न मला

अगदी पहिल्यांदाच पडला.. आज पहिल्यांदा मला स्वतः मधून बाहेर पडून खरं विश्व बघितल्याचा अनुभव आला.. तीच झाडी, तेच पक्षी, तेच प्राणी जे मी रोज बघायचे, पण आज त्यांचं अस्तित्व जाणवत होतं.. त्यांची गरज जाणवत होती.. अन् कळत होतं की निसर्गात आणि जीवनात किती साम्य आहे.. आज मला सगळ्या पशुपक्षांतली सजीवता जाणवत होती.. त्यांची आणि माझी खरी गरज जाणवत होती.. .खरंतर, पाऊस माझी गरज नव्हता.. पण त्यामुळे येणारा आल्हाददायी अनुभव आणि चैतन्य माझ्या गरजेचं होतं.. पण यामुळेच जागेपणीही स्वप्नात असलेल्या माझे डोळे उघडले.. मी माझ्याव्यतिरिक्त माझ्याभोवती असलेल्या जगाचा सूक्ष्मपणे विचार करू लागले.. निसर्गाचा आणि जीवनाचा परस्परांशी संबंध जोडू लागले.. आणि, आणि, पेच आपोआप सुटत गेला..

काट्यामुळे कुरूप होतो, आणि त्यानंतर होणारा त्रास खूप भयंकर असतो या भीतीमुळेच मी पार कोलमडून गेले होते.. पण नंतर लक्षात आलं.. की हा काटा काही बाभळीचा नव्हता.. आणि अनवाणी चाललं की पायांत काटा मोडणारचं ना.. असे काटे मार्गातून काढत पुढे चालायचं असत.. शेवटी काट्याचा धर्मच आहे पायांत घुसणं, पण त्यामुळे कोणी चालणं तर सोडत नाही ना.. हो पण अनवाणी चालण्याची मात्र चांगलीच सजा मिळते हे देखील कळून चुकले.. हळूहळू वेदनांची तीव्रता कमी होऊ लागली.. पूर्ण वेदना शमण्यासाठी, काळ हा सर्व आजारांवरचं रामबाण औषध आहे असंच म्हणतात..

अशी मनांत विचारांची गर्दी सुरु असतानाच वर आकाशात ढंगांनीही गर्दी केली. थंड थंड हवेची झुळूक अंग शहारून टाकत होती.. पक्षांचा किलबिलाट, गाईवासरांचं हंबरणं, झाडं वेली आनंदाने डोलू लागली..इतक्यात वीज चमकली, अन् त्या पाठोपाठ ईश्वराच्या खळखळून हसल्याचा आवाज झाला.. अंगाची लाही लाही करणाऱ्या त्या तीव्र तडाख्यातून थंडावा देणारी ती गार हवेची झुळूक.. ती हळूवार फुंकर..

..आणि..आणि, परमेश्वराने हाक ऐकली.. तो आलं.. बरसला.. आपल्या असंख्य जलधारांनी चिंब चिंब केलं तिला.. मातीचा सुगंध पसरला.. धरणीला तृप्त केलं.. ती ही आनंदानं न्हाऊन निघाली.. इतके दिवस मौनव्रताने दाह सहन करणारी ती, मनमोकळेपणाने हसली.. सगळीकडे आनंदी आनंद झाला.. जमिनीच्या त्या राकट भेगा कश्या कोण जाणे एकमेकांत विलीन होऊन अदृश्य झाल्या..

ज्या आभाळानी तिला असंख्य वेदना दिल्या, त्यानेच तिच्या वेदनांवर हळूवार "फुंकर" घातली..

{डॉ. स्वागता पांडव}

# आईचा चोरकप्पा



निरंजन आणि मधू दोघे बहिण-भाऊ. निरंजन मोठा तर मधू लहान. दोघांची अगदी चांगली बट्टी जमत होती. निरंजन हा खूप हुशार आणि सालस होता. तर मधु अगदी त्याच्या विरुद्ध मधु खूप खोडकर आणि लाडावलेली होती. मधूचा प्रत्येक हट्ट हा तिचा भाऊ निरंजन कुठल्याही अटी न ठेवता पूर्ण करत असे.दादा... मला ना आज आपल्या शाळेच्या बाहेर त्या आजी बसतात ना त्यांच्याकडची चिंचा आणि बोरं हवी आहेत. मग काय निरंजन ने लगेच ती घेऊन दिली म्हणून समजा.. मधु आणि निरंजन घरामध्ये सुद्धा आईसमोर एकमेकांच्या चुकीत अगदी भागीदार होत असत.जर आई मधूला रागवत असेल तर निरंजन समोर यायचा. आणि निरंजन ला रागवत असेल तर मधू समोर यायची अगदी "उंदराला मांजर साक्ष"...मधु आणि निरंजन ची आई गृहिणी होती. आणि त्यांचे बाबा कोर्टात टायपिस्ट म्हणून काम करत. बाबांचा व्यक्तिमत्व अगदी कर्तव्यनिष्ठ आणि जबाबदार होतं आणि आई अगदी शांत आणि मनमिळाऊ स्वभावाची होती निरंजन आणि मधू च हे छोटंसं कुटुंब.निरंजन आणि मधु ची आई स्वयंपाक घरात सतत काहीतरी ठेवायची. याची कुणकुण मधूला खूप आधीच लागली होती. पण त्यादिवशी जेव्हा आई मधु आणि निरंजनला गोळ्या बिस्किटां साठी पैसे देत नाही तेव्हा मात्र मधू निरंजनला सांगते,अरे दादा,.. ऐक ना आईने आपल्याला आज का बरं पैसे दिले नसतील रे...??निरंजन म्हणतो, अग मधू असेल काहीतरी अडचण म्हणून दिले नसतील आईने... मधु म्हणते, नाही रे दादा... मी आईला खूप दिवसांपासून पाहते ती सतत स्वयंपाक घरात काहीतरी लपवत असते.मी एकदा पाहिलं ना आईला.. निरंजन म्हणतो, मधू असं काही नसेल तू उगाच आईबद्दल तसा विचार करतेस..मधू निरंजनला म्हणते, "दादा तू पैज लावतोस का..माझ्याबरोबर"?..पैज कसली पैज..? निरंजन विचारतो. "दादा आई खरच स्वयंपाक घरात काहीतरी लपवते" हे जर खर असेल तर तू मला दोन लेमन गोळ्या द्यायच्या.निरंजन विचारतो, अगं पण

**आपल्याला कसं कळेल की आई खरंच स्वयंपाक घरात काहीतरी लपवतेय ते..? दोघे अगदी क्षणभर विचार करतात तेवढ्यात बाबा घरी येतात बाबा आल्यावर आईला सांगतात उद्या आपल्याला कुलकर्णी काकांच्या घरी सत्यनारायणाच्या प्रसादासाठी जायचं आहे. लवकर आणि छान तयार व्हा.रात्रीच्या जेवणानंतर मधु आणि निरंजन बाबांकडून एक छानशी गोष्ट ऐकतात व झोपतात. दुसऱ्या दिवशी मात्र आई चांगली तयारीला लागते. तेव्हा मधु आणि निरंजन यांची काहीतरी कुजबुज चालू होते. आई विचारते,'काय रे काय चाललय तुमच्या दोघांचं'..? 'चला पटकन तयारी करा बरं'.सत्यनारायणाच्या पूजेचा प्रसाद हवा आहे की नको दोघांना..?तेवढ्यात मधु म्हणते, "आई आम्हाला की ने बाईंनी खूप सारा अभ्यास दिला गं..." मग मी आणि दादा आम्ही दोघं घरात अभ्यास करत बसतो तोपर्यंत तू आणि बाबा या जाऊन " आईला थोडं आश्चर्यच वाटतं.. इतर वेळेस अभ्यास न करणारी मधु आज इतकी कशी काय शहाण्या मुली सारखी वागतेय...?मग निरंजन ने सुद्धा मधु च्या आवाजात आवाज मिसळला. व घरीच बसण्याचा हट्ट करू लागला. शेवटी आई तयार होते. व तसं बाबांनाही सांगते. आई आणि बाबा दोघेही पुजेसाठी जातात.आणि इकडे मधु आणि निरंजन ची पैज चालू होते. स्वयंपाक घरातला कोपरा न् कोपरा पिंजून काढतात हे दोघं.हुश्श!!....बास.. खूप शोधलं बाबा कुठेच काही मिळालं नाही. निरंजन म्हणतो, "मधु तू पैज हरलीस". नाही रे, "दादा तो बघ ना तो कप्पा राहिला न....आपला बघायचा" मधु म्हणते.**

**निरंजन म्हणतो, "अगं वेडी आहेस का मधु ..? तो कप्पा एवढ्या उंचावर आहे. माझा हात पण नाही जात बुवा.अरे दादा, विसरलास का तू आपण झाडावरची बोरं, चिंचा,कै-या कशा तोडत होतो. अगदी तसंच हा कप्पा आपण बघूयात.. म्हणजे..? निरंजन विचारतो. अरे दादा, तू खाली वाक मी तुझ्या पाठीवर उभी राहते आणि पाहते निरंजन थोडासा घाबरतो.पण मधू साठी तो तयार होतो निरंजन च्या पाठीवर मधु चढते आणि तो कप्पा उघडते तर आत मध्ये दोन पितळेचे छोटेसे डबे ठेवलेले असतात.मधु ते डबे घेते आणि निरंजनला दाखवते. निरंजन म्हणतो, काय असेल या डब्यात..?**

**मधु म्हणते, बेसनाचे लाडू...?**

**निरंजन हसतो आणि म्हणतो बेसनाचे लाडू असते तर आईने आपल्याला ते कधीच दिले असते असं लपून ठेवले नसते.अरे दादा, हे बघ यावर आपल्या नावाच्या चिठ्या पण लावल्या आहेत. बघू, बघू निरंजन पाहतो. आता मात्र दोघांची उत्सुकता शिगेला पोहोचते. आणि क्षणाचाही विलंब न करता ते डबे उघडून बघतात. आणि आत मध्ये त्या दोघांना खूप सारी नाणी व नोटा दिसतात.मधु म्हणते, हे बघ दादा याचा अर्थ आई आपल्या खाऊचे पैसे यामध्ये ठेवत होती तर...**

निरंजन म्हणतो, अगं मधु हे बघ यामध्ये चिठ्ठ्या ठेवल्या आहेत तर.. थांब आपण वाचू त्या... निरंजन च नाव लिहिलेल्या डब्यात जी चिठ्ठी लिहिली होती त्यात असं लिहिलं होतं कि, हे पैसे मी माझ्या निरंजनच्या सायकल साठी ठेवलेत त्याचा वाढदिवस आला कि त्याला याच पैशातून त्याची आवडती सायकल घेईन....मधूच्या डब्यात जी चिठ्ठी होती त्यात लिहिलं होतं की माझ्या लाडक्या मधू साठी छूम् छूम् वाजणारे पैंजण या पैशातून घेईन... मधु आणि निरंजन एकमेकांकडे अगदी बघतच राहतात निरंजनच्या डोळ्यात अश्रू तरळतात..दादा खरंच आई आपला किती विचार करता ना रे.....! हो, मधू आई आपल्यासाठी खूप काही करते...मधु निरंजनच्या डोळे पुसते आणि म्हणते दादा ही पैज तूच जिंकलास... नाही मधु खरंतर आई इतके दिवस आपल्या पासून काहीतरी लपवत होती व आपल्याला खाऊचे पैसे पण देत नसायची ते खरं तर यासाठीच....आपण आईला चुकीचे समजलो पण आई आपला खूप पुढचा विचार करते गं.... निरंजन म्हणतो...

मधू निरंजनला म्हणते, दादा आपण आईला खरच खाऊसाठी पैसे नकोत मागायला किती आणि काय काय करते ती आपल्यासाठी..

निरंजन म्हणतो, मधू आता आपण पण आईसाठी काहीतरी करायचं.......करायचं पण नक्की काय करायचं...?मधु विचारते.

निरंजन म्हणतो, आपण ही आईने दिलेले खाऊसाठी चे पैसे गोळा करायचे आणि त्या पैशातून आई-बाबांसाठी काहीतरी भेटवस्तू घ्यायची...मधु अगदी हसतच तयार होते. निरंजन म्हणतो, मधु आता हे डबे जिथे होते तिथे त्या ठिकाणी ते ठेव बरं....ए...दादा आपण या जागेला एक नाव द्यायचं का..? नाव..? कसलं नाव..? निरंजन विचारतो.

दादा आपण की ने याला "आईचा चोर कप्पा" असं नाव देऊयात.. निरंजन हसतो आणि हसतच मान हलवतो..

{रेश्मा अंकोलीकर - ढवणे
९४२१४७३५७५}

# कन्यादान

सुनिता घाईघाईने फोनजवळ पोहोचली. केव्हाची घंटी वाजत होती. पण नळ चालू असल्याने तिला ती लवकर ऐकूच आली नव्हती.

"हॅलोऽ"

"हॅलो ताई, कधीची फोन करतेय. कुठे होतीस?"

"अगं बाथरुममधे होते. ऑफिसला जातांना कपडे भिजवून गेलेले, आत्ता धुतले." सुनिता हात नॅपकीनला पुसत म्हणाली.

"बरं ऐक ना, त्याच्या आईचा नकारच आहे आमच्या लग्नाला! खूप समजावले, पण काही उपयोग नाही झाला. कसं करायचं आता?"

"हम्म...बाकीचे? त्याचे वडील, बहीण काय म्हणतायेत?"

"आता आई नाही म्हणतेय म्हणून वडिल पण गप्पच आहेत. त्यांचे मत काही कळले नाही. बहिणीची संमती आहे. तिने पण तिच्यापरीने प्रयत्न केला. पण ते काही ऐकेनात."

"मग आता कसे करायचे? तू त्याच्याशी बोललीस का?"

"हो. आमचे बोलणे झालेय. त्याची बहीण व तू लांबलांब का होईना, पण एकाच शहरात राहता. तिचे म्हणणे आहे की तिच्या घरापुढे मांडव घालून लग्न लावूयात. म्हणजे तिच्या आईला आपल्यावर जास्त राग धरता येणार नाही."

"हो ते पण खरेच म्हणा! मुलगीच मदत करतेय म्हटल्यावर विरोधाची धार जरा बोथट होईलच. पण आपल्या घरातले तयार आहेत का?"

"दादा तर स्पष्ट नाहीच म्हणतोय, आई त्याला हो ला हो करतेय. नीट काही बोलेना. पण मधेच होकार असल्यासारखी पण वागतेय. जाऊ दे. तुला त्याच्या बहिणीकडे, शमिताकडे जाऊन बोलावे लागेल. तयारी करावी लागेल. आम्ही लग्नाच्या आदल्या दिवशी येवू. हळद आधी करु, दुसऱ्या दिवशी सकाळी लग्न. दुपारी परत घरी येवू पण!"

"चालेल. थांब, तिचा पत्ता, फोन नंबर दे. मी लिहून घेते." फोनशेजारची डायरी घेवून तिने पेन उघडला आणि धाकटी सांगत असलेली माहीती लिहून घेतली.

ऑफिस सांभाळून, घरचं करुन जमेल तितक्या तातडीने ती शमिताला भेटली. शमिता फारच उत्साहात होती. भावाच्या लग्नाचा आनंद की आईवडीलांच्या मर्जीशिवाय तिच्या दारात लागणाऱ्या लग्नाचे थ्रील? सुनिता विचार करत राहीली.

एकत्र काम करता करता शमिताच्या भावाला आधी धाकटीबद्दल वाटायला लागलेले. पण जात वेगळी, एकुलता एक, घरुन विरोध होणार हे नक्की! म्हणून तो काही वर्षे गप्पच होता. तसे त्याचे घरी येणे जाणे होतेच. धाकटीच्या लग्नाचे बघायला लागल्यावर त्याने दबकतच तिला विचारले. तिने घरी सांगितले.

मुलगा चांगला होता. स्वतःच्या पायावर उभा होता. पहाण्यातला होता. अजून काय हवे! पण केवळ विरोध करायचा म्हणून भावाने विरोध केला. आई त्याच्यावर अवलंबून. ती त्यालाच साथ देणार हे ओघानेच आले. मधलीचे पण लव्हमॅरेजच होते, ते थाटामाटात लावून दिलेले.

सुनीताला ह्या विरोधाचे कारण काही कळले नाही. शेवटी तिने आपला निर्णय दिला आणि गप्प बसली. धाकटीने तिचा पदर धरला आणि पुढे सरकली.

आता लग्नाची तारीख पक्की झाली. त्याच्या आईवडीलांचे मन वळवण्याचे प्रयत्न अजून सुरुच होते. पण लग्न त्याच तारखेला लागणार हे नक्की झाले.

सुनिताची धावपळ सुरु होती. लग्नासाठीचे दागिने, कपडे सगळे शमिताने पसंत केले. पण मम म्हणायला सुनिताला जावे लागले. वडिल नव्हते. घरातले शेवटचे लग्न म्हणून तिने वेळ काढून सर्व केले. खरे तर ह्या धावपळीने ती दमून गेली.

लग्नाच्या आदल्या दिवशी धाकटी व घरातले शमिताच्या घरी पोहोचले. सुनिताचे घर लांब, प्रवासात विनाकारण वेळ जाईल म्हणून शमिताने तिच्याच घरी थांबायला लावले. एका रात्रीचाच प्रश्न होता. धाकटी तर कधीच त्यांच्या घरातली झाली होती.

सकाळी लवकर आवरुन सुनिता, तिचा नवरा, मुलगा लग्नघरी पोहोचले. मोजकीच लोकं लग्नाला बोलावली होती. शमिता नटूनथटून मिरवत होती. आपले आईवडील लग्नाला आलेले नाहीत याची तिला फिकीर दिसली नाही. सुनिताला उगाचच वाईट वाटले. एकुलत्या एका मुलाच्या लग्नाला आईवडील नसावेत! किती दुर्दैव.

ती शमिताच्या घरात गेली. धाकटी कुठे दिसेना.

"अगं, ती गौरीहार पुजतेय." शमिताने तिच्या तोंडावरचे प्रश्नचिन्ह पाहून उत्तर दिले.

"कुठे?" सुनिता त्या रुममधे गेली. धाकटी तयार होवुन, सजून धजून गौरीहार पुजत होती. चेहरा उजळला होता, पाहून हसली आणि परत पुजेत मग्न झाली. सुनिताला हसायला आले. लग्न अजून लागले पण नव्हते. धाकटी परकी झाली होती.

काही मिनिटातच शमिताने त्यांना मांडवात पळवले. भाऊ, वहिनी, आई तिथेच होते. लग्नाचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर कुठेच नव्हता. बांधून घातल्यासारखे ते एका कोपऱ्यात बसले होते. सुनिताने एक नि:श्वास सोडला.

लग्न वेळेवर लागले. फोटो काढून झाले. होमहवन सुरु झाले. मंत्रांनी वातावरण भारल्यासारखे झाले.

"ताई, तू व दाजी कन्यादान करा हं!" धाकटी पाया पडतांना कुजबुजली. सुनिताने होकारार्थी मान हलवली. तसेही भाऊ कन्यादानाला बसला असता की नाही कोण जाणे?

कन्यादानाचा विधी सुरु करण्यासाठी भटजींनी आवाज दिला. सुनिता व तिचा नवरा पुढे सरकले. भटजी सांगत होते तसा विधी पार पडला. धाकटी आता

**लौकीकार्थाने परकी झाली. डोळे भरुन येत होते. कसे घाईघाई लग्न लावले! सुनिताला कानकोंडे वाटू लागली. विधी संपले. पाहुणे जेवायला ठरवलेल्या लंचहोमकडे वळले. हसतखेळत जेवणं पार पडली.**

**जेवण झाल्यावर सगळे परत मांडवात आले. संध्याकाळ झालीच होती. उन्हं उतरत होती. निरोप घेवून निघावे म्हणून सुनिता शमिताला, तिच्या घरच्यांना भेटली.**

**सर्वांचे आभार मानून ती भाऊ, वहिनी व आई बसली होती, तिथे आली. ती लोकं पण तिथूनच परत जाणार होती. सुनिता काही बोलणार तितक्यात तिची आई डोळे पुसू लागली. धाकटीसाठी असे वाटून सुनिताचे पण डोळे भरुन आले. ती समजूतीखातर काही बोलणार इतक्यात आई म्हणाली,**

**"दादाने करायला हवे होते, माझी फार इच्छा होती."**

**"काय?" न कळून सुनिताने विचारले.**

**"कन्यादान्....वडिलांनंतर भाऊच बापाच्या जागी असतो. तू करायला नको होते. त्याला म्हणायला हवे होतेस, कन्यादान कर म्हणून!" सुनिताकडे रागाने बघून ती मागे वळून बॅग भरु लागली.**

**मनावर मणामणाचे ओझे घेवून सुनिता तशीच बघत उभी राहीली. डोळ्यांतले अश्रू तसेच आतल्या आत आटून गेले.**

{विनीता माने}

# दिल दोस्ती दुनियादारी

(कथेतील सर्व पात्रं ही 'दिल दोस्ती दुनियादारी' ह्या झी मराठी वरील लोकप्रिय मालिकेतील आहे. ही मालिका आता चालू असती तर नेमकं ह्या मित्रांनी काय केलं असतं हे लिहण्याचा हा प्रयत्न. पात्रा बद्दल सांगायचं तर, छे ह्यांना कोण ओळखत नाही प्रत्येकाला हेवा वाटावा अश्या ह्या अनोख्या मैत्रीला कोण विसरेल. तर 'दिल दोस्ती दुनियादारी - भाग कोरोना आला रे')

बादल पे पाँव है, या छूटा गाँव है अब तो भई चल पड़ी, अपनी ये नाव है बादल पे पाँव है.

कैवल्य :- क्या बात है मिनल आज एकदम खुशीत आहेस तू. झालंय तरी काय असं? लॉटरी लागली की ऑनलाईन जाहिरात मिळाली एखादी?

मिनल:- अरे आता शूटिंग ला परमिशन दिलीय goverment ने आणि मला एक ऑडिशन चा कॉल आलाय. 3 महिन्याने आज बाहेर पडणार. जाम भारी वाटतंय यार.

आशू :- मिनल बाहेर नको जाऊ ते पोलीस जागा बघून मारतात लय दुखतं गं. आई आई गं!! ताई खायला देना काहीतरी.

कैवल्य :- बाळ आशूतोष बिन कामाचं बाहेर पडल्यावर मारतात पोलीस उगाच सगळ्यांना नाही मारत.

आशू :- हे बघ कैवल्य मला काम होतं म्हणून च बाहेर पडलेलो मी उगाच काहीही बोलू नको.

ॲना :- हो अशुड्या किंजल चा ब्रश हरवलेला तो सापडला नसता तर काय झालं असतं तिच्या दातांचं.

(सगळे जोरदार हसतात)

आशू :- असू दे काहीही किंजल इज माईन, तिच्या साठी कायपण.ताई अगं खायला देना काहीतरी भूक लागलीय.

सुजय :- एक मिनिट थांबा रे सगळे. हे बघ मिने बाहेर त्या रोगाने थैमान घातलंय अश्या परिस्थितीत बाहेर पडणं गरजेचं आहे का? ऑडिशन तर द्यायचीय ऑनलाईन दे. का उगाच विषाची परीक्षा घेतेयेस.

रेश्मा :- आशू हे घे पोहे. मिनल, सुजय बरोबर बोलतोय काय आहे ते घरून कर बाई उगाच बाहेर नको पडू.

मिनल :- हे बघ सूज्या मागच्या 3 महिन्या पासून काम नाहीये. घरचे रेंट वगैरे पण भागत नाहीये, हा आता तू घेतोयस संभाळून पण आता थोडे तरी हात पाय हलवायला हवेत की.

सुजय :- मी घेतोय ना संभाळून, मग कशाला बाहेर पडतेयस तसही ऑडिशन आहे काम असतं तर चाललं असतं पण अजून नक्की काहीच नाही मग का ?

मिनल :- अरे काम मिळवायला ते आधी दाखवावं लागतं चांगलं वाटलं की मिळेलच की, काम मिळत नाही म्हणून प्रयत्न करणं थोडी सोडून चालणारे. आणि एरव्ही ट्राय ट्राय बट डोन्ट क्राय चं लेक्चर देणारा तूच नको म्हणतोयस.

कैवल्य :- तो नको म्हणतोय त्याला कारण आहे मिनल बाहेर अजून म्हणावी तशी परिस्थिती निवळली नाहीये.

मिनल :- हो पण घरी किती दिवस बसणार आहोत. थोडीफार सेव्हिंग होती ती पण संपत आलीय. सुजय वर किती जबाबदाऱ्या टाकायच्या. त्यात त्यालाही अर्धाच पगार मिळतोय तोही वेळेवर नाहीच.

रेश्मा :- हे काय ॲना तू का तयार होऊन बसलीयस घरी.

ॲना :- रेश्मा, मी पण बुटीक ला जाणारे आज पासून. मिनल हे घे तुला मॅचिंग मास्क.

मिनल :- थांकू बच्चा.

सुजय :- १ मिनिट, तुम्ही सगळ्यांनी कुणाचं ऐकायचं नाहीच असं ठरवलंय का ? नाही करा जे मनाला येईल ते कुणीही ऐकू नका माझं.

मिनल :- अरे सुजय चिडू नको रे. बघ मास्क आहे gloves घातलेत, बॅगेत सॅनिटायजर आहे आणि पाणी बॉटल पण घरातून भरून घेतलीय. बाहेर काही खाणार नाही प्रॉमिस!

सुजय :- ठीक आहे जा तुम्ही पण लक्षात ठेवा. काहीही झालं तरी तोंडावरून मास्क नाही काढायचा सतत हात धुवायचे, कोणाला शेक हँड नाही करायचं आणि रेश्मा

**ह्यांना घरूनच खायला बांधून दे नाहीतर नालायक पोरी बाहेर खातील आणि आजारी पडतील.**

**मिनल, ॲना, रेश्मा, कैवल्य, आशू :- हो बाबा, तुम्ही म्हणाल तसं.**

**सुजय : नालायक आहात रे तुम्ही खरंच.सुधारणार नाही कधी.**

**मिनल ऑडिशन ला जाऊन येते आणि दाराची बेल वाजवते. सुजय तिला कॉल करतो**

**मिनल :- अरे मी आलेय बाहेर इथल्या इथे काय कॉल करतोयस.**

**सुजय :- हो मला माहितीय मिनल तू अलियेस ते. आता मी काय सांगतोय ते ऐक, घरात आलीस की इकडे तिकडे हात लावायचा नाही**

**कैवल्य :- अरे स्कॉलर ती दमून आलीय तिला घरात घे आणि मग दे तुझ्या सूचना.**

**सुजय :- १ मिनिट तू मध्ये बोलू नकोस मी जे करतोय ते महत्वाचं आहे तुमच्या सगळ्यांच्या भल्यासाठीच करतोय सगळं.**

**कैवल्य :- तिला घरात घे आणि मग कर भलं.**

**सुजय :- १ मिनिट कैवल्य**

**मिनल :- सूज्या तू नंतर भांड त्याच्याशी आधी दार उघड.**

**सुजय :- हो उघडतो पण तू आलीस की तुझं सामान दाराच्या मागे ठेवायचं आणि लगेच बाथरूम मध्ये जाऊन अंघोळ करायची आणि कपडे धुवून बदलून मग काहीही कर तू घरात.**

**मिनल :- सूज्या तू दार उघडतो की तोडू आता?**

**सुजय :- सांगितलेलं लक्षात आलं असेल तर उघडतो**

**मिनल :- होरे बाबा आलंय लक्षात.**

**(सुजय दार उघडतो आणि मिनल आत येते)**

**असेच 3 दिवस जातात आणि जे घडायला नको होतं तेच घडतं. मिनल ज्या ऍड ची शूट करत होती त्या कृ मधील काही जण खोकल्या चा त्रास होतोय म्हणून येत नाहीत. आणि थोड्या वेळाने ते कोविड पॉझिटिव्ह असल्याची न्यूज येते आणि शूटिंग कॅन्सल होते. मिनल कैवल्य ला फोन करते.**

कैवल्य :- बोल मिनल, ब्रेक मिळाला वाटतं फोन करायला.

मिनल :- अरे शूट कॅन्सल झालंय.

कैवल्य :- अरे वाह, मग पार्टी करूया.

मिनल :- कैवल्य, फालतूगिरी करू नको फोन मध्ये घुसून मारिन.

कैवल्य :- अच्छा घ्यायला यायचंय का ? तू मला लोकेशन पाठव शून्य मिनिटात पोचतो मी.

मिनल :- अरे ऐक निघू नकोस

कैवल्य :- मग काय वेळ जात नाही म्हणून फोन केलायस का ?

मिनल :- तू ऐकशील तर बोलेन ना?

कैवल्य :- बर बोल

मिनल :- अरे काल आमच्या सेटवरच्या २ मुली आजारी पडल्या म्हणून त्यांना टेस्ट साठी नेलं, आणि आज त्यांचा रिपोर्ट पॉझिटिव्ह आलाय आज.

कैवल्य :- अरेरे! वाईट झालं, होतील बऱ्या पण त्या लवकर. पण तू  हे फोन वर का संगतेयस घरी ये आरामात बोलू.

सुजय :- काय रे कोण आहे ? गर्ल फ्रेंड वगैरे का ?

कैवल्य :- नाही बॉयफ्रेंड

सुजय :- मिनल आहे वाटतं, तिला डायरेक्ट घरी ये म्हणून सांग उगाच भटकू नको.

मिनल :- ये बावळटांनो मी फोन पकडून बसलीय तुमचं काय चाललंय

कैवल्य :- तेच म्हणतोय घरी ये बोलू आपण.

मिनल :- भेंडी डोक्यात जातोयस हा कैवल्य तू. तू सूज्या ला फोन दे

कैवल्य :-  स्कॉलर, घे मिनल ला तुझ्याशी बोलायचंय.

सूजय :- बोल मिनल ऐक ना ?

मिनल :- सूज्या अरे मला थोडी सर्दी जाणवतेय घसा पण खवखवतोय, कणकण वाटतेय.

सुजय :- अगं, मग घरी ये रेश्मा च्या हातचा आलं घातलेला चहा पी बरं वाटेल तुला.

मिनल :- अरे सूज्या माझ्या सोबत असणाऱ्या मुलींनी काल टेस्ट केली, त्यांची पॉसिटीव्ह आलीये आणि आता मलाही झालाय असं वाटतंय.

सुजय :- १ मिनिट, मिनल तुला आज prank करायचा मूड आहे ना, मी मुळीच फसणार नाहीये तुझ्या prank ला.

मिनल :- सूज्या अरे असं का करताय तुम्हाला कळत नाहीये का जाऊदे मी फोन ठेवते.

सुजय :- अगं तसं नाही ऐकून तरी घे (एवढं म्हणे पर्यंत मिनल फोन ठेवते)

कैवल्य :- स्कॉलर काय झालं

सुजय :- कोरोना

कैवल्य :- हो मिनल बोलली मला तिच्या मैत्रिणींना झालाय म्हणून.

सुजय :- अरे मिनल ला

रेश्मा :- अरे देवा (रडायला लागते)

कैवल्य :- स्कॉलर, डोकं फिरलंय का तुझं? काय बडबडतोयस तू?

सुजय :- अरे मी नाही ती म्हणतेय म्हणजे तिला शंका आहे

कैवल्य :- अरे मग तिला घरी ये आपण बघू काय ते म्हणून सांगायचं ना ?

सुजय :- अरे पण तिला खरंच असेल तर आपल्याला ही होऊ शकतो.

कैवल्य :- अरे आपली मिनल आहे ती, तिच्यामुळे आपल्याला काय होणारे. सूज्या तू एवढा स्वार्थी असशील असं वाटलं न्हवतं मला.

सुजय :- अरे कैवल्य, तुला वाटतेय त्याच्या पेक्षा जास्त मला तिची काळजी आहे.

कैवल्य :- तुझ्या वागण्यातून दिसतेय ते. एक काम कर तू राहा इथे मी जातो मिनल कडे होउदे काय व्हायचंय ते.

आशू ,ॲना रेश्मा :- थांब कैवल्य आम्ही पण येतो.

सुजय :- १ मिनिट, थांबा सगळे मिनल ने फोन कट केलाय तिला आधी फोन करतो मग जा तुम्ही.

**आशू :- स्पीकर वर टाक स्कॉलर फोन**

**सुजय :- हो टाकतो**

**मिनल :- हा बोल सूज्या**

**सुजय :- मिनल निघालीस का तू?**

**मिनल :- डोक्यावर पडला का तू? मी घरी आले की सगळे अडकतील ह्या झमेल्यात.**

**कैवल्य :- काही होत नाही मिनल तुला आम्ही येतोय सगळे तुझ्याकडे, ह्या भित्र्या सुजय ला बसुदे त्याचं घर कुरवाळत.**

**आशू :- हो मिनल तू लोकेशन पाठव आम्ही शुन्य मिनिटात पोहचतो तिथे.**

**मिनल :- ये १ मिनिट कोणीही येऊ नका. सुजय म्हणतोय ते बरोबर आहे.**

**ॲना :- काय बरोबर आहे आपल्या माणसां पासून आपल्याला कधी काही होत नसतं.**

**मिनल :- अरे ऐका जरा सुजय म्हणतोय ते बरोबर आहे. आता सेट वरचे सगळेच चेक करायला जातायत मी पण जातेय त्यांच्या सोबत. रिपोर्ट निगेटिव्ह आला की येईन घरी.**

**रेश्मा :- अगं मिनल नको जाऊ ते लोक मारून टाकतात कोरोना सांगून तू घरी ये मी तुला काढा बनवून देते मग बघ कोरोना का फरोना कसा पळून जातो ते.**

**मिनल :- ये भेंडी रेश्मा काय पण नको बोलू**

**सुजय :- १ मिनिट थांबा सगळे, मिनल मी काय बोलतोय ते ऐक. मी तुला एक मेल केलाय. आलाय का चेक कर.**

**मिनल :- आता कसला मेल?**

**सुजय :- मी आपल्या सगळ्यांचा कोरोना इन्शुरन्स करून घेतला होता मागच्या आठवड्यात जेव्हा तू बाहेर जायला लागलीस तेव्हा बॅकअप म्हणून त्यामुळे तुला पैसे लागणार नाहीत तरी लागणार असतील तर पाठवतो. शक्यतो होम क्वारंन्टाइन हो. आणि महत्वाचं म्हणजे काळजी घे.**

**मिनल :- सूज्या अरे**

**सुजय :- नको बोलूस काही. पॉसिटीव्ह रहा आणि निगेटिव्ह रिपोर्ट घेऊन ये. आम्ही सगळे वाट बघतोय तुझी. काही लागलं तर सांग नक्की.**

**मिनल :- हो सांगते नक्की. चलो बाय.**

**सुजय, कैवल्य, आशू, ॲना, रेश्मा :- बाय**

**कैवल्य :- सूज्या सॉरी, ते तुला**

**आशू :- हो एस ओ आर आर आय सॉरी स्कॉलर**

**सुजय :- अरे बास बास, चला तयारीला लागा.**

**रेश्मा :- कसली तयारी?**

**सुजय :- देव करो आणि मिनल ला काही न हो ओ तिचा रिपोर्ट निगेटिव्ह च येवो. पण जर पॉसिटीव्ह आला आणि घरी राहायचं ठरलं तर मात्र मुलींनो तुम्ही बाहेर झोपायचं. बेडरूम मिनल साठी असुदे. काही दिवस आपण आजींचं बाथरूम वापरू.**

**आशू :- ठिकाय पण आपल्या मिनल चा रिपोर्ट निगेटीव्ह च येणार. अरे तिच्या नादाला अजून मुंबईतले भाई नाही लागले त्या कोरोनाची काय बिशाद.**

**(घरात सगळे चर्चा करत असतात. वरवर जरी दाखवत असले ते की आपण पॉसिटीव्ह आहे तरी त्यांच्या मनात आतल्या पॉसिटीव्ह आणि निवेटिव्ह मनांचं युद्ध चाललं होतं. एरव्ही डॅशिंग असणारी मिनल पण आतून थोडी घाबरलेली च होती. पण जिच्याकडे बाबा सारखं प्रेम करणारा सुजय, मोठया भावा सारखं प्रेम करणारा कैवल्य छोटी इनोसंट अशी ॲना आणि धांदरट आशू तर सतत खा खा म्हणून मागे लागून आई सारखं प्रेम करणारी रेश्मा. तसे हे मित्र आपल्या साठी ते स्वतः एकमेकांना कुटुंब च समजतात आणि अश्या पॉसिटीव्ह कुटुंबात एकच निगेटिव्ह गोष्ट घडलेली. मिनल चे रिपोर्ट्स. मिनल ला जगरणा मुळे त्रास झालेला तिला होत असलेला त्रास म्हणजे कोरोना न्हवता.)**

**मिनल सुजय ला फोन करते**

**सुजय :- मिनल चा फोन आलाय**

**ॲना :- उचल ना मग पटकन**

**आशू :- स्कॉलर स्पीकर वर टाक**

सुजय :- हा हॅलो, बोल मिने

मिनल :- आरे रिपोर्ट्स आलेत

कैवल्य :- हे बघ मिनल आम्ही तूझ्या सोबत आहोत तू घाबरू नको.

मिनल :- (शक्य तेवढा आवाज बारीक ठेवत) अरे घाबरू नकोस काय म्हणतोस रिपोर्ट्स

रेश्मा :- मिनल तू हॉस्पिटलमधून पळून ये मी परवा व्हाट्सएप वर वाचलाय एक काढा तुला करून देते. तू होशील बरी.

सुजय :- १ मिनिट काहीही काय सांगताय तिला. मिनल मला सांग dr काय म्हणालेत तुला.

मिनल :- घरी जा म्हणालेत

कैवल्य :- म्हणजे होम क्वारंटाइन सांगितलंय. ठिकाय मिनल आम्ही तयारी केलीय तू ये तुझ्यासाठी बेडरूम मध्ये व्यवस्था केलीय.

मिनल :- अरे बावळटा, घरी जा म्हणजे रिपोर्ट निगेटिव्ह आलेत.

काssssय सगळे एकदम ओरडतात.

मिनल :- काय रे आनंद नाही का झाला तुम्हाला.

आशू :- तुला झाला नसेल तेव्हढा झालाय.

मिनल :- ठिकाय मी येतेय बाय.

मिनल चं घरी जंगी स्वागत होतं. शेरलॉक कैवल्य आणि आशू वॉटसन तिची मुलाखत घेतात, रेश्मा तिच्या आवडीचा स्वयंपाक करते आणि सुजय सुटकेचा निश्वास टाकतो. हसता हसता नकळत मिनल चे डोळ्यात पाणी येतं. पण तिच्या जिवा भावाचे मित्र रडू थोडी देणारेत.)

(अशी ही मित्रांच्या प्रेमाची साता उताराची कहाणी सुफळ सुम्पूर्णम)

दुनिया हि रंग बिरंगीआपल्या वेड्या स्वप्नांची

मैत्रीत ह्या... मैत्री ह्या..

बंधन नाही नात्यांचे तरी बंद हे जन्मभराचे

**मैत्रीत ह्या... मैत्री ह्या..**

**जगण्याची रीत हि भारी दोस्ताना सावरणारी**

**जोडणारी.. जोडणारी..**

**दिल दोस्ती दुनियादारी**

{अक्षय दुधाळ}

# निरवयव ब्रह्मी रुप

**निरवयव ब्रह्मी रुप घे त्या क्षणाला**
अति शरणत भावे भक्त हाकारी त्याला

**त्रिभुवन रुप ज्याचे घेई कोदंड हाती**
सुखवि नित स्वभक्ता संहरी दुष्टशक्ती

**विमल नयन तेजे भास्करा तेज देतो**
मुखकमल निलिमे व्योमही साज घेतो

**सुघड तनु जयाची मोहवी भाविकाला**
चरणकमळ चित्ती उन्मनी त्या क्षणाला


**अति परिणित भावे रुप ये निर्गुणाला**
सदगुरु तरी दावी दोन्हीही तोचि झाला

🙏🙏🙏🙏🙏🙏🙏🙏🙏🙏🙏🙏

**विमल नयन तेजे भास्करा तेज देतो ..... श्रीरामांचे विमल नयन इतके तेजःपुंज आहेत की प्रत्यक्ष सूर्यानेही आपले तेज या प्रभू नेत्रातूनच घेतले आहे.**
**व्योम... आकाश, अंतरिक्ष... श्रीरामाचे मुखकमल इतके विलोभनीय निळसर/श्यामल आहे की आकाशानेही त्याच्याकडूनच निलिमा (निळसर झाक) घेतली आहे...**
**उन्मनी... मनाचे अमन होऊन भाविकाचे चित्त चैतन्यरुप होते.**
**दोन्हीही... सगुण व निर्गुण.**

**{शशांक पुरंदरे}**

# Book Review-Wonder by R J Palacio-बुकरिव्ह्यु




Wonder ही गोष्ट आहे एका दहा वर्षाच्या लहानग्या मुलाची. ऑगस्ट पुलमनची. जो इतर मुलांसारखाच curious आहे.मस्तीखोर आहे. आणि स्टार वॉर्सचा खूप मोठा फॅन आहे. त्याच त्याच्या आई-वडिलांसोबत, मोठ्या बहिणीसोबत आणि पाळलेल्या पेट- डेजीसोबत गोड- प्रेमाचं नातं आहे.. पण या कादंबरीची tragedy म्हणजे त्याचा चेहरा. ऑगस्टचा चेहरा हा जन्मतःच Treacher Collins Syndrome नावाच्या रेअर जेनेटिक कंडिशनमुळे deformed आहे.

कादंबरीत या ऑगस्टची वाचकांना ओळख करून देताना लेखिकेने म्हटले आहे की, My name is August, by the way. I won't describe what I look like. Whatever you're thinking, it's probably worse.

ऑगस्टचा चेहरा हा सर्वसामान्य मुलांपेक्षा वेगळा आहे. जेनेटिक कंडिशनमुळे त्याच्या चेहऱ्याची development नीट झालेली नाही. लेखिकेने ऑगीच्या चेहऱ्याचं वर्णन करताना तो दिसायला एखाद्या जळलेल्या मशरूमशेप रोबोट सारखा आहे. असं लिहीते.

या जेनेटिक कंडिशनमुळे अगदी लहान वयातच ऑगीच्या चेहऱ्यावर एकुण २७ लहान-मोठ्या सर्जरी झाल्या आहेत.. त्याच्या अशा फिजिकल कंडीशनमुळे त्याच home schooling करण्यात आले. आणि आता त्याची आई (Isabella Pullman) त्याने middle schoolमध्ये(इयत्ता पाचवी) admission घेण्यासाठी आग्रह करते. शाळेत नव्याने admission घेणारा तु एकटाच नसशील. तेव्हा हीच वेळ योग्य आहे. असं पटवून देते. ऑगस्टला शाळेत रुळताना अनेकदा त्यांच्या फिजिकल अपेरिअन्समुळे अनेक लहान-मोठ्या अडचणींना तोंड द्यावे लागते. या प्रवासात त्याला समर- जॅकसारखे मित्र भेटतात.. या कादंबरीचे वैशिष्ट्य म्हणजे फक्त

**ऑगस्टच्याच नाही तर त्याच्या बहिणीच्या- त्याच्या मित्रांच्या दृष्टीकोनातून ह्या कादंबरीचे अनेक पैलू आपल्यासमोर उलगडत जातात.**

**वर्षाअखेर निकालाच्या दिवशी ऑगस्टला त्याच्या मेहनतीसाठी, त्याने छोट्या-मोठ्या अडचणींवर मात करत दाखविलेल्या त्याच्या जिद्दीसाठी गोल्ड मेडल मिळते. तेव्हाच्या त्या आनंदाच्या क्षणी देखील ऑगीच्या मनात सुरू असणारे विचार हे आपल्याला विचार करायला भाग पाडतात ..**

It's like people you see sometimes, and you can't imagine what it would be like to be that person, whether it's somebody in a wheelchair or somebody who can't talk. Only, I know that I'm that person to other people, maybe to every single person in that whole auditorium.

To me, though, I'm just me. An ordinary kid.

But hey, if they want to give me a medal for being me, that's okay. I'll take it. I didn't destroy a Death Star or anything like that, but I did just get through the fifth grade. And that's not easy, even if you're not me.

**शाळेत/चारचौघात वावरताना ऑगीकडे लोक ज्या नजरेने पाहत असतात. त्यावेळी त्याच्या मनामध्ये असंख्य विचार येतात. ते विचार देखील लेखिकेने इतक्या सुंदररीत्या मांडले आहेत कि वाचताना वाचकाच्या मनात ऑगस्टविषयी वाटत असणारी कणव अगदी सहजतेने प्रेमात बदलते. ऑगीच्या जीवनातल्या याच काही प्रसंगांवर या कादंबरीचा संपूर्ण प्लॉट आधारित आहे.**

**जगभरातील विविध एकुण २९भाषांमध्ये अनुवादीत झालेली आणि ५लाख प्रती विकल्या गेलेल्या ह्या कादंबरीवर २०१७ साली चित्रपट प्रदर्शित झाला आहे. यात ऑगस्टची भुमिका ही जेकब ट्रेंबली** (Jacob Tremblay) **याने केली आहे.**

**ही कादंबरी विशेषतः जरी लहान मुलांसाठी म्हणून लिहिलेली असली तरी देखील कुठल्याही वयाची व्यक्ती हे पुस्तक वाचताना या कथानकाच्या प्रेमात पडते. आणि ऑगीच्या या गोष्टीतून वाचकांना जगाकडे सहानुभूतीने बघायला- जगायला शिकवते..**

Name : Wonder
Author : R. J. Palacio
Genre : Children's novel
Publisher : Alfred A. Knopf
Pages : 310

Awards : Maine Student Book Award, Vermont's Dorothy Canfield Fisher Children's Book Award, Mark Twain Award, Hawaii's Nene Award, Junior Young Reader's Choice Award

**(फोटो आणि इतर माहितीस्त्रोत : गुगल, विकीपिडिया)**

**{दिप्ती भगत}**

# पिस्ता नारळ बर्फी

नारळ पावडर, कंडेन्स्ड मिल्क आणि आपली आवडती ड्रायफ्रूट यांनी बनविलेले नारळ बर्फी 15 मिनिटांपेक्षा कमी वेळात बनवता येते. आपण उपवासासाठी आणि जेव्हा आपल्याला काहीतरी गोड खाण्यास वाटत असेल तेव्हा बनवू शकतो. लहान मुलांना खूप आवडणारी बर्फी मऊ आणि चवदार.
आज मी पिस्ता नारळ बर्फी कशी बनवायची ते सांगणार आहे.

साहित्य :

नारळ पावडर - 300 ग्रॅम
कंडेन्स्ड मिल्क - 400 ग्रॅम
पिस्ता - 10-12
खाण्याचा हिरवा रंग - 2 थेंब
तूप - 1 चमचा

पद्धत :

1. एका कढईत कंडेन्स्ड मिल्क टाका आणि कमी आचे वर ठेवा.
2. आता त्यात नारळ पावडर घालून मिक्स करावे.
3. मिश्रण मंद आचेवर ढवळत शिजवून घ्या.
4. मिश्रण घट्ट झाल्या वर गॅस बंद करा.
5. आता मिश्रणाचे दोन सारखे भाग करून घ्या.
6. दुसरी कडे 6 ते 7 पिस्ता ची मिक्सर मधून पावडर करून घ्या आणि 4 ते 5 पिस्ता चे बारीक काप करून घ्या.
7. एक भाग मिश्रणात वरील बनवलेली पिस्ता पावडर घालून त्यात 2 थेंब हिरवा खायचा रंग घालून मिश्रण मिसळा.
(आवड असेल तर दुसऱ्या मिश्रणात व्हॅनिला एस्सेन्स चे 4 थेंब टाकू शकता)

**8. आता एका ताटाला थोडे तूप लावून पांढरे मिश्रण त्यात ठेवा आणि ते उलथनी ने समान रीतीने पसरवा/ थापावे.**
**9. त्या वरती पिस्ता चे मिश्रण टाकून पसरवून घ्या.**
**10. पिस्त्याचे काप टाकून हलक्या हाताने थापावे.**
**11. गार झाल्या वर इच्छित तुकड्यांमध्ये कापून घ्या. (गार करण्या साठी 10 मिनिटे फ्रीज मध्ये ठेवू शकता)**

**खुप चवदार पिस्ता नारळ बर्फी तयार.**



**{श्वेता चिन्नापुरकर}**

# उकडीचे आंबा मोदक

आपल्या सर्वांचे, आंबे आणि मोदक, यावर सारखेच प्रेम आहे .पण आपाल्याला त्याचा एकत्र आनंद घेण्याची संधी क्वचितच मिळते. मोदक हे गणेश चतुर्थी उत्सवाच्या वेळी खास गणपती बाप्पांना अर्पण केले जातात आणि या उत्सवात आंबा उपलब्ध नसतो. म्हणून मी  या दोन्हीचा fusion करण्याचा विचार केला. स्वादिष्ट उकडीचे आंबा मोदक  तयार केले आहे.

**आंब्याशी संबंधित आठवण:**

माझ्या बालपणीच्या दिवसात, आमच्या गावात आम्ही मोठ्या प्रमाणात आंब्यांचा आनंद घेत असत जे सामान्यत: एका खोलीत साठवले जात असत. एकदा सुरु केले खायला की थांबविणे कठीण होते. आंबा माचून खायचो..ती मज्जाच वेगळी..आणि नंतर आम्ही आंब्याच्या कोई धुवून त्यांना रंगवून मजेदार चेहरे(emoji) बनवायचो.

साहित्य :

***मोदकाचे सारण*** :

१/२चमचा तूप
१/२कप गुळ
१ कप नारळ, किसलेले
चिरलेली ड्रायफ्रूट्स
१ कप आंबाचा लगदा(pulp)
१/४चमचा वेलची पूड

***उकड :***

१कप पाणी
१/४ चमचा मीठ
१/२चमचा तूप

१ कप तांदळाचे पीठ, बारीक

कृती :

१ . प्रथम, मोठ्या कढईत १/२ चमचा तूप, १/२ कप गूळ आणि १ वाटी किसलेले ताजे नारळ घ्या.

२ . गूळ वितळेल आणि मिश्रण तयार होईपर्यंत मध्यम आचेवर ठेवा. १/४टीस्पून वेलची पूड घाला आणि मिक्स करा.

३ . आता आंबा पल्प घाला आणि मिश्रण घट्ट होईपर्यंत चमच्याने हलवत रहा.

४ .आता मिश्रणात चिरलेली ड्रायफ्रूट्स घाला. सारण तयार आहे, बाजूला ठेवा.

५ . दुसऱ्या कढईत १ कप पाणी, १/४ चमचा मीठ आणि १/२ चमचा तूप घाला गरम करायला ठेवा. एक उकळी आल्यावर १ वाटी तांदळाचे पीठ घाला.

६ .गॅस बंद करा.पीठ पाण्यात चांगले मिसळावे आणि 5 मिनिटे साठी झाकण ठेवा.

७ .गरम पीठ  हाताने मळून घ्यावे गरज पडली तर  पाणी शिंपडा.

८ .लहान लिंबाच्या आकाराचे गोळे करून मोदक मोल्डमध्ये ठेवा. अंगठ्याने ते सपाट करा.

९ . आता तयार केलेले आंबा - नारळ-गूळाचे सारण भरा आणि त्याला उकड लावून बंद करा.

१० . स्टीमर मध्ये समान अंतरावर  मोदक ठेवा आणि १०मिनिटांपर्यंत किंवा चमकदार पोत दिसेपर्यंत मोदक वाफेवर उकडून घ्या.(स्टीम करा.)

आणि स्वादिष्ट मोदक खायला तयार !!!!!!








{रश्मि देशपान्डे}

# उपवासाची आंबोळी

साहित्य

भिजवलेली भगर १ वाटी

भिजवलेला साबुदाणा ४ चमचे

ओलं खोबरं १/२ वाटी

दही ४ चमचे

मीठ चवीनुसार

इनो १/४ चमचा छोटा

भिजवलेली भगर, साबुदाणा, ओलं खोबरं दही,
मीठ सर्व एकत्र करून मिक्सरमधून बारीक करून घ्या.
डोस्याच्या मिश्रणासारखे मिश्रण बनवुन घ्या.
नंतर त्यात इनो टाका.
बिडाचा तवा गरम करून त्यावर आंबोळी बनवून घ्या.
४/५ मिनिटे छान भाजून घ्या.
आंबोळी तयार.
दही सोबत, चटणीबरोबर सर्व्ह करा.
उपवासाला खुप छान पर्याय आहे.



{सारिका लहाने}

# आगळी वेगळी भाऊबीज फोटोग्राफ्स-53 भाऊ 35 बहिणी सह 150 सदस्य -रोहित कुटे






# ज्वेलरी-धनश्री पदमवार



# चित्रकला- प्रिती कुलकर्णी



# चित्रकला-अयुष्का जोशी




# चित्रकला-वैशाली चाटे









# चित्रकला-मैत्रेय नागवेकर



# चित्रकला-पद्मनाभ डुंबरे



# चित्रकला-पद्मा खोचरे



# चित्रकला-रश्मी देशपांडे













# रांगोळी






# श्वेता चिन्नापुरकर-मांडला चित्र






# मोत्यांचे दागिने-सिद्धी जोशी









# पुष्प प्रतिमा-अदिती /  नादिशा







अदिती


आदिती


आदिती


अदिती


अदिती


अदिती



## मेहेंदी-सायली इनामदार



## दिवे- प्राजक्ता ठाकुरदेसाई



# व्हिडीओज

रेश्मा दुधाळ-रांगोळी

https://www.youtube.com/watch?v=s0ujhp2aAxc&feature=youtu.be

*****

लेखक : पंडित महादेवशास्त्री जोशी कथावाचन - प्राची दामले

https://www.youtube.com/watch?v=GzpLz7y8fUQ&feature=youtu.be

*****

जुई कदम - मिनिएचर रिअलिस्टीक आर्टिस्ट

https://www.youtube.com/watch?v=WeGtiaMC-rc&feature=youtu.be

*****

गायक - स्वरूप देशपांडे साथसंगत तबला - स्वरेश देशपांडे संवादिनी - डॉ प्रमोद देशपांडे

https://www.youtube.com/watch?v=6gZU_XYDMvQ&feature=youtu.be

*****

सृष्टी जुन्नरकर - कथ्थक

https://www.youtube.com/watch?v=Pa86ovyjid0&feature=youtu.be

*****

# जाहिरात


॥श्री॥
Swaad Aswaad
Delicious Homemade Namkin
Karanji 500gms 119/-
Chakali 500gms 99/-
Besan Laddu 500gms 139/-
Methi Laddu 500gms 149/-
Shankarpale (Sweet) 500gms 89/-
Shankarpale (Salty) 500gms 79/-
Anarase 500gms 79/-
Chivda 500gms 129/-
Snehlata & Dikshita Bhosale : +919082586177

## संपादक मंडळ

**सिद्धी चव्हाण**

*siddhic.blogspot.com*

**अर्चना चौधरी**

*https://www.facebook.com/rangmantale*

**पल्लवी कुलकर्णी/सुकळीकर**

*Killicorner.in*

**वैशाली चाटे**

---

## आभार

* अंकाचे मुखपृष्ठ आणि लोगो - पद्मनाभ हरीहर

*मुखपृष्ठ छायाचित्र - उन्नती उपासने

*इतर सहकार्य - अजय चव्हाण

- वैशाली मोहिते

{ ©लिखाणाचे सर्व हक्क संपादक मंडळाच्या स्वाधीन आहेत.}